म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८०

ग्रं. सं. ठाणें
निबंध
१८०

१११

लो० टिळकांच्या,

# गीतारहस्यावर

# टीकात्मक

REFBK-0001112

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. ११९२

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक
यांनीं लिहिलेल्या

# गीतारहस्यावर टीकात्मक निबंध.

प्रोफेसर—वामन गोविंद काळे, एम्. ए.,
यांच्या प्रस्तावनेसह.

लेखक व प्रकाशक,

वालचंद रामचंद कोठारी, बी. ए.,
१४६४ कसबा पेठ, पुणें.

REFBK-0001112

मुद्रक,

केशव रावजी गोंधळेकर, 'जगद्धितेच्छु' प्रेस,
४३२ शनिवार पेठ, पुणें—सिटी.

डिसेंबर १९१९.] किंमत पांच आणे [आवृत्ति पहिली.

# लेखकाचे दोन शब्द.

गीतारहस्याची पहिली आवृत्ति बाहेर पडल्यावर थोड्याच दिवसांनीं पुढील मजकूर मीं लिहिला. टीका स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा माझा उद्देश प्रथमपासूनच होता. पण 'केसरी' चे सन्मान्य संपादक श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर यांच्याशीं 'गीतारहस्या' संबंधानें बोलत असतां, त्यावरील माझ्या टीकेचें धोरण त्यांना बरें वाटलें आणि त्यांतील कांहीं भाग संक्षिप्त रूपानें 'केसरी' कडे पाठविण्याविषयीं त्यांनीं मला सुचविलें. त्याप्रमाणें माझे चार लेखांक त्यांनीं केसरींत प्रसिद्धही केले. त्यांवर जोडलेल्या टिपांचीं उत्तरें केसरींत प्रसिद्ध होणें इष्ट होतें; पण कांहीं आनिर्देश्य पण लोकांस सहज ओळखतां येणाऱ्या कारणामुळें तसें झालें नाहीं. तथापि माझ्या टीकेला उदारपणानें आपल्या लोकप्रिय पत्रांत स्थळ दिल्याबद्दल मी श्रीयुत केळकर याचा अत्यंत आभारी आहें.

पण "केसरीं" त माझ्या टीकेवर जोडलेल्या टिपांना उत्तर देण्यास अवसर न मिळाल्यामुळें वाचकांचा गैरसमज होण्याचा संभव होता. तो दूर करण्यासाठीं संपूर्ण टीका पुस्तकरूपानें वाचकांपुढें आणणें आवश्यक झालें. या प्रयत्नाला प्रोफेसर काळे यांनीं आपल्या विद्वत्त्वपूर्ण प्रस्तावनेची अमूल्य जोड दिल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे आहेत.

**लेखक.**

# प्रस्तावना.

रा. टिळकानीं आपल्या नवीन ग्रंथांत भगवद्गीतेंतून काढलेला कर्मयोग योग्य रीतीनें काढला आहे किंवा काय या विषयाचें विवेचन करण्याचा माझा अधिकार नाहीं, तसाच तो ज्यास ही प्रस्तावना जोडण्यांत येत आहे त्या टीकात्मक पुस्तकाच्या लेखकाचाहि नाहीं. तथापि, गीतारहस्याचा उद्देश, लोकांस प्रवृत्तीच्या उन्नतिकारक मार्गास लावण्याचा असल्यानें, त्यांत पाश्चात्य तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र आणि हिंदुधर्म व नीतिशास्त्र यांची तुलनात्मक दृष्टीनें चर्चा केलेली असल्यानें व त्यांतील विवेचन व्यावहारिक महत्त्वाचें असल्यामुळें सामान्य सुशिक्षित माणसासहि सदरहु ग्रंथांतील विधानास विचाराची कसोटी लावून पहातां येण्यासारखी आहे, व त्यानें ती लाविली पाहिजे. आपल्या मतें गीतेमध्यें कोणत्या प्रकारचें तत्त्वज्ञान सांगितलें आहे, हें टिळकांनीं उत्तम रीतीनें विशद करून दाखविलें आहे; परंतु ज्या सिद्धांतांवर व मुद्यांवर त्यांनीं आपली इमारत उभी केली आहे तो पाया कितीसा मजबूत आहे यासंबंधानें मार्मिक वाचकांनीं आपलें मत स्वतंत्र रीतीनें बनविलें पाहिजे. हें काम, माझे तरुण व बुद्धिमान् मित्र, रा. कोठारी यांनीं उत्तम रीतीनें केलें आहे असें मला वाटतें; आणि त्यांचे आक्षेप पोकळ, भ्रममूलक व मुद्यास सोडून आहेत व त्यांच्यासारख्या टीकाकारांसाठीं गीता नव्हे व गीतारहस्यहि नव्हे या प्रकारच्या उत्तरांनीं त्यांच्या लेखांची संभावना करून भागावयाचें नाहीं. हिंदुस्थानांतील लोक कर्तृत्ववान् व्हावे आणि त्यांची राजकीय, सामाजिक व सांपत्तिक उन्नति होत जावी ह्या उद्देशानें गीतारहस्यकारांनीं भगवद्गीतेच्या शिकवणीचा आधार घेऊन कळकळीनें उपदेश केला आहे परंतु त्या ग्रंथांतील विचारसरणी व आधारभूत सिद्धांत ह्यांवर रा. कोठारी ह्यांच्याप्रमाणें स्वतंत्र रीतीनें, निर्भीडपणानें व मार्मिकतेनें दुसऱ्या कोणीं टीका केली असल्याचें माझ्या पहाण्यांत नाहीं.

संसारांत सुखापेक्षां दुःखच अधिक आहे, आत्मा ( चैतन्य ) फक्त नित्य व सत्य आहे, बाकी हें जग सर्व असार, नश्वर व मायामय आहे, असल्या कल्पनांचा पगडा हिंदू समाजावर बसल्यानें त्याचें अपरिमित नुकसान झालें आहे व होत आहे. हिंदुस्थानांत संपत्तीची वाढ झाली पाहिजे, उद्योगधंद्यांची उन्नति झाली पाहिजे, व्यापाराची अभिवृद्धि झाली पाहिजे व हिंदी लोकांचें ऐहिक जीवित सुखमय झालें पाहिजे असें ह्मणणारा मनुष्य, मानवी प्रपंचच आभासात्मक आहे व सुखदुःखें हीं सर्व मिथ्या आहेत असें प्रतिपादूं लागला असतां त्याच्या उपदेशाचा कितीसा इष्ट परिणाम होणार आहे ? हिंदू लोक निवृत्तिपर असतांना ते एका काळीं वैभवशिखरावर पोहोंचले होते ह्या मुद्यास असें उत्तर आहे कीं, त्यांची निवृत्तिपरता ज्या प्रमाणांत अपूर्ण होती त्या प्रमाणांतच त्यांची प्रगति झाली. ऐहिक सुखांची उत्कट इच्छा व ती तृप्त करण्याची धडपड ह्यांमध्येंच सांपत्तिक उन्नतीचें बीज आहे. ही इच्छाच जर नाहींशी करावयाची व मातीचें ढेंकूळ आणि सोनें हीं सारखींच समजावयाचीं तर सांपत्तिक उन्नतीस वांव कोठें राहिली ? ह्या रीतीनें, गीतारहस्याची मुख्य शिकवण व परब्रह्ममूलक साम्यावस्थेचें तत्त्व ह्यांचा मुळींच मेळ बसत नाहीं. गीतेचा उपदेश अमूक प्रकारचा असावा व हिंदू समाजाचें वर्तन प्रवृत्तिपर असावें अशी उत्कट इच्छा असणें बरोबर आहे; परंतु ह्या उपदेशाची व इच्छेची उभारणी गीतेंतील निवृत्तिमूलक तत्त्वावर केल्यास तें जमावें कसें ? हा विसंगतपणा रा. कोठारी यांनीं स्पष्ट रीतीनें व्यक्त केला आहे. त्यांच्या सदरहु मुद्याच्या विवेचनाचें सार त्यांच्या खालील वाक्यांत आलें आहेः—

" जगांत सुखदुःखें खरीं मानिलीं तरच नीतिमत्तेची उपपत्ति जुळणें शक्य आहे. कारण, लोकांचें सुखवर्धन हें जें नीतिमत्तेचें उच्चतम कार्य तें, लोकसुख असत्य मानणाऱ्या परब्रह्मज्ञानमूलक साम्यावस्थेच्या पुरुषाकडून होणें शक्य नाहीं. आरंभीं लोकांचीं सुखदुःखें आभासात्मक मानावयाचीं आणि दुसऱ्याच क्षणीं याच तत्त्वाच्या बळावर लोकसुखाभिवृद्धि करणारी उच्चतम परोपकाररूप नीतिमत्ता उपदेशावयाची यासारखा परस्परविरोध

पृथ्वीच्या पाठीवर दुर्मिळ आहे. तो सर्व पृथ्वी खोटी ह्मणणाऱ्या परब्रह्मैक-वादांत अथवा जवळ जवळ त्याच मताच्या कँटच्या तत्त्वज्ञानांतच सांपडावयाचा. "

गीतारहस्यांतील साम्यावस्थेच्या विवेचनावरील रा. कोठारी यांची टीका अत्यंत मुद्देसूद व समर्पक अशी आहे. ज्यास स्वतःला सुखही नाहीं व दुःखही नाहीं, ज्यास आपल्या चित्ताचें साम्य ढळूं द्यावयाचें नाहीं, त्याच्या हातून परोपकार तरी होणार कसा, हेंच समजणें कठीण आहे. बरें, ज्यास दुसऱ्याचें दुःख पाहून दुःख होत नाहीं व जो दुसऱ्याचें सुख पाहून सुखी होत नाहीं, त्याच्या निष्काम कर्माची व नीतिमत्तेची किंमत तरी काय? हा प्रश्न मनन करण्यासारखा आहे. एका काळीं नीतिशास्त्र व अर्थशास्त्र हीं परस्परविरुद्ध आहेत अशी समजूत होती. खुद्द आडाम स्मिथनें आपल्या नीतिशास्त्राची उभारणी परोपकारावर व अर्थशास्त्राची स्वार्थावर केली आहे. परंतु, हीं दोन शास्त्रें परस्परविरुद्ध नसून एकमेकांस पोषक आहेत, असा सिद्धांत अलीकडे मान्य झालेला आहे. जी गोष्ट समाजास हितकर तीच व्यक्तीसही हितकर असली पाहिजे हें तत्त्व हजारों वर्षांच्या अनुभवानें सिद्ध झालें असून तें मनुष्याच्या अंगवळणींच पडून गेलें आहे. ह्यासंबंधानें एका अमेरिकन अर्थशास्त्रज्ञानें खालील उद्गार काढले आहेतः—

"There can therefore be no conflict between correct economic action and true ethical theory. Adam Smith's principles are indeed true, but they are complementary, not antagonistic. Sympathy or altruism pushed to an extreme involves the de truction of self and therefore the death of Society. Self-interest or egoism pushed to an extreme means the destruction of others and therefore likewise the death of society. Social life can endure only through a balancing of these two principles, each reinforced by the other. An individual may pursue selfish economic ends, and may increase his own wealth at the cost of moral progress; but he is then subordinating public to private considerations. Broadly

speaking, regarded from the point of view of society as a whole, what is economically advantageous must in the long run be right; and what is correct in ethics must in the end also be profitable to the business world."

संपत्ति व धर्म यांचा बायबलांत परस्परविरोध दाखविलेला असतां ख्रिस्ती राष्ट्रांची ऐहिक प्रगति झाली आहे याचें कारण, त्यांनीं ख्रिस्ताच्या उपदेशाप्रमाणें आचरण केलें नाहीं हें होय. 'पर्वतावरील उपदेशा'प्रमाणें तीं वागतीं तर तीं अत्यंत मागसलेल्या स्थितीमध्येंच राहिलीं असतीं. आज हिंदुस्थानांतील वैराग्याचें बाळकडू मिळणाऱ्या लोकांस जर कोणता उपदेश अहर्निश पाहिजे असला तर तो ऐहिक सुख मिळविण्याची जोराची खटपट करण्याविषयींचा पाहिजे आहे. गीतारहस्यांतील कर्ममार्ग ठीक आहे; परंतु त्याच्या मागची मानसिक साम्यावस्था व सांसारिक सुखदुःखांचें आभासात्मकत्व, यांच्या योगानें तो व्यर्थ होणार आहे. असलीं धर्मतत्त्वें मनांत बिंबून व्यवहारांत त्यांप्रमाणें कोणाचें आचरण होत नाहीं ह्मणून बरें असें ह्मणण्याची विचारी माणसास पाळी येतें, व गीतारहस्यापासून फायदा झाला नाहीं तरी रा. कोठारी यांच्याप्रमाणें त्यांतील उपपत्तिसरणीनें नुकसान व्हावयाची भीति न वाटण्यास तरी हीच जागा आहे. आधिभौतिक सुखाचा पाठलाग करणें आणि सांपत्तिक उन्नतीचा पिच्छा पुरविणें ह्या गोष्टी सांप्रतच्या काळांत हिंदी लोकांच्या अंगवळणीं पडणें अगत्याचें आहे. ह्मणजे केवळ स्वार्थाच्याच मागें प्रत्यकानें लागलें पाहिजे असें नव्हे, तर स्वार्थ आणि परमार्थ याची वर सांगितल्याप्रमाणें एकवाक्यता झाली पाहिजे. मुख्याची गोष्ट ही आहे कीं, संसार असार आहे, ह्या नश्वर जगांत दुःख ओतप्रोत भरलें आहे, व आधिभौतिक सुखांचा अभिलाष करणें मूर्खपणाचें आहे असल्या कल्पनांच्या ऐवजीं हिंदी लोकांत आपलें दारिद्र्य नाहींसें करून, संसार निरामय व सुख-संवर्धक करण्याची व स्वतःची सामाजिक, राजकीय आणि सांपत्तिक उन्नति करून घेण्याची जाज्वल्य प्रवृत्ति बाणली पाहिजे. ह्या देशांत निवृत्तिपरतेचा परिपोष होईल, किंवा तिला उत्तेजन मिळेल असलें तत्त्वज्ञान काय कामाचें?

आमचें तत्त्वज्ञान व संस्कृति हीं अत्युच्च दर्जाचीं आहेत हें सिद्ध करण्याच्या भरांत हिंदी लेखक ओढाताणीच्या विचारसरणीचा अवलंब करीत असतात. ह्यांत स्वदेशाभिमान झळकत असेल, परंतु सत्यशोधन किंवा मार्मिक बुद्धि ह्यांचा भाग फारच थोडा असतो. रा. कोठारी ह्यांनीं सदरहु दृष्टीनें, गीतारहस्यांतील कांहीं सिद्धांतांचें परीक्षण केलें आहे व त्यांचा मार्मिकपणा दुर्मिळ अतएव स्तुत्य असा आहे.

हिंदू समाजाच्या उन्नतीच्या मार्गांतील दुसरी एक जबरदस्त अडचण म्हटली म्हणजे त्यामधील परंपरागत, जन्मसिद्ध व कायमच्या ठशाचे जातिभेद होत. तूं अमुक जातींत जन्मास आला आहेस त्या अर्थीं तुझ्या जन्मासिद्धी दर्जाप्रमाणेंच तुला धंदा केला पाहिजे असा निर्बंध धर्मानें घातल्यामुळे व्यक्तींची व समाजाची प्रगति कुंठित झाली आहे. जेथें व्यक्तिस्वातंत्र्य नाहीं; व घाण्याच्या बैलाप्रमाणें प्रत्येकानें ठराविक मार्गानेंच आंधळ्या-पागळ्यासारखें परिभ्रमण करीत राहिलें पाहिजे असें धर्म सांगूं लागला तेथें समाजाचें पाऊल पुढें पडण्याची काय आशा आहे ? या विसाव्या शतकांत आणि हिंदुस्थानाच्या सद्यःस्थितींत, ‘ जन्मसिद्ध व जातिविशिष्ट कर्म करीत रहा ’ असा उपदेश करणें म्हणजे समाजाचे पाय मोडण्याप्रमाणें आहे. स्वधर्मांत मरण आलें तरी तें श्रेयस्कर, पण परक्याचा धर्म भयावह होय- ह्या गीतेच्या शिकवणीचें गीतारहस्यांत समर्थन करण्यांत आलें आहे ही खेदाची गोष्ट होय. “समाज हिंदूंचा असो वा म्लेच्छांचा असो, प्राचीन असो वा अर्वाचीन असो, पौरस्त्य असो वा पाश्चात्य असो, त्यांत चातुर्वर्ण्यव्यवस्था असल्यास त्याप्रमाणें किंवा दुसरी समाजव्यवस्था अमलांत असेल तर त्याप्रमाणें जें काम आपणास प्राप्त झालें अथवा शक्य असल्यास आपल्या अभिरुचीप्रमाणें आपण कर्तव्य ह्मणून एकदां पत्करिलें तेंच आपला स्वधर्म बनतें; आणि तो धर्म सोडून देऊन कोणत्याही सबबीवर आयत्या वेळीं कोणीं दुसऱ्याचें काम करूं लागणें हें धर्मदृष्ट्या व सर्वभूतहितदृष्ट्या गर्ह्य होय, असें गीता सांगत आहे.” (गी. र. ४९२) ह्या गीतारहस्यांतल्या वाक्यांतील विचारसरणी अत्यंत लटपटीची व भ्रमोत्पादक आहे असें वरवर पहाणारास देखील दिसून येईल. प्रचलित समाज-

व्यवस्थेप्रमाणें प्राप्त झालेल्या स्थितींत खुष रहाणाऱ्या राष्ट्रांची प्रगति कधींहि झालेली नाहीं व व्हावयाची नाहीं. सदरहू व्यवस्था जुलमाची व वरिष्ठ वर्गाच्या लोकांच्या स्वार्थावर उभारण्यांत आलेली आहे ह्या मुद्यावर, पाश्चात्त्य राष्ट्रांत खालच्या वर्गातले लोक ती बदलण्याचा व आपल्या वरच्या वर्गाच्या पाहिरीवर चढून बसण्याचा यत्न करीत आहेत. आजच्या हिंदुसमाजपद्धतीकडे पाहिलें ह्मणजे वरच्या आणि खालच्या वर्गांकडे खर्डेघाशीचें कर्तव्य आलें आहे. त्यांनीं युरोपिअन अधिकाऱ्यांचा दर्जा प्राप्त करून घेऊन लष्करी कामें करण्याची हांव धरणें गीतेच्या ~ष्ट्या गर्ह्य आहे असें समजावयाचें कीं काय ? ह्या गीतेच्या तत्त्वाप्रमाणें ~ावयाचें ह्मणजे हिंदी लोकांनीं प्रगतीच्या आशेवर पाणी सोडण्या-रखें आहे.

जातिविशिष्ट किंवा जन्मसिद्ध कर्तव्यें समाजांतलि व्यक्तींच्या गुणकर्मांस धरून नसतात व अनुकूल परिस्थितींत एका वर्गांतील व्यक्ति दुसऱ्या वर्गाचीं ~शिष्ट समजलीं जाणारीं कर्तव्यें करण्यास अधिक पात्र असतात असें प्रत्यहीं दिसून येतें. अशा स्थितींत व्यक्तिस्वातंत्र्य नाहींसें करून, तुला प्राप्त झालेलें काम तूं कर असें प्रत्येकास निक्षून सांगणें म्हणजे समाजाची वाढ खुंटविण्यासारखें आहे. गीतारहस्यांतलि युक्तिवादाचा अवलंब करून, हिंदी प्रजेस उच्च जबाबदारीचे व दर्जाचे हक्क देणें अनिष्ट आहे असें ब्रिटिश सरकारास तेव्हांच सिद्ध करतां येईल. हिंदू समाजांत चैतन्य नाहीं, हालचाल नाहीं, प्रगति नाहीं याचें कारण ' स्वधर्मे निधनं श्रेयः ' हा उपदेश होय. प्रचलित, परंतु अन्यायमूलक अथवा अज्ञानजन्य समाजव्यवस्थेच्या गुलामगिरींत न राहतां प्रयत्नानें वर चढण्याची महत्त्वाकांक्षा व्यक्तींनीं धरावयाची नाहीं तर राष्ट्राचें डोकें वर येणार कसें ? व्यक्तींची चढाओढ हें तर प्रगतीचें रहस्य आहे व त्याच्या मुळाशीं कुऱ्हाड घालणारें धर्मतत्त्व त्याज्य समजलें पाहिजे. हें धर्मतत्त्व हिंदु समाजांतील लाखों लोकांस अन्यायाचें व जुलमाचें असें आज नाहीं तरी उद्यां वाटल्यावांचून राहणार नाहीं व तसें त्यांस वाटण्यांतच आमच्या राष्ट्राच्या उन्नतीचें मूळ आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांत, जोडे विकण्याचा धंदा

करणारा मनुष्यहि मुख्य प्रधान होऊं शकतो हें त्या राष्ट्राच्या जिवंत-पणाचें व प्रगतीचें कारण आहे. आमचें समाजशास्त्र व नीतिशास्त्र आधुनिक पाश्चात्य पंडितांच्या विचारापुढें गेलेलें आहे असें दाखविण्याच्या भरांत गीतारहस्यकारांनीं पुष्कळ ओढाताण केली आहे, ती रा. कोठारी ह्यांनीं मोठ्या विशद रीतीनें दाखविली असून जन्म-सिद्ध कर्तव्याचें रा. टिळकांचें समर्थन लटपटीचें व अनिष्ट-परिणामकारक आहे हें सिद्ध केलें आहे. रा. कोठारी ह्यांनीं आपल्या पुस्तकांत दुसऱ्याहि कित्येक महत्त्वाच्या मुद्यांचें बोधप्रद रीतीनें विवेचन केलें आहे. त्याचा उल्लेख येथें करतां येत नाहीं. त्यांची विचारसरणी मुद्देसूद व मार्मिक आणि भाषा जोरदार व ओजस्वी आहे. कित्येक ठिकाणची त्यांची भाषा बरीच कडक असल्याचा भास होईल; परंतु ती कडक भाषा विकारवशतेचा परिणाम नसून जळणाऱ्या अंतः-करणाच्या कळकळीचा आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे कोणत्याही विषयाचा स्वतंत्र रीतीनें विचार करणारांची संख्या आमच्या समाजांत अत्यल्प आहे. सूक्ष्म विचार, मार्मिकपणा आणि स्पष्टोक्ति ह्यांची आमच्या-मध्यें मोठी वाण आहे. ह्या दृष्टीनें रा. कोठारी ह्याच्यासारख्या बुद्धिमान्, होतकरू व आस्थेवाईक तरुण लेखकाच्या पुस्तकाचें विशेष महत्त्व आहे. गीतारहस्यकारांची विद्वत्ता, त्यांची संस्कृति, त्यांचें भाषेवरील प्रभुत्व, त्यांचा स्वतःचा सार्वजनिक आयुःक्रम ह्यासंबंधानें त्यांच्याविषयीं माझ्या-प्रमाणेंच रा. कोठारी ह्यांच्या मनांत पूर्ण आदर आहे ह्याविषयीं शंका नाहीं. प्रस्तुत पुस्तकांतील टीकेचा, हिंदु समाजाच्या प्रगतीशीं निकट संबंध असल्यामुळें, ती पोचट किंवा पोरकट आहे ह्या सोईस्कर व ऐदी मुद्यावर तिचा तिरस्कार केला जाऊं नये व प्रत्येक राष्ट्रहितेच्छु माणसानें तिचा निर्विकार मनानें विचार करावा अशी माझी आग्रहपूर्वक शिफारस आहे.

फर्ग्यूसन कॉलेज, पुणें,
२४ डिसेंबर, १९१५.

वा. गो. काळे.

क्र.

# प्रकरण पहिलें.

हिंदुस्थान सरकारानें अमलांत आणिलेल्या प्रेस ॲक्टामुळें आमच्या लेखन-स्वातंत्र्याला मोठा धक्का बसला आहे असें सद्यःकालीं पुष्कळांचें ह्मणणें आहे व तें बऱ्याच अंशीं खरेंही आहे. तथापि सरकारानें लोकांच्या शिरावर प्रेस ॲक्ट कां लादला, तें सरकाराचें कृत्य योग्य होतें कीं अयोग्य होतें, याचा विचार येथें कर्तव्य नाहीं. प्रेस ॲक्टविरुद्ध तक्रार करणाऱ्या लोकांचें, प्रेस ॲक्ट अडथळा करीत नाहीं त्या बाबतींसंबंधाचें स्पष्टवक्तृत्व कितपत आहे हें येथें पहावयाचें आहे. जनहिताच्या अशा पुष्कळ गोष्टी आहेत कीं ज्यांसंबंधानें बोलतांना व लिहितांना सत्याची बाजू सदैव धरिली पाहिजे; कारण परिणामीं तीच श्रेयस्कर असते. पण सध्यांच्या महाराष्ट्र वाङ्मयांत याच्याविरुद्ध प्रकारच पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येतो. जनापवादाच्या भीतीनें व लोकप्रियतेच्या लालसेनें बोलतांना व लिहितांना सत्यापलाप करण्यांतच बहुतेकांना भूषण वाटूं लागलें आहे. सत्य आणि जनहित हीं जणूं परस्परविरुद्ध व परस्परविघातकच आहेत अशी भावना बहुतेकांच्या मनांत बिंबल्यासारखी दिसत आहे व त्यामुळें बुद्धिस्वातंत्र्याची विटंबना होऊन बुद्धीची गुलामगिरी हेंच थोड्याबहुत अंशांनीं सर्वांचें ध्येय होऊन बसलें आहे. पशु व मनुष्य यांमध्यें जर कांहीं विशेष असेल तर तो बुद्धीचा विलक्षण प्रादुर्भाव होय; ही गोष्ट सर्वमान्य असूनही बुद्धीची गुलामगिरी म्हणजे पशुवृत्तीचा अंगीकार करणें होय, हें त्यांच्या लक्षांत कां येत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय? असल्या गुलामगिरीनें माणुसकीची वाढ होणार

कीं खुंटणार हा विचार मनांत यावयास नको काय ? भारतभूमि एके काळीं उत्कृष्ट स्थितींत होती ह्मणून तत्कालीन विद्वानांचे अहर्निश पोवाडे गाणाऱ्या पंडितांनीं, " ती उत्कृष्टावस्था त्या विद्वानांच्या बुद्धिस्वातंत्र्यामुळें झाली होती कीं कशी ? बुद्धिस्वातंत्र्यामुळें झाली असल्यास त्या काळच्या आकुंचित ज्ञानसामुग्रीच्या बळावर त्यांनीं लढविलेले तर्क आजही खरेच मानण्याचा दुराग्रह धरल्यास तसें करणें बुद्धीच्या गुलामगिरीचें द्योतक आणि आपल्या निकृष्ट अवस्थेचें आद्य कारण होणार नाहीं काय ? " हा प्रश्न कधीं स्वतःपुढें ठेविला होता काय ? आपले पूर्वज ज्या कारणामुळें थोर गणिले जातात त्याच कारणामुळें आपण थोर गणिले जाणार किंवा कसें ? स्वतःच्या अज्ञ पूर्वजांचें बाबावाक्य प्रमाण न धरितां आपल्या बुद्धिसामर्थ्यानें सत्यशोधनाचा प्रयत्न करण्यानेंच जर त्यांना थोरवी प्राप्त झालेली आहे, तर आज आपणही तोच मार्ग आक्रमावयास नको काय ? त्या थोर पूर्वजांनीं केलेल्या विचाराला चिकटून रहाण्यानें प्रगति होणार नसून, त्यांनीं दाखविलेल्या अतर्क्य व स्तुत्य बुद्धिस्वातंत्र्याची कास धरल्यानेंच आपली उन्नति होणार आहे हें त्रिकालाबाधित सत्य आपल्या मनांत बिंबविणें योग्य होणार नाहीं काय ?

अशा प्रकारचे विचार अलीकडे अनेक शतकें हिंदुस्थानांत दुर्मिळ होते, त्याप्रमाणेंच सध्यांही बऱ्याच अंशीं आहेत. धर्मभोळ्या व भक्तिखुळ्या लोकांच्या खुळसटपणाची वाखाणणी करून व विचारशून्य जनसमूहाच्या विचारहीन कृतींची प्रशंसा करून स्वतःचें उदरंभरण व विशेषतः कीर्तिपोषण करण्यांतच पुष्कळांना कृतकृत्यता वाटूं लागली आहे. अशा रीतीनें जाणूनबुजून बुद्धीचें दास्य पतकरणाऱ्या विद्वानांची बुद्धिच हळू हळू नष्टप्राय व स्वतंत्र विचार करण्यास असमर्थ होत गेल्यास त्यांत नवल नाहीं. त्यांच्या एकंदर वर्तनाचा हा स्वाभाविक परिणाम आहे.

अवनत झालेल्या लोकांची उन्नति होण्यास, ज्या कारणांमुळें त्यांची अवनति झाली तीं कारणें नष्ट होणें आवश्यक असतें; अर्थात् त्यांची उन्नति करण्याचे प्रयत्न असे असले पाहिजेत कीं ( १ ) त्या योगानें ती

कारणें त्यांस समजतील व तीं घालविण्याचा ते प्रयत्न करतील, अथवा (२) त्यांपासून उत्पन्न झालेल्या चालनामुळें तीं कारणें हळू हळू कमी होत जातील. यांपैकीं पाहिला मार्ग म्हणजे अवनतीचीं कारणें स्पष्टपणें जनसमूहापुढें मांडून तीं नाहींशीं करण्याचा प्रयत्न करण्याची प्रवृत्ति त्यांमध्यें उत्पन्न करणें हा होय; आणि दुसरा मार्ग म्हणजे ज्या कारणांमुळें त्यांची अवनति झाली त्यांच्या विरुद्ध अशीं उन्नतीचीं कारणें त्यांच्या मनामध्यें बिंबवून त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या चालनानें अवनतीचीं कारणें नष्ट करणें व उन्नति घडवून आणणें हा होय. पण यांपैकीं कोणत्याही मार्गाचा अवलंब केला तरी दोहोंच्याही ध्येयाला अवनतीचीं कारणें समजून घेणें हें इष्ट आहे यांत शंका नाहीं. आतां हिंदुस्थानाच्या अवनतीला कोणतीं कारणें झालीं याचा आपण विचार करूं.

एके काळीं हिंदुस्थान सुसंपन्न स्थितींत होता तो आज या निकृष्ट अवस्थेस कां आला ? त्याच्या अवनतीला प्रारंभ कां झाला ? वैभवशिखरास जाऊन पोंचलेल्या रोमन साम्राज्यांत त्या वैभवप्राप्तीमुळेंच चैन सुरू झाली व तीमुळें लोक निर्बल होऊन ते उत्तरेकडच्या रानटी लोकांपुढें टिकाव धरण्यास असमर्थ झाले व त्या योगानें तें साम्राज्य नष्ट होऊन इटलीला उतरती कळा लागली, तसा प्रकार हिंदुस्थानांत झाला काय ? देशाभिमान व एकी यांपासून उत्पन्न झालेल्या प्रचंड सामर्थ्यानें हिंदुस्थान उन्नतीच्या वरच्या टोंकाला पोंचला असून केवळ शारीरिक सामर्थ्याच्या अभावीं तो शिकंदरादिकांच्या कचाट्यांत सांपडला काय ? कीं देशाभिमान व एकी हीं हिंदुस्थानांत कदाकाळीं नव्हतींच ह्मणून परकीयांचा पहिला टोला बसतांच त्यानें हार खाल्ली ?

हिंदुस्थानच्या प्राचीन व आर्वाचीन इतिहासाचें अवलोकन केल्यास असें दिसून येईल, कीं हिंदुस्थानांत एकी ही कधींच उत्पन्न झाली नव्हती. हिंदुस्थान देशांतील जमीन सुपीक व त्यामुळें धनधान्याची उत्पत्ति विपुल असल्यामुळें त्याचें ऐश्वर्य चोहोंकडे गाजत होतें इतकेंच. प्राचीन काळीं हिंदुस्थानांत विद्वान् पुरुष निपजले, पण त्यांची विद्वत्ता

हिंदुस्थानाला एक करण्याकडे कधींच्र उपयोगी पडली नाहीं. जोंपर्यंत परकी लोकांना हिंदुस्थानच्या ऐश्वर्याची व धनाढ्यतेची माहिती नव्हती, जोंपर्यंत त्यांना उदरनिर्वाहाच्या अडचणीमुळें हिंदुस्थानावर हल्ला करून तेथील लोकांना लुबाडण्याची इच्छा झाली नव्हती, जोंपर्यंत शिकंदरासारख्या महत्त्वाकांक्षी बादशहाला त्याच्या महत्त्वाकांक्षेनें व विजयलालसेनें हिंदुस्थानापर्यंत आणिलें नव्हतें तोंपर्यंत हिंदुस्थानचें वैभव कायम होतें; पण ती स्थिति नाहींशी होतांच त्याच्या ऱ्हासाला प्रारंभ झाला. हिंदुस्थान स्वतंत्र होता याचें कारण हिंदुस्थानाचें सामर्थ्य नसून, इतरांनीं त्याचें स्वातंत्र्य नष्ट करण्याचा प्रयत्न केला नाहीं हें होय. शिकंदरासारख्याच्या सैन्याला तोंड देण्यास सर्व हिंदुस्थानांतील प्रांत अथवा उत्तरेकडील बहुतेक प्रांत एक झाले नाहींत इतकेंच नव्हे, तर खुद्द पोरस राजासारख्याच्या देशांतील एकंदर जनसमूहही आपल्या देशाचें रक्षण करण्यास पुढें सरसावले नाहीं. पोरस व त्याचे क्षत्रिय अनुयायी पराभूत होतांच त्या प्रांताचें स्वातंत्र्य नष्ट झालें; तो चिरकाल दास्यांत राहिला नाहीं याचें कारण शिकंदराचें सैन्य हिंदुस्थानाला कंटाळलें होतें इतकेंच. हाच प्रकार त्यानंतर झालेल्या अनेक स्वाऱ्यांत दिसून येतो. पुढें मुसलमानांनीं हिंदुस्थानांत कायमचें वास्तव्य केलें तेव्हां सुद्धां क्षत्रियखेरीज करून इतर जातींस राज्यक्रांतीचें विशेष कांहींच वाटलें नाहीं. देशाभिमानाचा स्पर्शच त्यांच्या अंतःकरणास झाला नव्हता.

हिंदुस्थानांत अथवा त्यांतील निरनिराळ्या प्रांतांत एकी उत्पन्न न होण्याचें कारण एकच नाहीं. मुळीं भिन्न भिन्न रक्ताचे आर्य व अनार्य लोक देशांत एकत्रित झाल्यामुळें व त्यांपासून अनेक जाति वाढत गेल्यामुळें सर्वांना सामान्य अशी एकीची भावना त्यांमध्यें जागृत झालीच नाहीं. त्यांतून हिंदुधर्माकडूनही या जातिभेदाचा नाश करण्याचा प्रयत्न न होतां उलट त्याला पुष्टिच मिळाली. पाश्चात्य देशांत प्रत्येक राष्ट्रांत एकी व देशाभिमान उत्पन्न करण्यास जीं कारणें उद्भवलीं त्यांचा तर हिंदुस्थानांत मागमूस नाहींच; उलट देशप्रेमाच्या आड येणारें एक प्रबळ कारण मात्र अस्तित्वांत आलें.

## एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न न होऊं देणारें एक प्रबळ कारण.

हें कारण म्हणजे, आत्म्याची नित्यता, परलोक व मोक्ष यांचें अस्तित्व, वगैरे महत्त्वाच्या कल्पनांसंबंधानें हिंदुस्थानांतील एकंदर मतांची ( चार्वाक खेरीज करून ) एकवाक्यता होय; संसार हा दुःखमय आहे, ज्याला आपण दुःख म्हणतों तें तर दुःखच, पण ज्याला आपण सुख म्हणतों तेंही आभासात्मक ह्मणून दुःखच, हें प्रत्येक धर्म शिकवूं लागला. कोणीं सर्व प्रपंचच मिथ्या आहे हें तत्त्व प्रतिपादिलें, तर कोणीं संसारांतील सुख हें सर्वस्वी मिथ्या आहे असें शिकविलें—सारांश, संसार त्याज्य, संसाराचें कारण हें बाह्य शरीर, आत्मा त्याहून अत्यंत भिन्न, मायेच्या अथवा कर्माच्या बंधनामुळें हें शरीर आत्म्याला सोडीत नाहीं, मायेमुळें अथवा कर्मामुळेंच आत्म्याला संसारचक्रांतून फिरावें लागतें, त्या कर्मांचा नाश करण्यास शारीरिक व मानसिक वृत्ति नष्ट करणें हाच एक मार्ग आहे—हेंच सामान्य तत्त्व सर्व धर्मांनीं प्रतिपादिलें व जनतेच्या मनांत बिंबविलें. याप्रमाणें खुद्द स्वतःच्या शरीरावरील प्रीति नष्ट करण्याचा, व कुटुंबांतील माणसें सुद्धां तुझीं कोणीं नव्हत असें प्रत्येकास शिकविण्याचा प्रयत्न धर्मानें चालविल्यावर स्वतःच्या शरीरापलीकडे व कुटुंबापलीकडे असणाऱ्या देशापर्यंत मनुष्याच्या ममत्वाची व अभिमानाची मजल पोंचते कशाला ? अपत्यप्रेम मानवी अंतःकरणांत वास करीत आहे ह्मणून जगांत मनुष्यजात अस्तित्वांत आहे, तें नष्ट होईल त्या दिवशीं मनुष्यांचा उच्छेद होणार हें उघडच आहे. आतां हें अपत्यप्रेम नाहींसें करण्याकडे जेथें हिंदुस्थानांतील प्रत्येक धर्माचा प्रयत्न, तेथें देशाभिमानाची कल्पना लोकांच्या डोक्यांत उद्भवते कशाला ? पशूंपासून व त्यानंतर मनुष्य रानटी अवस्थेंत होता तेव्हांपासून मनुष्याला अपत्यप्रेम हा आनुवंशिक संस्कार आलेला आहे. पण रानटी अवस्थेंत ( समाज अस्तित्वांत येण्यापूर्वी ) देशाभिमानाची कल्पना मुळींच नसल्याकारणानें ती मनुष्याच्या मनांत नव्यानें प्रादुर्भूत व्हावयाची असते. पण कुटुंबाच्या अस्तित्वाला अवश्यक असलेल्या अपत्यप्रेमावरच जेथें धर्माची करडी नजर तेथें देशाभिमान कोठून येणार? हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांतील हें अपत्यप्रेम

नष्ट झालें नाहीं याचें कारण असंख्य पिढ्यांपासून चालत आलेले संस्कार धर्मोला नष्ट करतां आले नाहींत हें होय; बाकी धर्ममतांचा तो प्रयत्न यथाशक्ति चाललाच होता.

स्वतःच्या कुटुंबाचें, जातीचें, देशाचें पोषण व रक्षण करूं नका, असें धर्म कोठें म्हणतो ? उलट ठिकठिकाणीं कुटुंबासंबंधींचें व देशासंबंधींचें कर्तव्य धर्मानें उपदेशिलें आहे, असें कित्येकजण ह्मणतील. पण त्यांच्या या शंकेचें समाधान थोडक्यांत करतां येणार आहे. आरंभीं धर्म मनुष्यास काय सांगतो ? नव्हे, प्रथम मनुष्याची धर्माकडे प्रवृत्ति होते कां ? धर्माचें अस्तित्वच मुळीं कोणत्या मूलतत्त्वावर अवलंबून आहे ?—जगांत प्रत्येक मनुष्यास सुखापेक्षां दुःखच जास्त अनुभवावें लागतें; शिवाय ज्याला तो सुख ह्मणतो तेंही दुःखच आहे; शरीराच्या संयोगानेंच हें दुःख होतें; या नाशवंत शरीराचा त्याच्या आत्म्याशीं कांहींच संबंध नाहीं—ह्याच गोष्टी कोणताही धर्म मनुष्याला प्रथम सांगतो ना ? जगांत दुःखाचें आधिक्य आहे असें लोकांच्या मनांत बिंबवूनच धर्म स्वतःचीं तत्त्वें प्रतिपादण्यास प्रारंभ करतो ना ? नाहीं तर धर्माची गरज काय ? याप्रमाणें जगाचें निःसारत्व, आत्म्याचें व शरीराचें सर्वतोपरी भिन्नत्व व ऐहिक सुखाचें असत्यत्व मनुष्याच्या मनांत धर्माच्या पहिल्याच हल्ल्यासरशी बिंबल्यावर या कल्पनांशीं सर्वथैव विरुद्ध असलेल्या देशाभिमानाचें वारें त्याला कां स्पर्श करील ? हें शरीरच तुझें नव्हे, असें जेथें धर्म पहिल्याच हप्त्याला सांगतो त्याच्याच तोंडून, हा देश तुझा आहे हे उद्गार आगेंमागें निघाल्यास धर्मनिष्ठ मनुष्यानें तिकडे लक्ष्य कां द्यावें ? आज हिंदुस्थानांतील प्रत्येक वर्गातील प्रत्येक मनुष्याला धर्माच्या या सामान्य तत्त्वाची जाणीव आहे. " धन, सुत, दारा, " हीं आपलीं नव्हतच, पण जें आपण रात्रंदिवस पोसतों तें शरीरही आपलें नव्हे, हें हिंदुस्थानांतील एकंदर धर्मांचें रहस्य आज प्रत्येक हिंदूला ठाऊक असून तें हजारीं नऊशें नव्व्याणवांच्या मनांत उत्तम रीतीनें बिंबलेलें आहे. हे धर्मनिष्ठ लोक आपापल्या धर्ममतांप्रमाणें पूर्णपणें वागण्याचा प्रयत्न करीत नाहींत व आजपर्यंत त्यांनीं तो केला नाहीं ह्मणून ते आज

पृथ्वीच्या पाठीवर विहरताहेत; त्यांनीं तो केला असता तर केव्हांच त्यांचा नायनाट झाला असता.

ख्रिस्ती धर्म पाळणाऱ्या राष्ट्रांत हिंदुस्थानाच्या उलट प्रकार घडून आला. याचें कारण त्या धर्माची मजल इतक्या दूरवर गेली नाहीं हेंच होय. नाहीं तर तिकडेही देशाभिमानाच्या उत्पत्तीला धर्माचा प्रचंड अडथळा आला असता. ख्रिस्ती धर्मानें मुळीं शरीर आणि आत्मा यांचा इतका कडक भेद केला नाहीं; उलट जगाच्या अंतीं ईश्वर धर्मनिष्ठ लोकांना त्यांच्या शरीरांसकट जिवंत करणार असें तत्त्व त्या धर्मानें उपदेशिलेलें आहे. शिवाय इहलोकींचें सुख केवळ खोटें आहे, तें दुःखमयच आहे, असें ख्रिस्ती धर्म सांगत नाहीं. फक्त हें सुख अल्पकाल टिकणारें आहे, ईश्वरावर श्रद्धा ठेवून नीतीनें वागलें असतां परलोकीं अशाच प्रकारचें पण उच्च दर्जाचें व अक्षय सुख मिळतें इतकेंच तो सांगतो. त्यामुळें स्वतःच्या शरीराशीं दुजाभाव करण्याचा व त्याचा तिरस्कार करण्याचा प्रसंग सामान्यतः ख्रिस्ती लोकांस आला नाहीं. कोणतेंही परोपकाराचें कृत्य केलें तरी तें ईश्वरास प्रिय होऊन तो त्याला तारतो, फक्त त्यानें उपदेशिलेल्या बायबलावर श्रद्धा ठेवून वागलें म्हणजे झालें; असें त्या धर्माचें मत आहे. ब्रह्मचर्यासारख्या व्रतांची व शरीरशोषणाची वाखाणणी ख्रिस्ती धर्मानें केलेली नाहीं. मध्यें कांहीं शतकें वैराग्याचें व संसाराच्या निःसारपणाचें स्तोम तिकडे माजलें होतें. पण ख्रिस्तानें उपदेशिलेलीं मूलतत्त्वें स्थूल असल्याकारणानें ख्रिस्ती धर्मांत लौकरच अनुकूल सुधारणा झाली व प्रगतीचा मार्ग खुला झाला.

हिंदुस्थानांतील धर्मांत काय अथवा ख्रिस्ती धर्मांत काय, आत्म्याच्या नित्यत्वाचा सिद्धांत सामान्यच आहे. पण या सिद्धांतापासून तर्कशास्त्रास सम्मत अशीं जीं अनेक अनुमानें इकडच्या मतप्रतिपादकांनीं काढलीं, तीं तिकडे कधीं निघालीं नाहींत; कारण ख्रिस्त हा ईश्वराचा पुत्र असा विश्वास ठेवणें भाग असल्यामुळें त्यानें उपदेशिलेल्या तत्त्वांपलीकडे त्याच्या इतर तत्त्वांशीं विसंगत अशीं अनुमानें लढविणें तिकडे शक्य नव्हतें. आत्मा नित्य व त्याचें स्वरूप शरीरापासून सर्वथैव भिन्न व विरुद्ध आहे असें

एकदां मानल्यावर—अथवा हें सर्व जग आभासात्मक व परब्रह्म हेंच एक सत्य आहे असें मानल्यावर—ऐहिक सुखांवरचें व संसारावरचें ममत्व सर्वथैव नष्ट करणें प्राप्त होतें. स्वतःच्या शरीरावरचेंच ममत्व प्रथम नाहींसें करावयाचें म्हटल्यावर, अशाच प्रकारच्या स्वदेहममत्वाच्या रोगानें पछाडलेल्या लोकांनीं बनलेल्या स्वदेशावर प्रेम करावयाचें काय, हा प्रश्न मुळीं उत्पन्नच होत नाहीं; आणि झालाच तर त्याला नकारार्थी उत्तर मिळण्यास क्षणाचाही विलंब लागत नाहीं.

वस्तुतः स्वतंत्र व सुखमय स्वभावाच्या आत्म्याला शरीर हें बंधन आहे व त्याचा कायमचा उच्छेद करणें हेंच मोक्षाचें एकमात्र साधन आहे अशी दृढ भावना झाल्यावर स्वाभाविकपणेंच आत्महितेच्छु लोकांची मोक्षाकडे प्रवृत्ति होते आणि शरीराचे विकार (न्याय्य व अन्याय्य, सर्वच; कारण सारेच आभासात्मक सुखाला व दुःखाला कारणीभूत होतात.) हळु हळु नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू होतो. मनोविकार इतपत आवरून धरावयाचे अशी मर्यादाच रहात नाहीं. अर्थात् ते नष्ट होईपर्यंत त्यांचा पाठलाग करावयाचा हें कर्तव्य बनतें. याप्रमाणें न्याय्य व अन्याय्य अशा दोन्ही प्रकारच्या मनोवृत्तींस आळा घालण्याचा घातक उपदेश हिंदुस्थानांतील प्रत्येक धर्मानें केल्यामुळेंच त्यांतील जनतेची वाढ खुंटली आहे. समाजांतील इतर व्यक्तींच्या न्याय्य प्रवृत्तींच्या आड आपल्या प्रवृत्ति व तज्जन्य कृति येऊं द्यावयाच्या नाहींत,—सारांश, परस्परांच्या समान स्वातंत्र्याला अडथळा न आणतां स्वतःच्या इच्छेप्रमाणें वागण्याची प्रत्येकाला पूर्ण मुभा आहे, हें त्रिकालाबाधित तत्त्व अमलांत न आल्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांची प्रगति न होतां अवनति झाली आहे.

याप्रमाणें, धार्मिक उन्नतीनें जरी नीतिबंधनें दृढ करून समाजाचें अस्तित्व कायम ठेविलें आहे तरी त्याबरोबरच त्यांव्यतिरिक्त अनेक दुष्ट बंधनें लोकांवर लादून त्यांना अधोगतीला आणिलें आहे. हीं अवास्तव बंधनें नष्ट करण्याचा व अशा रीतीनें देशाच्या प्रगतीच्या मार्गातील अडथळे दूर करण्याचा प्रयत्न आपल्या देशांतील समाज-सुधारकांनीं चालविला

आहे, आणि देशाभिमान, राष्ट्रैक्य, स्वदेशप्रीति यांसारख्या भावना लोकांच्या मनांत जागृत करून देशकार्य व समाजकार्य जबाबदारीनें बजाविण्याची योग्यता लोकांच्या अंगीं उत्पन्न करण्याचा प्रयत्न राजकीय सुधारकांनीं चालविला आहे; कारण राष्ट्राचें हित तेंच स्वतःचें हित—किंबहुना राष्ट्राच्या उन्नतीशिवाय स्वतःची उन्नति नाहीं—हें देशप्रीतीचें उदात्त तत्त्व मनांत बाणल्याशिवाय महत्त्वाचीं सार्वजानिक कर्तव्यें जबाबदारीनें व कळकळीनें पार पाडण्याची पात्रता लोकांच्या अंगीं येणें शक्य नाहीं. याप्रमाणें देशाभिमानाच्या व त्यामुळें राष्ट्राच्या प्रगतीच्या आड येणारीं धार्मिक बंधनें व तीं अस्तित्वांत आणणारीं घातक धार्मिक मतें नाहींशीं करण्याचा प्रयत्न समाजसुधारकांनीं करावयाचा व राष्ट्रोन्नतीचें प्रत्यक्ष कारण जें देशप्रेम तें जागृत करण्याचा प्रयत्न राजकीय पुढाऱ्यांनीं करावयाचा. याप्रमाणें दोन्ही प्रकारच्या पुढाऱ्यांचीं कार्यें राष्ट्रोन्नतिला पोषक असावयाचीं. पण दुर्दैवानें हिंदुस्थानांत चमत्कारिकच प्रकार दृष्टीस पडतो. राष्ट्रोन्नतीला सामाजिक सुधारणेची आवश्यकता नाहीं—नव्हे जातिभेद राहूनही वाटेल तितका राष्ट्रोत्कर्ष होणें शक्य आहे असें कांहीं राजकीय पुढारी प्रतिपादतात व प्रसंगीं समाजसुधारणेच्या विरुद्धही उपदेश करितात; तर समाजसुधारक म्हणतात, कीं सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राजकीय उन्नति होणें मुळींच शक्य नाहीं, इतकेंच नव्हे तर समाजसुधारणेच्या अभावीं राजकीय सुधारणेचा प्रयत्न करणें म्हणजे केवळ खोट्या देशाभिमानाचा पूर आणणें होय! देशाचें दुर्दैव! ज्या राष्ट्रोन्नतीच्या मार्गांतील फाजील धर्मबंधनांच्या व जातिभेदाच्या अडचणी दूर करण्याचा समाजसुधारक प्रयत्न करीत आहेत, त्या तशाच राहूं द्या असें म्हणणें—नव्हे त्या मुद्दाम तशा ठेवण्यास लोकांना भाग पाडणें हें राजकीय पुढाऱ्यांच्या ध्येयप्राप्तीस कसें पोषक होणार हें त्यांचें त्यांनाच ठाऊक! आणि राष्ट्रोन्नतीचें ध्येय अहर्निश पुढें ठेवून सामाजिक रोग दूर करण्याची खटपट करणाऱ्या समाजसुधारकांचें ध्येय देशाभिमानाच्या जागृतीच्या विरुद्ध बोलण्यानें कसें प्राप्त होणार हेंही त्यांचें त्यांनाच माहीत!

याप्रमाणें ज्या दोन्ही मार्गांत प्रयत्न करणाऱ्या स्वार्थत्यागी लोकांनीं परस्परांस साह्य करावयास पाहिजे ते तसें न करतां पुष्कळदां परस्परांचे प्रयत्न निरर्थक करण्यांतच गुंतलेले दिसतात. असें करणें म्हणजे एका हातानें लोकांना पुढें नेत असतां दुसऱ्या हातानें त्यांना मागें लोटण्याप्रमाणें आहे.

अशाच प्रकारचा एक प्रयत्न लो. टिळकांच्या भगवद्गीतारहस्यामुळें झालेला आहे. प्रपंच हा आभासात्मक आहे, परब्रह्म हेंच खरें आहे, तें प्राप्त करून घेण्यासाठीं जगांतील संपूर्ण सुखदुःखांचें निःसारत्व व असत्यत्व पूर्णपणें मनांत बिंबलें पाहिजे—अशा प्रकारचें तत्त्व त्यांत त्यांनीं प्रतिपादिलें आहे; व त्याला पाश्चात्य शास्त्रीय शोधांचा व पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा पाठिंबा दिला आहे. या परब्रह्माच्या कल्पनेवर प्रवृत्तिपर मार्गाचा डोलारा उभारण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे ही गोष्ट खरी—निवृत्तिमार्गानें हिंदु लोकांना राष्ट्रकार्यपराङ्मुख केलें हें जाणून त्यांनीं परब्रह्मैक्यरूप मोक्षप्राप्तीची व प्रवृत्तिमार्गाची सांगड घालून देण्याचा प्रयत्न केला आहे हें खरें—पण तो प्रयत्न व्यर्थ आहे. गीतेचा भावार्थ कसाही असो ( आणि लो. टिळक म्हणतात त्याप्रमाणें तो प्रवृत्तिपर असण्याचाच पुष्कळ संभव आहे ), परब्रह्माच्या कल्पनेची आणि प्रवृत्तिमार्गाची सांगड जुळत नाहीं हें खास. त्यामुळें इतके दिवस लोकांच्या मनांत सुप्तावस्थेंत पडून राहिलेली परब्रह्माची भावना मात्र दृढ होणार आणि त्यायोगानें स्वाभाविकपणें निवृत्तिमार्गावरचें प्रेम व तज्जन्य राष्ट्रविघातक कर्तव्यशिथिलता यांचा पगडा लोकांवर पुनः बसणार. या विधानाची स्पष्टता पुढील विवेचनावरून होईल.

परब्रह्माचें व स्वतःचें ऐक्य आणि प्रपंचाचें आभासात्मकत्व मनांत बिंबलें म्हणजे स्वाभाविकपणेंच सर्व भूतांविषयीं मनांत साम्य बिंबतें. असें झालें म्हणजे स्वतःच्या मनाच्या साम्यावस्थेस अविघातक असें राष्ट्रकार्य करावयास काय हरकत आहे? इतर राष्ट्रांच्या मानानें अवनतीस पोंचलेल्या आपल्या राष्ट्राच्या हितासाठीं झटणें म्हणजे एकंदर मनुष्यजातींत समानता उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें होय; अर्थात् हें उपरिनिर्दिष्ट कर्तव्य मनाच्या

साम्यावस्थेस बाधक होणें शक्य नाहीं. यावरून निवृत्तिमार्गापेक्षां प्रवृत्तिमार्ग श्रेयस्कर हें उघड होतें.

या विधानावर अनेक प्रकारचे आक्षेप घेतां येतात. पैकीं या ठिकाणीं परब्रह्म हें खरें मानून त्याच्याशीं तादात्म्य करून घेण्याला प्रवृत्तिमार्ग साधक आहे कीं काय एवढेंच पाहणें आहे. खुद्द परब्रह्म सत्य आहे, कीं सगळ्या प्रपंचाला आभासात्मक ठरविणारें तें स्वतःच आभासात्मक आहे याचा विचार नंतर करूं.

( १ ) अंतःकरण निर्विकार झालें, त्यांत सर्व भूतांविषयीं साम्यबुद्धि बाणली, म्हणजे काय? सर्व प्राण्यांविषयीं समत्व ना? त्यांत मनुष्यजातीलाच महत्त्व देण्याचें कारण काय? ही साम्यावस्था सर्व प्राण्यांविषयीं असते हें गीतारहस्यांतील पुढील उताऱ्यांवरून स्पष्ट होईल. "सर्व मानवजातीचें किंबहुना प्राणिमात्राचें ज्यानें हित होईल तोच धर्म—" ( पृ. ३९७ ) "मानवजातींतील प्राण्यांसंबंधानेंच नव्हे तर, मुक्या जनावरांसंबंधानेंही मनुष्याचीं कांहीं कर्तव्यें असून त्यांचा कार्याकार्यशास्त्रांत समावेश केला पाहिजे, असें पाश्चिमात्य पंडितही आतां म्हणूं लागले आहेत; व या व्यापक दृष्टीनें पाहिलें तर 'पुष्कळ मनुष्यांचें पुष्कळ हित' यापेक्षां 'सर्वभूतहित' हे शब्द अधिक व्यापक असून 'साम्यबुद्धींत' या सर्वांचाच समावेश होतो, असें दिसून येईल." (पृ. ४४७) याप्रमाणें परब्रह्मरूपतत्त्वनिश्चयानें सर्व प्राण्यांविषयीं मनाची साम्यावस्था झाल्यावर, आणि मनुष्यांशीं तुलना करितां इतर प्राण्यांची अवस्था अत्यंत शोचनीय आहे ही वस्तुस्थिति ध्यानांत आल्यावर त्यांच्याच हितार्थ आयुष्य खर्चिणें हें साम्यावस्थेप्रत पोंचलेल्या महात्म्याचें कर्तव्य होत नाहीं काय? अशा थोर व उदारचरित पुरुषांची थोरवी श्री० शिवराम महादेव परांजपे यांनीं, 'चित्रमय जगत्' मधील जानेवारी १९१५ च्या अंकांतील आपल्या लेखांत वर्णिली आहे! पशुपक्ष्यांचें जीवित मनुष्यांहून अधिक दुःखमय व त्यांची स्थिति अवनत (भूतानां प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः गी. र. १०३ ) आहे, याबद्दल मतभेद असण्याचें कारण नाहीं.

वनस्पतिवर्ग हा सचेतनच असल्यामुळें, वरील साम्यावस्था अबाधित ठेवावयाची म्हणजे, प्रथम वनस्पतींचा आहार वर्जिला पाहिजे. म्हणून पशु, पक्षी व मासे यांवर हल्ला करावयाचा असेंही नाहीं—कारण तेही बिचारे प्राणीच आहेत. मग खावयाचें काय ? असो. वनस्पतींकडे दुर्लक्ष्य केलें तरी इतर प्राण्यांशींही सलोखा ठेवून मनुष्याचें भागत नाहीं. आजपर्यंत मानवजात दुष्ट प्राण्यांचा, क्रूर पशूंचा व विषारी जीवजंतूंचा संहार करीत आली, नव्हे सध्यांही हेंच काम प्रत्येक खेड्यांतून व शहरांतून चाललेलें असतें म्हणून मनुष्य पृथ्वीच्या पाठीवर दृग्गोचर होत आहे. उपरिनिर्दिष्ट साम्यावस्था त्याच्या मनांत बाणली असती तर तो केव्हांच नष्ट झाला असता. या युक्तिवादावर कदाचित् पुढील आक्षेप घेतां येईल, " इतर प्राण्यांपेक्षां मनुष्य श्रेष्ठ असल्यामुळें त्याची काळजी वहाणें हें आद्यकर्तव्य आहे. " पण मनुष्याला श्रेष्ठ कोणीं ठरविलें ? मनुष्यानेंच ना ? मनुष्याची श्रेष्ठता इतर प्राण्यांच्या काय कामाची ? त्यांपैकीं पुष्कळ जण मनुष्य जगांत आलाच नसता तरी अधिक सुखानें राहिले असते. त्यांच्या जीवितावर जेथें धोका येतो, मनुष्याच्या अस्तित्वासाठीं व सुखासाठीं त्यांचा पदोपदीं जेथें संहार करावा लागतो, तेथें त्याची श्रेष्ठता त्यांच्या काय उपयोगाची ?—सारांश, सर्व भूतांविषयीं साम्यावस्था मनांत ठेवावयाची म्हणजे मनुष्याला हितकारक असें कांहींच न करितां, अहितकारक तेवढें करावयाचें असा निष्कर्ष निघतो. कारण मनुष्यघातक प्राण्यांवर प्रेम आणि त्यांचें प्राबल्य, याचाच अर्थ मनुष्याचा नाश ! घोडा, बैल, गाई, म्हशी यांवर आपण प्रेम करतों, पण तें त्यांच्या कल्याणाकरितां नाहीं. त्यांपासून आपणाला त्रास अल्प व लाभ फार होतो म्हणून करतों. त्याच्या मुळाशीं केवळ परोपकारबुद्धि असती तर गाईप्रमाणेंच सर्पांचाही पांजरपोळ स्थापण्यास साम्यावस्थेस पोंचलेल्या महात्म्यानें आळस केला नसता. सर्वभूतहिताचें ध्येय बिकट आहे असें पाहून मनुष्यजातीपुरतीच साम्यबुद्धि ठेवावयाची असें प्रतिपादन करण्यांत आल्यास त्यालाही उत्तर आहेच. मनुष्यजातीविषयीं साम्यबुद्धि ठेवावयाची तर मग ती स्वराष्ट्रकार्यालाच कां

प्रवृत्त करील ? त्याहून अधिक अवनत असे देश पृथ्वीवर नाहींतच काय ? प्रथम त्यांना स्वराष्ट्राच्या दर्जास आणून पोंचविलें पाहिजे व मग स्वराष्ट्राकडे वळलें पाहिजे. सारांश, परब्रह्माचें सत्यत्व मनांत एकदां बिंबल्यावर निवृत्तिमार्गाचा अंगीकार केल्यावांचून गत्यंतरच उरत नाहीं.

( २ ) पण परब्रह्माचें सत्यत्व पटून तज्जन्य साम्यावस्था मनांत उत्पन्न झाल्यावर कार्याकडे प्रवृत्ति व्हावयाची कशी? कारण मनाची साम्यावस्था याचा अर्थ इष्टप्रीति व अनिष्टद्वेष यांचा अभाव होय. आणि यांपैकीं कोणतीही भावना व तदनुरूप गति उत्पन्न झाल्याशिवाय मुळीं कार्यच होत नाहीं. अर्थात् राष्ट्रकार्य काय अथवा मानवजातीचें कार्य काय, तें हातून व्हावयाला मनांत कोणत्या तरी प्रकारची इच्छा उद्भवलीच पाहिजे; आणि इच्छा उद्भवली कीं मनाच्या साम्यावस्थेवर कुऱ्हाड आलीच !

( ३ ) पण परब्रह्माचें सत्यत्व मनांत बाणलें तरी कर्म कोठें ताबडतोब सुटतें ? मग मन निर्विकार ठेवून राष्ट्रकार्य करावयाला हरकत काय ?— हें ह्मणणें अयुक्तिक आहे. कर्म सुटत नाहीं ही गोष्ट खरी. पण अधिक कर्म करीत राहणें हा कर्मापासून मुक्त होण्याचा मार्ग आहे काय ? समाधि, अशनपानत्याग अथवा फार तर संन्यासग्रहण हेच कर्म नष्ट करण्याचे मार्ग आहेत. राष्ट्रकार्य करीत रहाण्यानें कर्म नष्ट होण्याऐवजीं वाढण्याचाच संभव अधिक आहे. शिवाय मन निर्विकार ठेवून क्रिया करणें अशक्य आहे.

( ४ ) इतक्यावर, प्राण आहे तोंपर्यंत कर्तव्यच जर करावयाचें, तर भिक्षाशनासारख्या परावलंबी वृत्तीपेक्षां स्वावलंबन व लोकहितकार्य हेंच बरें, हें घटकाभर गृहीत धरलें तरी अडचण कायमच रहाते. लोकहित कशांत आहे ? परब्रह्माची ज्याला ओळख पटली आहे त्याच्या दृष्टीनें लोकांना परब्रह्मतत्त्व समजून सांगण्याव्यतिरिक्त कर्तव्यच नाहीं. राष्ट्रकार्याच्या आभासात्मक फंदांत पडून लोकांचीं आभासात्मक दुःखें कमी करण्यास प्रवृत्त होणें व तसलींच सुखें वाढविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आभासात्मक प्रपंचाची महती त्यांच्या मनांत अधिक बिंबवून त्यांना परब्रह्मज्ञानापासून दूर दूर लोटण्यासारखें आहे. सुखें व दुःखें हीं जर आभासमूलकच

आहेत तर लोकांच्या मनांत प्रपंचाचें आभासात्मकत्व बिंबवून दुःखांचें मूळच त्यांच्या हृदयांतून काढून टाकणें युक्त नव्हे काय?

( ५ ) पण लोकांची योग्यता अद्याप तितकी वाढली नाहीं. त्यांना परब्रह्माचें ज्ञान इतक्यांत होणें शक्य नाहीं. मग साम्यावस्थेप्रत पोंचलेल्या मनुष्यानें त्यांना ज्यांपासून दुःख होतें तीं कारणें नष्ट करण्याचा प्रयत्न कां करूं नये ? ह्मणणें बरें दिसतें. पण तें स्वतःचें ध्येय नष्ट करणारें आहे. लोकांची परब्रह्मज्ञानाकडे प्रवृत्ति कां होते.? संसार दुःखमय आहे ह्मणूनच ना ? ( प्र. ५ गी. र. ) स्पेन्सरप्रभृति पाश्चात्य तत्त्ववेत्ते संसार सुखमय ठरवूं पहातात, त्यांच्याविरुद्ध युक्तिवाद लढवून तो दुःखमय आहे असें शाबीत करण्याचा प्रयत्न लो. टिळकांनींच पांचव्या प्रकरणांत केला आहे ना ? मग लोकांचीं संसारांतील दुःखें कमी करण्यानें प्रचंड आपत्ति ओढवेल ! लोकांचें दुःख कमी होऊन त्यांचें सुख अधिक होईल, आणि मग त्यांची धर्माकडे व परब्रह्मज्ञानाकडे मुळीं प्रवृत्तिच व्हावयाची नाहीं. साम्यावस्थेस पावलेल्या ब्रह्मज्ञात्याचा हा प्रवृत्तिपर मोक्षमार्ग जर लोकांना मोक्षलालसेपासून परावृत्त करूं लागला, तर तो त्यांच्या काय कामाचा ?

( ६ ) बरें. समदृष्टि ब्रह्मज्ञाता राष्ट्रकार्याला प्रवृत्त होणार तो कशानें? लोक दुःखी आहेत व त्यांचें दुःख पाहून त्याला स्वतःला दुःख होतें ह्मणूनच ना ? अशा रीतीनें त्याला दुःख झाल्यावर त्याच्या मनाची साम्यावस्था कोठें राहिली ? दुःख होत नाहीं, कर्तव्य ह्मणून तो तें बजावतो असें ह्मणावें, तर कर्तव्य तरी कां करावयाचें ? कर्तव्य नाहीं बजाविलें तर स्वतःला खेद होतो ह्मणूनच ना ? याचा अर्थ दुःखामुळेंच तो कर्तव्याला प्रवृत्त होतो. मग साम्यावस्था राहिली कोठें ?

( ७ ) पण या सर्वांहून एक अत्यंत प्रबळ आक्षेप रहातोच.

गीतारहस्य, पृष्ठ ३५५ पहाः—

## लो० टिळकांचा प्रवृत्तिमार्ग मोक्षप्राप्तीला साधक ठरत नाहीं.

| | | |
|---|---|---|
| शास्त्रोक्त निष्काम कर्मांनीं परमेश्वराचें ज्ञान झाल्यावर अखेर वैराग्यानें सर्व कर्में सोडून केवळ ज्ञानांतच तृप्त होऊन रहाणें,—**केवळ ज्ञान, सांख्य** किंवा **स्मार्त मार्ग.** | **उत्तम.** | **मोक्ष.** |
| प्रथम चित्तशुध्द्यर्थ व त्यानें परमेश्वराचें ज्ञान प्राप्त झाल्यावर पुढें केवळ लोकसंग्रहार्थ आमरणांत भगवंताप्रमाणें निष्काम कर्में करीत रहाणें,—**ज्ञानकर्मसमुच्चय, कर्मयोग** किंवा **भागवत मार्ग.** | **सर्वोत्तम.** | |

यावरून लो. टिळकांच्या मतें सुद्धां प्रवृत्तिमार्गाप्रमाणें निवृत्तिमार्गानेंहि मोक्षप्राप्ति होते. मग निवृत्तिमार्गाचा त्याग करून प्रवृत्तिमार्गाचाच स्वीकार कां करावयाचा ? प्रवृत्तिमार्ग मोक्षसाधनाच्या आड येत नाहीं, हें कितीही कंठशोष व शब्दशोष करून सांगितलें तरी तेंच कार्य निवृत्तिमार्गानें अधिक बिनधोकपणें साध्य होतें तर प्रवृत्तिमार्गाचा अवलंब करून आपलें मोक्षसाधन धोक्यांत घाला कां ? प्रवृत्तिमार्ग मोक्षप्राप्तीला घातक होत नाहीं असें सिद्ध करण्याचा गीतारहस्यांत वाटेल तितका प्रयत्न केला असला तरी तो निवृत्तिमार्गापेक्षां अधिक पोषक होत नाहीं, हें तरी उघड आहेना ? लोकांच्या सुखवर्धनामुळें त्याला ' सर्वोत्तम ' म्हणण्याची बुद्धि रहस्यकारांना झाली असली तरी तें आभासात्मक सुखाचेंच वर्धन ना ? त्यामुळें लोकांची परब्रह्माची जाणीव तीव्रतर थोडीच होणार आहे ! शिवाय मनुष्य ध्येयप्राप्त्यर्थ जो मार्ग योजितो तो निर्धास्त असा पाहूनच योजितो. आतां परब्रह्मैक्य हें साध्य ठरल्यावर त्याला धास्ती कशाची ? मायाजालांत गुरफटून जाण्याचीच ना ? मग संसारांतील लोकांच्या माया-

जन्य सुखाची वृद्धि व दुःखाचा नाश करूं पहाणारा ब्रह्मज्ञाता माया-जालांत फसण्याचा संभव अधिक, कीं संसारापासून शक्य तितकें अलिप्त राहून केवळ परब्रह्माचें चिंतन करणारा कर्मावगुंठित होण्याचा संभव अधिक ? या प्रश्नाचें उत्तर निवृत्तिमार्गाला अनुकूलच मिळणार. मग लोकांनीं निवृत्तिमार्गापेक्षां प्रवृत्तिमार्गाला अधिक महत्त्व कां द्यावयाचें ? मोक्षसाधन हें ध्येय पहिल्या मार्गानें अधिक सुलभपणें व निर्धास्तपणें साध्य होत असतां दुसऱ्या मार्गाकडे लोकांना प्रवृत्त करण्याचा हेका कां ? जगांतील मायावश लोकांच्या आभासमूलक व ब्रह्माज्ञानमूलक सुखदुःखांची किंमत फार वाटते ह्मणूनच ना ? असल्या मिथ्या गोष्टींचें ज्यांस इतकें महत्त्व वाटतें त्यांना परब्रह्माची थोरवी व त्याचें सत्यत्व कितपत उमजलें याचा विचार करण्याचें कारणच नाहीं—असें निवृत्तिमार्गव्हाल्यांनीं म्हटल्यास त्यावर उत्तर काय ?

गीतेचें एकंदर धोरण प्रवृत्तिपर आहे हें उघडच आहे. एरव्हीं निवृत्ति-मार्गाचें अमृत अर्जुनाच्या घशांत ओतून त्याच्याकडून युद्ध करवावयाचें कसें ? मग एवढी साधी गोष्ट शंकराचार्यांसारख्यांच्या लक्ष्यांत कां आली नाहीं ? गीतेचा अर्थ निवृत्तिपरच आहे असें लोकांस भासविण्याचा अटो-काट प्रयत्न त्यांनीं कां केला ? याचीं दोन कारणें आहेत. एक तर सर्व प्रपंचाचें आभासात्मकत्व व जें दिसतें किंवा भासतें त्याहून भिन्न असणाऱ्या परब्रह्माचेंच कायतें सत्यत्व या मूलतत्त्वावर प्रवृत्तिमार्गाचा डळमळीत सुद्धां डोलारा अत्यंत परिश्रमानेंही उभा करतां येत नाहीं; आणि दुसरें कारण, गीता लोकप्रिय झाली असल्यामुळें तिच्या विरुद्ध मत प्रतिपादन करून तें लोकसंमत करणें शक्य नव्हतें. अर्थात परब्रह्माच्या तत्त्वाशीं सर्वस्वी सुसंगत दिसणारा निवृत्तिमार्गच वस्तुतः गीतेंत सांगितला आहे, असें उपदेशिणें त्यांना भाग पडलें असावें.

वरील विवेचनावरून, गीतारहस्यांत परब्रह्माच्या भावनेची व प्रवृत्तिपर मार्गाची सांगड घालण्याचा जो प्रयत्न केला आहे, त्याचा धर्मनिष्ठ लोकां-वर काय परिणाम होईल, हें उघड दिसतें. लोकांना निवृत्तिपर मार्ग प्रिय

झाला आहे व त्यामुळें ते राष्ट्रकार्यापासून व ऐहिक ऐश्वर्यवृद्धीस आवश्यक असलेल्या कर्तव्यापासून पराङ्मुख होत चालले आहेत असें पाहून, त्यांच्या मनांतील निवृत्तिमार्गावरील राष्ट्रहिंसक प्रेम नष्ट करावें व राष्ट्रोन्नति-कारक प्रवृत्तिमार्गाविषयीं त्यांच्या मनांत उत्कट भक्ति उत्पन्न करावी या स्तुत्य हेतूनें प्रेरित होऊन लो. टिळकांनीं हा प्रयत्न केला हें कोणासही नाकबूल करितां येत नाहीं. पण हेतु स्तुत्य असला तरी त्यामुळें होणाऱ्या कृतीचा लोकमतावर अनुकूलच परिणाम होईल असें ह्मणतां येत नाहीं. परब्रह्म सत्य आहे कीं मिथ्या आहे, प्रपंच वेदांत्यांनीं वर्णिल्याप्रमाणें मिथ्या आहे कीं सत्य आहे या वाटाघाटींत न पडतां गीतेंत परब्रह्मप्राप्तीचा जो मार्ग वर्णिला आहे तो प्रवृत्तिपर आहे येवढें सांगितलें असतें तर कदाचित् तें राष्ट्राच्या हिताला पोषक झालें असतें. पण तसें करण्याऐवजीं लो. टिळकांनीं गीतारहस्याचा अडीचशें पानांचा पूर्वार्ध परब्रह्माच्या सत्य-त्वाचा व प्रपंचाच्या असत्यत्वाचा निश्चय करण्याचे कामीं लाविला आहे. त्यांत त्यांनीं पाश्चात्य शास्त्रीय शोधांचा व पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांच्या वचनांचा आधार घेऊन व विचार करून, परब्रह्माच्या निश्चयाला ते शास्त्रीय शोध व तीं वचनें पोषक आहेत व ज्या बाबतींत तीं पोषक नाहींत त्या बाबतींत तीं चुकीचीं आहेत असें प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय संसारांत सुखापेक्षां दुःखच अधिक आहे, खरा आनंद आत्मविचारांतच आहे, आत्मविचारांत निमग्न झालेल्या बुद्धीलाच परम सुख मिळणें शक्य असतें (पृ. ११६), इंद्रियगम्य बाह्य सुख अथवा विषयसुख अनित्य आहे (पृ. ९३), इत्यादि परब्रह्माच्या कल्पनेला बळकटी आणणारीं मूलभूत विधानें सत्य आहेत असें दाखविण्याचाही त्यांत प्रयत्न केला आहे. या पूर्वार्धाच्या वाचनानें वैराग्यप्रवृत्त हिंदु लोकांच्या मनांत संसाराचें निःसारत्व अधिकच बाणल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. प्रपंचाच्या आभासात्मक-त्वाची, त्याबरोबर पृथ्वीच्या असत्यत्वाची, पृथ्वीवरच असणाऱ्या हिंदु-स्थानाच्या असत्यत्वाची व स्वाभाविकपणेंच त्यांत वावरणाऱ्या लोकांच्या व त्यांच्या सुखदुःखांच्या मिथ्यात्वाची त्यांची भावना या उपदेशानें दृढ

होणार हें उघड आहे. हा अनिष्ट परिणाम मनावर एकदां झाला म्हणजे मग उत्तरार्धांत वर्णिलेल्या प्रवृत्तिमार्गाकडे कोण लक्ष्य पुरविणार? अध्यात्म-प्रकरणांत सांसारिक सुखदुःखें खोटीं व आभासमूलक आहेत असें सांगावयाचें व नंतर "जगाच्या धारणपोषणार्थ" (पृ. ४९१) जन्मभर निष्काम कर्म आचरण्याचा उपदेश करावयाचा! जगच जर आभासमूलक तर त्याचें धारणपोषण कां करावयाचें? लोकांच्या असत्य दुःखांचा लय करण्याच्या फंदांत पडून आपल्या मनाची साम्यावस्था बिघडविण्याचा प्रयत्न कां करावयाचा? बरें, मोक्षसाधनाला प्रवृत्तिमार्ग हाच एक मार्ग आहे असें ह्मणावें तर तेंही नाहीं. निवृत्तिमार्ग मोक्षसाधनाला तितकाच उपयुक्त आहे. मग लोक इतके दिवस मनांत बाणलेला निवृत्तिमार्ग सोडून प्रवृत्तिमार्गाकडे व राष्ट्रकार्याकडे प्रवृत्त कां होतील? उलट, अनेक पाश्चात्य शास्त्रीय शोधकांनीं व तत्त्वज्ञान्यांनीं सुद्धां शेवटीं आमच्या परब्रह्म-निश्चयाला पोषक असेंच तत्त्व प्रतिपादन केलें आहे, हें समजल्यावर सामान्यजनसमूहाच्या मनांतील परब्रह्मश्रद्धा अधिक बळावून ते निवृत्ति-मार्गाकडे अधिकच प्रवृत्त होतील. हा प्रयत्न, खुंटा हालवून बळकट करण्याप्रमाणें आहे. याचा परिणाम लोकांना अधिक धर्मवेडे बनविण्यां-तच होणार.

हिंदुधर्मांचीं—नव्हे हिंदुस्थानांतील बहुतेक धर्मांचीं—मतें वैराग्यपर व संसाराचें निःसारत्व उपदेशिणारीं असल्यामुळें, त्यांनीं जरी हिंदुसमाजाचीं नीतिबंधनें दृढ ठेवून त्याचें अस्तित्व कायम ठेविलें आहे, तरी त्यानींच फाजील व अवास्तव इंद्रियनिग्रहाचा उपदेश करून समाजाचें चैतन्य नष्टप्राय करून टाकिलें आहे—समाजाची वाढ खुंटविली आहे—समाजाच्या मनोवृत्ति जाळून टाकिल्या आहेत. अर्थात् संसाराचें निःसारत्व व शारीरिक सुखाचें असत्यत्व लोकांच्या मनांत बिंबविणारीं हिंदुधर्मांचीं मूलतत्त्वें लोकांच्या मनांतून नाहींशीं केल्याशिवाय–निदान तीं सुप्तप्राय केल्याशिवाय ऐहिक सुखाचें व प्रगतीचें महत्त्व मनांत बिंबून राष्ट्रोन्नति होणें शक्य नाहीं. पण हें ध्येय साधण्यासाठीं हिंदुस्थानांतील एकंदर

# राष्ट्रप्रेमाच्या जागृतीनें होणारा फायदा.

धर्माच्या मूलतत्त्वांवर हल्ला करणें धोक्याचें आहे. कारण त्या योगानें लोकांचीं नीतिबंधनें शिथिल होण्याचा संभव आहे. बरें, त्यांचा या मूलतत्वांवरील विश्वास नष्ट करूं नये तर त्यांची राष्ट्रीय प्रगति होणें कठीण. याप्रमाणें राष्ट्रकार्य करणाऱ्या थोर पुरुषाला दोहोंकडून अडचण दिसूं लागते. पण अशा बिकट परिस्थितींतूनही योग्य मार्ग काढण्यांतच देशभक्ताचें खरें चातुर्य प्रकट होतें. देशाभिमानाच्या वृद्धीला ज्या वैराग्यपूर्ण धर्ममतांचा अडथळा आला त्यांना स्पर्श न करतां, बुद्धिमान् देशभक्त फक्त त्यांपासून झालेल्या अनिष्ट परिणामांकडेच लोकांचें लक्ष्य आकृष्ट करितो; त्यांच्या मनांत स्वदेशप्रीतीचें व राष्ट्रभक्तीचें अद्वितीय तेज जागृत करून त्यांना प्रगतीच्या मार्गानें भराभर पुढें नेतों. या स्वदेशप्रीतीच्या स्वर्गीय भावनेची अंतःकरणांत जागृति झाली म्हणजे त्यापासून काय काय परिणाम होतात हें पहाणें अत्यंत आवश्यक व आल्हादकारक आहे. (१) एक तर त्यामुळें सर्व देशबंधूंचें हित तेंच आपलें स्वतःचें हित ही उच्च भावना मनांत बिंबून सार्वजनिक कार्यें जबाबदारीनें व प्रामाणिकपणानें पार पाडण्याची पात्रता अंगीं येते. त्याबरोबर नीतीचीं खरीं तत्त्वेंहि हृदयांत बिंबतात; कारण, देशाचें कल्याण हें स्वतःच्या कल्याणापेक्षां अधिक महत्त्वाचें आहे हें तत्त्व मनांत रुजल्यावर समाजाच्या अस्तित्वास विघातक अशीं चोरी, लबाडी इत्यादि अनीतीचीं कृत्यें करण्याकडे प्रवृत्ति होते कशाला? (२) दुसरा परिणाम म्हणजे, ज्या वैराग्यपर धर्ममतांनीं समाजाचें चैतन्य नष्ट केलें त्या मतांकडे दुर्लक्ष्य होतें—त्यांवरील विश्वास उडाला नसला तरी तीं हृदयांत सुप्तावस्थेंत पडून रहातात. कारण राष्ट्रोन्नतीसारख्या ऐहिकसुखाभिवृद्धीकडे व देशबांधवांच्या सांसारिक ऐश्वर्याच्या वाढीकडे लक्ष्य पूर्णपणें वेधून राहिल्यावर, वैराग्याचें व संसाराच्या असारत्वाचें स्तोम माजविणाऱ्या धर्मतत्त्वांची आठवण केव्हां होणार? याप्रमाणें धर्मनिष्ठेनें नीतिबंधनें कायम ठेवून समाजाचें अस्तित्व अबाधित ठेवण्याचें जें राष्ट्रकार्य बजाविलें तें तर देशाभिमानाच्या जागृतीनें सिद्धीला जातेंच; पण त्याबरोबरच धर्माच्या वैराग्यपर

उपदेशानें जें राष्ट्राचें अकल्याण केलें तें दूर होऊन राष्ट्र पुनः सजीव होऊं लागतें. दुष्ट जातिबंधनें नाहींशीं केल्यावांचून व वैराग्य उपदेशिणाऱ्या धर्माचीं मूलभूत तत्त्वें खोडून काढल्यावांचून देशाची प्रगति होणें शक्यच नाहीं हें एकांगी तत्त्व प्रतिपादणाऱ्या समाजसुधारकांनीं वरील सत्याकडे लक्ष्य पुरवावें. कारण राष्ट्रोन्नतीला विघातक व राष्ट्रचैतन्याच्या नाशास कारणीभूत होणारीं हीं कृत्रिम जातिभेदाचीं बंधनें व धर्माचीं वैराग्यपर तत्त्वें हळूहळू शिथिल व निद्रिस्त करण्याचें कार्यच राष्ट्रप्रेमाच्या जागृतीनें होत असतें. आपल्या देशबंधूंचें कल्याण हें ध्येय ज्यांच्या मनांत बिंबलें आहे, देशहिताला आवश्यक अशीं सार्वजनिक कर्तव्यें जबाबदारीनें पार पाडण्यास ज्यांचीं मनें तयार झालीं आहेत, राष्ट्रकार्यासाठीं स्वार्थाकडे थोडेंबहुत दुर्लक्ष्य करण्यास जे प्रवृत्त झाले आहेत, त्यांच्या मनाला, कृत्रिम जातिभेदाच्या, कृत्रिम उच्चनीचत्वाच्या व मनुष्यजातीस कलंक लावणाऱ्या स्पृश्यास्पृश्यत्वाच्या क्षुद्र व तिरस्करणीय कल्पनांचा विटाळ होतो कशाला? आणि अहर्निश राष्ट्राच्या व तदंतर्गत आत्मबांधवांच्या ऐहिक ऐश्वर्यासाठीं तळमळणाऱ्या हृदयांत संसाराचें निःसारत्व प्रतिपादणारीं धर्ममतें डोकें वर काढतात कशाला? याप्रमाणें, जें कार्य घडवून आणण्याचा खरे समाजसुधारक प्रयत्न करीत असतात, जे दोष नाहींसे करण्यासाठीं ते सारखे झटत असतात तेंच कार्य—त्याच दोषांचा नाश देशप्रेमाच्या जागृतीनें होत असतो.

उलटपक्षीं, कृत्रिम जातिभेद असूनही आमच्या देशाची उन्नति होणें शक्य आहे, धर्मानें प्रतिपादिलेलीं संसाराच्या निःसारत्वाचीं व ऐहिकसुखाच्या आभासात्मकत्वाचीं मतें लोकांच्या मनांत दृढ राहूनही राष्ट्र उन्नतीच्या शिखरास पोंचणें शक्य आहे असें म्हणणेंही गैरशिस्त व स्वकार्यविघातक आहे. जो जातिभेद राष्ट्राच्या एकीच्या व जीं धर्ममतें राष्ट्राच्या चैतन्यवृद्धीच्या आड आलीं तो व तीं कायम राहूनही आह्मी पुढें पाऊल टाकूं—नव्हे त्यांचें महत्त्व गाण्यानें व तीं दृढ केल्यानेंच आमचें हित होणार आहे हें म्हणणें किती असमंजसपणाचें आहे? आपण अंगिकारिलेल्या

# सामाजिक सुधारणेमुळें राष्ट्रोन्नतीस होणारी मदत.

राष्ट्रप्रेमजागृतीच्या व समाजाच्या प्रगतीच्या मार्गांतील जातिभेदाचे व धर्ममतांचे कंटक दूर करण्याचा जे समाजसुधारक प्रयत्न करीत आहेत त्यांच्या प्रयत्नांचा तिरस्कार करणें, प्रसंगीं त्यांच्या कार्यांत व्यत्यय आणणें हें स्वतःच्या ध्येयप्राप्तीला कितपत पोषक होईल याचा राजकीय पुढाऱ्यांनीं विचार करावयास नको काय? असें करणें म्हणजे ज्या प्रगतीच्या मार्गानें पुढें चालण्याविषयीं आपण लोकांना प्रोत्साहन देतों त्याच मार्गांत स्वतःचा आडवा पाय घालणें होय. जातिभेदाचें महत्त्व गाणाऱ्या व आपल्या पूर्वजांनीं उपदेशिलेल्या वैराग्यपर धर्ममतांचें स्तोम माजविणाऱ्या पुढारी राष्ट्रकार्यकर्त्यांनीं इकडे लक्ष्य पुरवावें.

समाजांतील धर्ममतांचा व कृत्रिम जातिभेदासारख्या दुष्ट रूढींचा फोलपणा व त्यांपासून होणारी जबरदस्त हानि ही लोकांच्या मनांत बिंबवून समाजसुधारकांच्या अग्रणीनें उन्नतीचा मार्ग खुला करून द्यावयाचा असतो; व त्याबरोबरच या सत्यप्रकाशामुळें असत्यश्रद्धेवर अवलंबून असलेली लोकांची नीतिमत्ता डळमळूं लागली असतां, त्यांच्या हृदयांत देशप्रेमाची व समाजसेवेची भावना उत्पन्न करून व तिच्या बळकट पायावर त्यांची नीतिमत्ता उभारून त्याच राष्ट्रभक्तीच्या दिव्य शक्तीनें त्यांना प्रगतीचा मार्ग आक्रमावयास लावणें हें चतुर राजकीय पुढाऱ्याचें थोर कर्तव्य असतें. याप्रमाणें वस्तुतः समाजसुधारक व राजकीय पुढारी यांचीं कर्तव्यें परस्परपोषक व एकाच ध्येयाची सिद्धि करून देणारीं आहेत. मात्र एकाचें काम दुसऱ्यास करतां येत नाहीं. स्वदेशप्रीतीची भावना लोकांच्या अंतःकरणांत उत्पन्न करावयाची ती उपदेशापेक्षां स्वतःच्या उदाहरणानेंच अधिक चांगल्या रीतीनें उत्पन्न करतां येते. स्वार्थत्याग, देशहिताविषयीं कळकळ, थोर सद्गुण इत्यादिकांच्या साह्यानेंच केवळ राजकीय पुढारी होतां येतें. त्याशिवाय लोक त्याचें अनुकरण करीत नाहींत. त्याचा कित्ता लोकांनीं गिरविण्यास तो पुरुष लोकप्रिय असला पाहिजे. पण लोकप्रेमसंपादन अथवा लोकसंग्रह करण्यास, त्यांच्या मनांत रुजलेल्या धर्ममतांचें असत्यत्व अथवा त्यांच्या हाडींमासीं खिळून

गेलेल्या जातिभेदासारख्या रूढींचें अयथार्थत्व उघड उघड प्रतिपादन करून भागत नाहीं. राजकीय पुढाऱ्यानें फक्त देशाच्या सामान्य अवनतीचें आविष्करण करून त्याच्या उन्नतीस पोषक असें राष्ट्रप्रेमरूपी अमृत आपल्या देशबांधवांच्या मुखांत ओतावयाचें असतें. तर नेहमीं लोकांचे दोष दाखविणारा, त्यांच्या दुष्ट रूढींची न्याय्य पण अप्रिय विटंबना करणारा व त्यांच्या राष्ट्रचैतन्यापहारक धर्ममतांचें असत्यत्व उपदेशिणारा समाजसुधारक सामान्य जनतेस प्रिय होणें अशक्य असल्यामुळें त्याचें अनुकरण करण्यास अर्थातच लोक तयार होत नाहींत, आणि त्यामुळें स्वदेशभक्तीचें दिव्य तेज त्यापासून ग्रहण करण्यास अज्ञ लोक प्रवृत्त होत नाहींत: तथापि त्याच्या उपदेशामुळें विचारी व सुज्ञ लोकांच्या मनावर अनुकूल परिणाम होतो व ज्यांमधून राष्ट्राचे पुढारी निर्माण व्हावयाचे तो बुद्धिमान् वर्ग देशसेवेचें कार्य करण्यास अधिकाधिक पात्र होऊं लागतो. अशा रीतीनें समाजसुधारक व राजकीय पुढारी यांचीं कर्तव्यें जरी भिन्नभिन्न असतात तरी तीं दोन्ही त्याच ध्येयसिध्व्यर्थ असल्यामुळें एकानें दुसऱ्याविरुद्ध मतें प्रतिपादन करण्याचें कारण नसतें. लोकप्रियतेच्या बळावर देशप्रेमाची भावना जागृत करणें हें जरी राजकीय पुढाऱ्याचें कर्तव्य असलें तरी त्यानें ती लोकप्रियता लोकांना आवडणाऱ्या घातक रूढींची व चैतन्यहारक धर्ममतांची प्रशंसा गाऊन संपादन करावयाची नसते. असें करणें म्हणजे स्वतःच्या मार्गांत स्वतःच अडचणी उत्पन्न करणें होय. पण समाजसुधारकाग्रणी देशांतील दुष्ट चालीरीतींवर व घातक धर्ममतांवर हल्ला करूं लागला म्हणजे स्वाभाविकपणेंच अज्ञ बहुजनसमाजाचीं मनें क्षुब्ध होतात; आणि अशा प्रसंगीं त्यांची बाजू घेऊन लढणारा विद्वान् पुरुष त्यांच्या आदरास व प्रेमास पात्र होतो. लोकप्रियतेचा हा मोह अनावर होऊन, आंतून निराळीं मतें धारण करणारे बुद्धिमान् पुरुष पुष्कळदां लोकानुरंजनाच्याच नादाला लागतात; आणि पुढें तेच पुरुष राष्ट्रप्रेमाचा व राष्ट्रोन्नतीच्या मार्गांचा उपदेश लोकांना करूं लागले म्हणजे समाजसुधारक त्यांच्या पूर्वींच्या मतप्रतिपादनावर टीका

करूं लागतात. स्वाभाविकपणेंच, " समाजसुधारणा झाल्याशिवाय राजकीय प्रगति होणें शक्य नाहीं, " हें एकांगी तत्त्व समाजसुधारक प्रतिपादूं लगतात; आणि, " राजकीय प्रगतीस समाजसुधारणेची आवश्यकता नाहीं; नव्हे, सामाजिक रूढि व धर्ममतांची तीव्रता तशीच कायम ठेवून सुद्धां राष्ट्राची प्रगति होईल; फार काय, धर्ममतांची परम जागृति व जातिभेदासारख्या रूढींची बळकटी ह्याच राष्ट्रोन्नतीला पोषक आहेत!" हें सर्वनाश करणारें मत अज्ञजनाराधनांत कृतकृत्यता मानणारे राजकीय पुढारी (!) उपदेशूं लागतात! हा प्रकार राष्ट्राच्या प्रगतीला कधींही साहाय्यक होणें शक्य नाहीं हें अगदीं उघड आहे. समाजाची उन्नति करण्यास समर्थ असे बुद्धिमान्, देशबांधवांविषयीं कळकळ बाळगणारे व स्वार्थत्यागी पुरुष जर याप्रमाणें स्वतःचें सामर्थ्य परस्परांचे प्रयत्न निष्फल करण्याकडेच खर्चूं लागले तर राष्ट्रकार्य कोणीं करावयाचें? राष्ट्रकार्य दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांच्या हृदयांत, फार तर तोंडांतच राहतें आणि प्रत्यक्ष परिणाम अत्यंत अनिष्ट होतो.

महाराष्ट्रांत कांहीं अंशीं वरीलप्रमाणेंच प्रकार झाला आहे. लोकप्रियतेच्या व लोकसंग्रहाच्या बळावर देशभक्तीची उज्ज्वल व स्वर्गीय भावना आपल्या देशबांधवांच्या मनांत जागृत करून त्यांच्याकडून उन्नतीचा मार्ग आक्रमविण्यास परम समर्थ असलेल्या टिळकांसारख्या लोकमान्य व लोकप्रिय पुढाऱ्यानीं, ज्या धर्ममतांनीं संसाराचें निःसारत्व व ऐहिक सुखाचें व ऐश्वर्याचें आभासात्मकत्व लोकांच्या मनांत बिंबवून त्यांच्या जीविताचा नाश केला, तींच धर्ममतें सत्य आहेत असें प्रतिपादन केलें आहे. अनेक पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांच्या व सृष्टिशास्त्रज्ञांच्या वचनांचा आधार घेऊन व स्वतःचें बुद्धिचातुर्य लढवून त्यांनीं परब्रह्माचें सत्यत्व सिद्ध करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. इहलोकचीं सुखदुःखें आभासात्मक आहेत, आत्मविचारांत निमग्न होण्यांत परमसुख आहे, प्रपंचासारखा खोटा पदार्थ दुसरा नाहीं, या संसारांत सुखापेक्षां दुःखच अधिक आहे, इत्यादि मतांच्या प्रतिपादनानें राष्ट्रकार्याला व राष्ट्रोन्नतीला काय साह्य होणार

हें समजत नाहीं. यापासून अपाय मात्र भयंकर होणार. या उपदेशानें व असल्या विद्वान् पुरुषाचा पाठिंबा मिळाल्यानें लोकांच्या मनांतील सुप्त धर्मभावना जागृत होणार व ती त्यांचें मन ऐहिक सुखदुःखांपासून व उन्नतीपासून परावृत्त करून त्यांना साम्यावस्थेकडे खेंचीत नेणार. ही साम्यावस्था म्हणजे राष्ट्राच्या चैतन्याचा नाश होय, हें उघडच आहे !

[ जेथें संघटित समाजच नाहीं तेथें सामाजिक सुधारणा कसली ? आणि जेथें राष्ट्राचाच मागमूस नाहीं तेथें राजकीय प्रगति कसली ? सारांश, जातिभेदासारख्या मानवजातीच्या तोंडास काळोखी फासणाऱ्या रूढि नाहींशा करून एका जीवाचें राष्ट्र निर्माण करण्याचे प्रयत्न जिच्या मुळाशीं नाहींत तिला—सामाजिक काय अथवा राजकीय काय—सुधारणाच म्हणतां येत नाहीं. पण सध्यां तर चमत्कारिकच प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो. कृत्रिम उच्च व नीच श्रेणी निर्माण करणाऱ्या हिंदुधर्माचे स्तुतिपाठ गाऊन अन्याय्य समाजस्थिति अधिकाधिक दृढ करणें हेंच सामाजिक सुधारणेच्या नांवाखालीं मोडते; आणि एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होण्यास अवश्यक असलेल्या प्रयत्नांचा गंधही नसलेल्या चळवळीला, ती प्रस्थापित राजसत्तेच्या विरुद्ध आहे येवढ्याच सबबीवर, राजकीय हें विशेषण प्राप्त होतें ! अशा सुधारकांना सामाजिक सुधारक अथवा राष्ट्रीय पुढारी म्हणणें म्हणजे गाईची हत्या करण्यासाठीं तिला स्तंभाप्रत बांधणाराला गोहत्या-प्रतिबंधक म्हणण्याप्रमाणें आहे ! ]

# प्रकरण दुसरें.

संसारांत मनुष्याला दुःखापेक्षां सुख अधिक आहे असें लोकांना वाटणें उपयोगाचें नाहीं. तसें झालें कीं धर्माचा पाया डळमळूं लागून त्यावर उभारलेला आभासात्मक डोलारा रसातळास आलाच ह्मणून समजावें. त्यामुळें कोणत्याही धर्माची चिकाटी पाहिल्यानें " संसार दुःखमय आहे— सुख असलें तरी तें दुःखापेक्षां अल्पतरच ! " असें प्रतिपादण्याची असते. अर्थात् लोकमान्य टिळकांनाही हेंच सिद्ध करणें आवश्यक झालें आहे. आतां संसारांत सुखापेक्षां दुःख अधिक आहे यामुळें जर धर्माची आवश्यकता भासते, तर देशबांधवांचें दुःख कमी कां करावयाचें व राष्ट्रोन्नतीचा खटाटोप कां आरंभावयाचा हें समजत नाहीं. कारण त्या योगानें दुःख कमी होऊन धर्मावर पाणी पडावयाचें ! असो.

संसारांत दुःखापेक्षां सुख अल्पतर आहे असें प्रत्येक जण ह्मणतो पण वस्तुस्थिति तशी नाहीं. दुःखच अधिक आहे अशी प्रत्येकाची खात्री असती तर मनुष्यानें तावडतोब आत्महत्या केली असती. जें जीवित सुखापेक्षां दुःखाचाच अनुभव जास्त घ्यावयास लावितें तें असून तरी काय कामाचें ? केवळ सुखाच्या खोट्या आशेनें मनुष्य जीवित कंठतो ह्मणावें, तर ही आशा कोठून आली ? पूर्वजांच्या अनुभवानेंच ना ? जगांत कितीही संकटें आलीं, तरी प्रत्यक्ष जिवंत रहाणें हेंच इतकें सुखमय आहे कीं त्यापुढें इतर दुःखांची किंमत नाहीं.

" आत्महत्या केली तरी दुःख चुकत नाहीं; या जन्मांत नाहीं पुढील

जन्मांत भोगावें लागेल; त्या अर्थीं दुःखाच्या मूळ कारणाचा उच्छेद करणेंच बरें; असें धर्म सांगतो ह्मणून मनुष्य जिवंत रहातो ! " असें कोणी ह्मणतील; पण त्यांत हंशील नाहीं असें विचारांतीं दिसून येईल. कारण धर्मावर, ईश्वराच्या आस्तित्वावर अथवा परलोकावर विश्वास न ठेवणारीं अनेक माणसें जगांत आहेत आणि तीं आत्महत्या न करितां आयुष्य क्रमीत आहेत, असें आपण पहातों. यावरून वरील धर्माची सबब कुचकामाची ठरते. शिवाय ज्यांना धर्माची कल्पनाही असणें शक्य नाहीं, असे पशुपक्षीही जगण्याचीच इच्छा करीत असतात. त्यांना कोणी ठार मारूं लागलें, तरी संतोषानें मान पुढें करतांना कधींही तीं दिसत नाहींत. याप्रमाणें सामान्यतः संसारांत दुःखापेक्षां सुख अधिक आहे याला बळकट पुरावा आहे. वरील " तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें दुःख अधिक आहे तर लोक आत्महत्या कां करीत नाहींत ? " हें विधान खोडण्याचा लोकमान्य टिळकांनीं प्रयत्न केला आहे; पण तो निषेधात्मक विरुद्ध विधानानेंच केला आहे. त्यांत युक्तिवादाचा अंशही नाहीं:—

" ते आत्महत्या करीत नाहींत हें खरें; पण त्याचें कारण काय याचा जर सूक्ष्म विचार केला तर असें दिसून येईल कीं, ' मी पशु नसून मनुष्य आहें, ' यांतच प्रत्येक इसम आनंद मानीत असतो, .....अर्थात् मनुष्य किंवा पशुपक्षी जीव देत नाहींत एवढ्यावरून त्यांचा संसार सुखमय आहे असें भ्रामक अनुमान न काढितां, संसार कसाही असो, त्याची अपेक्षा न ठेवितां केवळ अचेतनाचें सचेतन बनण्यांतच अनुपम आनंद आहे...... एवढेंच काय तें खरें अनुमान त्यापासून निघतें. " (पृ. १०३)

पहा ! सूक्ष्म विचार करून " अचेतनाचें सचेतन बनण्यांतच अनुपम आनंद आहे " हेंच अनुमान त्यांनीं काढलें. हें त्यांच्या प्रतिपक्ष्याच्या विधानाला कसें बाधक होणार कोणास ठाऊक ! ते तरी हेंच ह्मणतातः—
" जिवंत रहाण्यांतच ( सचेतनपणांतच ) इतका अनुपम आनंद आहे कीं त्यापुढें इतर दुःखांची किंमत नाहीं, आणि ह्मणूनच मनुष्य आत्म-

हत्या करीत नाहीं ! " याप्रमाणें लोकमान्य टिळकांचा युक्तिवाद त्यांच्या प्रतिपक्ष्याच्या विधानाला पोषकच झाला आहे.

" मनुष्य जीव देत नाहीं किंवा जिवंत रहातो, हें संसाराच्या प्रवृत्तीचें कारण आहे; आधिभौतिक पंडित ह्मणतात त्याप्रमाणें सुखाधिक्याचा पुरावा नाहीं. " (पृष्ठ १०४)

मनुष्य जिवंत रहातो ह्मणून प्रजोत्पत्ति होते व संसार चालतो हें उघडच आहे. पण दुसऱ्या वाक्यानें फक्त प्रतिपक्ष्याचें ह्मणणें नाकबूल करण्यापेक्षां अधिक होत नाहीं. तें वाक्य आयुष्यांत दुःखच अधिक आहे असें विधान करितें, त्यांत दुःखाधिक्याचा पुरावा सांपडत नाहीं.

यावरून जगांत दुःखापेक्षां सुख अधिक आहे हें उघड दिसतें. दुःखाधिक्याची घातक कल्पना धर्मानेंच माणसाच्या डोक्यांत भरविलेली आहे. ती स्वाभाविक नाहीं. पण यावर कोणी प्रश्न करील, " मग जगांत धर्माची आवश्यकता कां भासली ? संसारांत दुःखापेक्षां सुख अधिक आहे, तर धर्मच मुळीं अस्तित्वांत कां आला ? " याचें कारण, मिळतें तितक्या सुखानें मनुष्याची तृप्ति होईना; दुःख अजीबात नष्ट व्हावें असें त्याच्या महत्त्वाकांक्षी मनाला वाटूं लागलें; तसेंच उत्कृष्ट प्रकारचें सुख अनंतकाल—चिरकाल नव्हे—भोगण्याची हाव त्याच्या मनांत उद्भवली. शिवाय, या जगांत पुष्कळदां अन्याय दिसून येतो, इतरांवर परोपकार करून त्यांना सुखी करणारा माणूस दुःख भोगीत असलेला, व इतरांना दुःख देणारा माणूस ऐषआरामांत पडलेला दिसतो; या स्थितीचा खुलासा करण्यासाठीं परलोक, ईश्वराचें अथवा कर्माचें अस्तित्व वगैरे मानणें लोकांना आवश्यक भासूं लागलें. जगांत अहर्निश चाललेलीं कृत्यें कोणत्या तरी अतर्क्य व अमर्याद शक्तीमुळेंच चालतात यांत शंका नाहीं. याच सत्यावर अनंतशक्ति परमेश्वराची उभारणी करण्यांत आली; आणि जगांत चाललेल्या अन्यायाबद्दल प्रायश्चित्त देण्याचें काम त्या ' अगम्य ' परमेश्वरावर सोंपविण्यांत आलें. त्याची शक्ति अमर्याद मानल्यावर प्राण्यांचें

उत्पादकत्व त्याच्यावरच लादणें भाग पडलें. त्याची उपासना केली असतां तो लोकांना तारतो असें कल्पिण्यांत येऊन हा दुःखमुक्तीचा मार्ग ठरला.

पण या तत्त्वसमुच्चयावर आक्षेप फार जबर आहेत. ईश्वरानें जीवसृष्टि मुळीं निर्माणच कां केली ? लोकांना दुःखांत लोटण्याकरितां ? त्याची उपासना केल्यानें लोक दुःखमुक्त होतात ह्मणावें, तर तशी बुद्धि तो लोकांना कां देत नाहीं ? कीं प्राण्यांचे हाल पहाण्यांतच त्याला मजा वाटते !

याप्रमाणें एकट्या न्यायी परमेश्वरावर सर्व सोंपवून निर्वाह होईना तेव्हां त्याला कर्माची अथवा मायेची जोड देण्यांत आली. मनुष्य स्वतःच्या दुष्कृत्यानें आपणावर दुःख ओढून घेतो, कारण त्याच्या दुष्कृत्यांचें प्रायश्चित्त देणें हें ईश्वराचें कर्तव्य आहे. ज्या मायेमुळें मनुष्य संसारांत फसतो ती माया परब्रह्मरूप परमेश्वराचाच अंश मानला जातो, व मायेचें मिथ्या स्वरूप जाणून शुद्ध परब्रह्मरूप परमेश्वराशीं स्वतःचें ऐक्य करणें म्हणजे मोक्ष होय असें ठरतें. मायेचा अंमल जास्त फैलावला म्हणजे परमेश्वर अवतार घेऊन मानवी दुःखांचा संहार करतो. त्यानंतर मायेचा अंमल जास्त बसेपर्यंत पुनः ईश्वर अवतार घेत नाहीं.

याप्रमाणें केवळ न्यायी परमेश्वर मानिल्यानें येणारे आक्षेप, त्याच्या जोडीला माया (मग ती आभासात्मक कां होईना) मानून व परब्रह्मरूप परमेश्वराचें ऐक्य प्रतिपादण्यासाठीं तिलाही त्याचाच अंश समजून (परब्रह्म सत्य तर माया असत्य कशी, ही शंका शंकाकारांनीं वाटेल तशी शमवून घ्यावी !), दूर करण्याचा हा प्रयत्न आहे. म्हणजे मनुष्याचीं दुःखें मायेमुळें अथवा मायावश होऊन त्यानें केलेल्या दुष्कृत्यांमुळें उद्भवतात आणि परमेश्वर स्वतःचें खरें स्वरूप व मायेचें आभासात्मकत्व प्रकट करून त्यांचा संहार करतो. पण मनुष्यांचीं सगळीं दुःखें नष्ट करण्याचें, त्यांना अथवा सर्वच प्राण्यांना मायामुक्त करण्याचें प्रयोजन परमेश्वराला कधींच दिसत नाहीं असें दिसतें. तसें करण्याचें त्याला सामर्थ्य नाहीं ह्मणावें तर त्याच्या सर्वशक्तिमत्त्वावर घाला येतो. मार्ग दाखविण्याचें काम त्याचें आहे, त्याप्रमाणें वागून स्वतःची मुक्ति करण्याचें काम मनुष्याचें आहे असें ह्मणावें तर ती मोक्षलालसा

ईश्वर प्रत्येकाच्या मनांत कां उत्पन्न करीत नाहीं ? कांहीं असो. सर्वांना मुक्त करण्याचें कार्य ईश्वर करीत नाहीं हें खास ! त्यांना तो दुःखांतच तळमळूं देतो. मायाही त्यांच्या दुःखांचा कडेलोट करून सर्व प्राण्यांना त्या दुःखांच्या वेदनेनें नष्ट करून टाकीत नाहीं. माया आणि ईश्वर या दोघांनीं हा डाव मांडला आहेसें दिसतें; ( अथवा परब्रह्मरूप परमेश्वरच कधीं मायेचें तर कधीं मार्गदर्शक महात्म्याचें रूप घेऊन जगांत येतो, असें ह्मणावें; ) व त्यांचा हेतु, प्राण्यांना मुक्तही करावयाचें नाहीं आणि उत्पन्नही करावयाचें नाहीं—तर त्यांना सुखदुःखाच्या द्वंद्वांत निरंतर ठेवून गंमत पहात बसावयाचें असा दिसतो! या आक्षेपांचें महत्त्व लक्षांत आणून जैनांनीं कर्मालाच सर्वतोपरी प्राधान्य दिलें आहे. एकटा जगच्चालक ईश्वर त्यांनीं मानिला नाहीं. त्यांच्या मतें निरनिराळे आत्मे मुक्त झाले ह्मणजे अनंतसुखांत मग्न होतात;पण त्यांचें कर्म नष्ट झालें असल्यामुळें लोकांना सुखी करण्याच्या पंचाइतींत पडण्याचें कारण त्यांना उरलेलें नसतें.पण विचारी परमेश्वर कल्पूनहि ज्या गूढाचा उलगडा होत नाहीं तेथें जैनाचें जड कर्म काय करणार?

कर्मावरचा—पापपुण्यावरचा—विश्वास उडाला तर जगांत नीतीनें वागण्याचें कांहींच प्रयोजन उरलें नाहीं, ही एक कर्मवाद्यांची नेहमींची तक्रार असते. पण तीही निराधार आहे हें अनेक कारणांमुळें सिद्ध होतें.

आपले पैसे एखाद्यानें बुडविले म्हणजे कर्मवादाचा आश्रय घेऊन आपण त्यास ह्मणतों, " तुला हें देणें पुढच्या जन्मीं माझा चाकर होऊन अथवा माझ्या घरीं बैल होऊन फेडावें लागेल. ( धनको शेतकरी, टांगेवाला अथवा महात असेल त्याप्रमाणें ऋणकोला बैल, घोडा अथवा हत्ती व्हावें लागतें. ) " पण त्यावर बुडव्याजवळही उत्तर असतेंचः— " तूं माझे पैसे मागच्या जन्मीं बुडविले नव्हते कशावरून ? आणि त्याच तुझ्या दुष्कृत्याचें उसनें ह्मणून मीं हें कृत्य केलें नसेल कशावरून ? कदाचित् तुला शासन करण्याकरितांच ईश्वरानें मला ही बुद्धि दिली असावी ! " नेपोलियन आपल्या साम्राज्यपदलोलुप महत्त्वाकांक्षेला अशाच कांहीं तरी तत्त्वाचा आधार घेत असे. "यूरोपांतील राजेलोकांनीं आपल्या प्रजाजनांवर

जुलूम चालविले आहेत. त्यांना शासन करून त्यांची प्रजा बंधमुक्त करण्या-करितांच परमेश्वरानें मला उत्पन्न केलें आहे!" असें तो ह्मणे. शिवाय पापपुण्या-वरील श्रद्धेशीं नीतिमत्तेचा संबंध आहे असें दिसत नाहीं. पापपुण्यावर मुळींच श्रद्धा नसलेले अनेक पुरुष शुद्धाचरणी असलेले व पापपुण्यावर विश्वास ठेवणारे लोक अनीतिपंकांत रुतलेले पुष्कळदां दिसून येतात.

अध्यात्मवादाशिवाय नीतिमत्तेची उपपत्ति नीट लागत नाहीं असें लोक-मान्य टिळकांचेंही ह्मणणें आहे. परब्रह्मरूप सत्य मनांत पूर्णपणें उतरून सर्व भूतांविषयीं साम्यावस्था आणली ह्मणजेच नीतिमत्तेची निर्दोष उपपत्ति लागते असें दाखविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. पण त्यावर मागें एकदां निर्दिष्ट केलेला जबर आक्षेप आहे. "सर्वभूतांविषयीं" साम्यबुद्धि ठेवावयाची ह्मणजे पशुपक्ष्यांचीही मनुष्यांइतकीच काळजी वहाण्याचा प्रसंग ओढवतो, आणि अनेक मनुष्येतर प्राण्यांच्या हितसंबंधांचा मनुष्याच्या खुद्द अस्तित्वाशीं विरोध असल्यामुळें, त्यांचा पक्ष घेण्याच्या नादांत मनुष्यांचें अकल्याण होणार हें स्पष्ट दिसतें. मग मनुष्यजातीच्या सुखावर व प्रत्यक्ष अस्तित्वावर गदा आणणारी ही उच्च नीतिमत्ता मनुष्याच्या काय कामाची?

अशा प्रकारचे व मिलसारख्या बुद्धिमान् तत्त्ववेत्त्यांच्या नीतिशास्त्रावर येणारे आक्षेप लक्ष्यांत घेऊन प्रसिद्ध तत्त्ववेत्ता स्पेन्सर यानें उत्क्रांतिवादाच्या साह्यानें नीतिमत्तेची सुसंगत व निर्दोष उपपत्ति दिली आहे. मानवजाती-च्या उच्चतम उन्नतीचें व कल्याणाचेंच ध्येय त्यानें पुढें ठेविलें आहे. सर्व-भूतहिताचें लक्ष्य पुढें ठेवून मनुष्यजातीच्या अस्तित्वावर धोंड आणण्याची चूक त्यानें केली नाहीं. त्याच्या मतांचा सारांश लोकमान्य टिळकांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें दिला आहेः—

ज्या अर्थीं आपल्याप्रमाणेंच आपल्या संततीचें व ज्ञातीचें परिपोषण करणें आणि कोणाला इजा न करितां आपल्या बांधवांस होईल तितकी मदत करणें हा गुण लहान किड्यापासून मनुष्यापर्यंत अधिकाधिक व्यक्त होत चाललेला आढळून येतो, त्या अर्थीं सजीव सृष्टीच्या वर्तनाचें हें मुख्य धोरण आहे, असें म्हटलें पाहिजे. सजीव सृष्टींत हें धोरण प्रथमतः

संतति उत्पन्न करणें आणि तिचें संगोपन करणें या गोष्टींत दिसून येतें. स्त्रीपुरुष हा भेद ज्यांच्यांत झालेला नाहीं, अशा अत्यंत सूक्ष्म किड्यांच्या सृष्टींत देखील एक किड्याचा देह वाढतां वाढतां तो फुटून त्याचे दोन किडे बनतात; किंवा संततीसाठीं ह्मणजे परक्यासाठीं हा लहान किडा आपला देह विसर्जन करतो ह्मटलें तरी चालेल. तसेंच सजीव सृष्टींत या किड्याच्या वरच्या वरच्या पायरींचे स्त्रीपुरुषात्मक प्राणीहि याचप्रमाणें आपल्या संततीच्या संगोपनार्थ स्वार्थत्याग करण्यांत आनंद मानीत असतात; आणि हा गुण पुढें वाढत जाऊन अगदीं रानटी समाजांतहि मनुष्य आपल्या संततीलाच नव्हे, तर आपल्या ज्ञातिबांधवांनाही मदत करण्यास सुखानें प्रवृत्त होत असतो. ह्मणून सजीव सृष्टीचा शिरोमणि जो मनुष्य त्यानें परार्थांतच स्वार्थ मानण्याचें सृष्टीचें हें चढतें धोरण पुढें चालवून स्वार्थ व परार्थ यांच्या दरम्यान सध्यां भासणारा विरोध कायमचा काढून टाकण्याचा प्रयत्न करावा, हेंच या जगांतील त्याचें इतिकर्तव्य होय. गीतारहस्य पृ.९०–९१.

नंतर ते लिहितात:—“ युक्तिवाद बरोबर आहे......परंतु लहान किड्यापासून मनुष्यापर्यंत सृष्टीची उत्तरोत्तर चढती पायरी लक्ष्यांत आणिली ह्मणजे दुसरा असाही प्रश्न निघतो कीं, परोपकारबुद्धि या एकाच सद्‌गुणांत मनुष्याचा उत्कर्ष झाला आहे, किंवा त्याबरोबर न्यायबुद्धि, दया, शहाणपणा, दूरदृष्टी, तर्क, शौर्य, धृति, क्षमा, इंद्रियनिग्रह इत्यादि दुसऱ्या अनेक सात्त्विक सद्‌गुणांचीही वाढ झाली आहे ? ...... या सर्व गुणांच्या समुच्चयास आपण तूर्त ‘ माणुसकी ’ असें नांव देऊं. परोपकारापेक्षां माणुसकी याप्रमाणें श्रेष्ठ ठरल्यावर...एकट्या परोपकारबुद्धीवर भिस्त ठेवून कसा तरी निर्वाह करण्यापेक्षां ... ‘ माणुसकी ’ ज्या कर्मानें वाढेल किंवा त्या माणुसकीस जें शोभेल तेंच सत्कृत्य किंवा तोच नीतिधर्म असें आतां ह्मटलें पाहिजे. ”

अर्थात् माणुसकीच्या उच्च दर्जापर्यंत न पोंचणारी स्पेन्सरची नीतिमत्तेची उपपत्ति लंगडी पडली.

लो. टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें ‘माणुसकी’रूप गुणसमुच्चय स्पेन्सरच्या

परोपकाराच्या मर्यादेच्या बाहेर पडतो कीं काय हें पाहिलें पाहिजे. सुधारलेल्या राष्ट्रांतील मनुष्य लोकांशीं चांगल्या रीतीनें वागतो, तो केवळ " प्रत्येकानें असें केलें नाहीं तर समाजाचें अस्तित्व कसें राहील ? समाज नष्ट झाल्यावर माझें सुख व अस्तित्व तरी कोठलें ?" या विचारानें वागत नसून, अथवा केवळ कायद्याच्या किंवा जननिंदेच्या भीतीनें तो सदाचरणाला प्रवृत्त होत नसून, ह्यांपैकीं बऱ्याच सत्प्रवृत्ति वंशपरंपरागत संस्कारानें त्याच्या अंगीं बाणलेल्या असतात; व पुष्कळशीं सत्कृत्यें तो स्वभावतःच करीत असतो. इतरांच्या कल्याणांतच प्रत्येकानें स्वतःचें कल्याण स्वभावतः समजणें ही मानवजातीच्या नीतिमत्तेची परमावधि असून अनुकूल परिस्थिति कायम राहिल्यास केव्हांना केव्हां तरी मनुष्यसमाज त्या स्थितीला पोंचणार, असें स्पेन्सरचें म्हणणें आहे. आतां, इतरांच्या कल्याणांत स्वतःचें कल्याण मानावयाचें म्हटल्यावर त्यांत न्यायबुद्धि आलीच. कारण न्यायबुद्धिविरहित मनुष्य दुसऱ्याचें अहित करून स्वार्थाचें घोडें पुढें ढकलण्यास कमी करीत नाहीं. अर्थात् न्यायबुद्धि मनांत पूर्णपणें बिंबल्याशिवाय परार्थांतच स्वार्थ समजणें शक्य नाहीं. 'माणुसकी'रूप गुणसमुच्चयांतला दुसरा गुण दया. ही मनांत उत्कृष्ट रीतीनें वसत असल्याशिवाय परार्थांत स्वार्थ समजणें अल्प रीतीनेंही शक्य नाहीं हें उघड आहे. तिसरा गुण शहाणपण, व चौथा दूरदृष्टि. हे दोन्ही गुण परार्थांत स्वार्थ समजणाऱ्या थोर पुरुषाच्या अंगीं पूर्णपणें बाणलेले नाहींत असें केवळ स्वार्थपरायण व आकुंचित वृत्तीच्या माणसाशिवाय कोणीही म्हणणार नाहीं. कारण केवळ त्याच्याच दृष्टीनें, स्वतःचें सोडून दुसऱ्यांच्या पंचाइती करणें हें मूर्खपणाचें व अदूरदार्शित्वाचें लक्षण ठरतें ! पांचवा गुण तर्क. परार्थांत म्हणजे जनहितांत स्वार्थ समजणारा मनुष्य वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार असणार, मग तो तसल्या सत्कार्यासाठीं आपल्या अंगीं असलेली तर्कशक्ति तरी कां खर्ची घालणार नाहीं ? पण ज्या अध्यात्मवादप्रसूत साम्यावस्थेच्या जोरावर लोकमान्य टिळकांनीं या माणुसकीची सुसंगत उपपत्ति अर्थात् लाविलेली असणार त्या साम्यावस्थेशीं

तर्कनैपुण्याचा कसा संबंध जुळतो हें समजत नाहीं. मनाची सर्व भूतांविषयीं साम्यावस्था म्हणजे उत्कृष्ट प्रतीची नीतिमत्ता होय—असें जर आहे आणि नीतिमत्तेंत माणुसकीचा आणि माणुसकींत जर तर्कशक्तीचा समावेश होतो, तर तर्कशक्तीची परमावधि झाल्याशिवाय साम्यावस्था हृदयांत बिंबणें शक्य नाहीं हें उघडच दिसतें. पण ज्या परब्रह्माच्या ज्ञानानें साम्यावस्था मनांत उतरते तें परब्रह्म जाणून घेण्यास प्राचीन ऋषींच्या अनुभवासच शरण गेलें पाहिजे असें लोकमान्यांचें ठासून म्हणणें आहे. [ गी. र. पृ. १९६. ] " स्वभावतःच ज्यांचें मन पवित्र व विशाल अशा थोर थोर ऋषींनीं मन अंतर्मुख करून आत्म्याच्या स्वरूपाबद्दलचा आपला अनुभव किंवा त्यासंबंधानें आपल्या शुद्ध व शांत बुद्धीला जें स्फुरण झालें तें उपनिषद्ग्रंथांतून सांगितलें आहे. म्हणून कोणत्याही अध्यात्मतत्त्वाचा निर्णय करितांना अखेर या श्रुतिग्रंथांतील अनुभवास शरण जाण्याखेरीज आपणांस दुसरा मार्ग रहात नाहीं. " ] आतां तर्क कोठें गेला ? असो. सहावा गुण शौर्य. शरीरसामर्थ्य पहिल्या प्रतीचें असणें तें शौर्य असें लो. टिळकांचें म्हणणें असल्यास स्पेन्सरच्या नीतिमत्तेंत या गुणाचा समावेश होणें शक्य नाहीं; पण तो मनाच्या साम्यावस्थेवर उभारलेल्या नीतिमत्तेंतही व्हावयाचा नाहीं. कारण मनुष्यापेक्षां कांहीं पशुच अधिक बळकट असतात. म्हणून शौर्यगुणाचा तसा अर्थ असणें शक्य नाहीं. लोकसंरक्षणार्थ अंगीं असेल तें सामर्थ्य खर्ची घालणें, प्राणावर बेतली तरी माघार न घेणें असाच त्याचा अर्थ असणार; आणि परार्थांतच सर्वस्वी स्वार्थ मानणारा मनुष्य तसें करणार हें निःसंशय आहे. याप्रमाणें तो गुण स्पेन्सरच्या नीतिमत्तेच्या उपपत्तींत पूर्णपणें अंतर्भूत झाला. धृति अथवा धैर्य असल्याशिवाय शौर्याची उच्च कोटि प्राप्त होणें शक्यच नाहीं. तेव्हां त्याचें पृथक् विवेचन करणें व्यर्थ आहे. आठवा गुण क्षमा. आकुंचित स्वार्थाची यत्किंचित् हानि झाली कीं दुसऱ्यावर संतापणाऱ्या मनुष्याला कितपत क्षमाशील म्हणावयाचें याची फोड करण्याचें कारणच नाहीं. अर्थात् ज्याचा स्वार्थ सर्वतोपरी परार्थांतच लीन

झाला आहे त्याच्या अंगीं खरी क्षमा पूर्णपणें बाणलेली असावयाचीच. राहतां राहिला इंद्रियनिग्रह. हा कोठवर करावयाचा ? याला मर्यादा काय ? बाकीच्या गुणांना पोषक होईल तितपतच ना ? नाहीं तर फाजील इंद्रियनिग्रहाच्या मागें लागून अंगचें शौर्य नाहींसें व्हावयाचें व अदूरदृष्टित्वाचा आरोप येऊन, तर्क, शहाणपण, धृति इत्यादिकांचाही लोप व्हावयाचा; आणि इंद्रियनिग्रहाची परमावधि होऊन प्राणनाश झाला म्हणजे सगळी माणुसकीच विलीन व्हावयाची ! अर्थात् बाकीचे गुण पूर्णावस्थेंत राहतील व जनहित करण्याचें शारीरिक व मानसिक सामर्थ्य कायम राहील तितकाच इंद्रियनिग्रह योग्य होय. तितका इंद्रियनिग्रह असल्याशिवाय उपरिनिर्दिष्ट गुण पूर्णदशेला पोंचणेंच शक्य नाहीं. आणि ते गुण परार्थांत स्वार्थ मानणाऱ्या विभूतींच्या अंगीं उत्कृष्ट प्रतीचे असतात हें आतांपर्यंत दाखविलेंच–अर्थात् इंद्रियनिग्रहही त्यांच्या ठिकाणीं असणारच.

यावरून स्पेन्सरनें प्रतिपादिलेल्या परोपकारबुद्धींत या गुणांचा समावेश होत नाहीं हें म्हणणें कितपत सयुक्तिक ठरतें याचा सहज निर्णय होईल.

पण बिचाऱ्या स्पेन्सरवर लो. टिळकांची थोडीशी करडी नजर दिसते. एके ठिकाणीं तर त्याच्या वाक्यांतील शब्दांचा पूर्णपणें अर्थविपर्यास करून त्याच्या तोंडून गीता वदविली आहे ! गीतारहस्य पृ. ३२६:—

" सामान्य लोक कोणतेंही कर्म करण्यास फलाशेनेंच जरी प्रवृत्त होत असले तरी शहाण्या पुरुषानें फलाचा आग्रह न धरितां शांततेनें व उत्साहानें आपलें कर्तव्य करीत राहिलें पाहिजे, असा गीतेप्रमाणें त्यांनींही ( स्पेन्सरनें ) ' समाजशास्त्राचा अभ्यास ' या आपल्या ग्रंथाच्या अखेरीस सिद्धांत केला आहे. " यावर टीपः—

" Thus admitting that for the fanatic, some wild anticipation is needful as a stimulus, and recognising the usefulness of his delusion as adapted to his particular nature and his particular function, the man of higher type must be content

with greatly moderated expectations, while he perseveres with undiminished efforts. He has to see how comparatively little can be done, and yet find it worth while to do that little: so uniting philanthropic energy with philosophic calm." Spencer's Study of Sociology. या वाक्यांत fanatics या ऐवजीं 'प्रकृतीच्या गुणांनीं वेडावलेले (गी. ३. २९) किंवा 'अहंकारविमूढ' (गी. ३. २७), अगर भासकवीचा 'मूर्ख' हा शब्द, आणि man of higher type याच्या जागीं 'विद्वान्' (गी. ३. २५), व greatly moderated expectations याच्या जागीं 'फलौदासीन्य' किंवा 'फलाशात्याग' हे समानार्थक शब्द घातले म्हणजे गीतेंतल्याच सिद्धान्ताचा स्पेन्सरसाहेबांनीं जणूं काय अनुवाद केला आहे असें दिसून येईल !"

स्पेन्सरच्या लिहिण्याचा आशय पुढीलप्रमाणें स्पष्ट करतां येईलः— एखाद्या सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकांच्या अंगीं जे सद्गुण दिसून येतात ते एकाच जन्मांत मानवजातीनें मिळाविलेले नसतात. वंशपरंपरेनें संस्कार येतात, या नियमाप्रमाणें पूर्वीच्या प्रत्येक पिढीनें संपादन केलेल्या सद्‌गुणांचे संस्कार सध्यांच्या पिढींत दिसून येत असतात. याप्रमाणें जर एका पिढीनें मिळविलेले बुद्धिमत्तादिक सद्‌गुण दुसऱ्या पिढींत संस्काररूपानें उतरते ना, व पहिली पिढी जन्मतांना ज्या दर्जाची होती त्याच दर्जाची पुढील पिढी जन्मती तर राष्ट्राची उन्नति करणें अशक्य झालें असतें. या पिढीची उन्नति संस्काररूपानें पुढच्या पिढीस मिळून ही व तिनें नवीन संपादन केलेली उन्नति तिसऱ्या पिढीस संस्काररूपानें प्राप्त होते; म्हणून हजारों वर्षांच्या स्वार्थत्यागी लोकांच्या परिश्रमानें इंग्लंडसारखीं राष्ट्रें आज उन्नतावस्थेस पोंचलीं आहेत, व याच कारणामुळें हिंदुस्थानांतील ब्राह्मणवर्ग सामान्यतः इतर वर्गांपेक्षां निःसंशय अधिक बुद्धिमान् आहे. याप्रमाणें वंशपरंपरेनें चांगले वाईट संस्कार येतात हें निर्विवादपणें सिद्ध झाल्यावर एखाद्या सुधारलेल्या राष्ट्रांतील मनुष्याच्या अंगीं दिसून येणारी शारीरिक व मानसिक उन्नति अनेक पिढ्यांनीं मिळविलेल्या

उन्नतीमुळें आलेली आहे—ती एकाच पिढींत मिळविलेली नाहीं हें उघड होतें. या गोष्टींचा विचार करून समाजाची सुधारणा करूं इच्छिणाऱ्यानें ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे, कीं आपण आपल्या प्रयत्नांनीं जी सुधारणा घडवून आणणार ती सध्यां समाजाची जी उन्नति झालेली आहे त्या मानानें अगदींच अल्प असणार. कारण सध्यांची उन्नति शेंकडों पिढ्यांचें कार्य आहे. अर्थात् या सुधारकानें आपण घडवून आणणार असलेल्या सुधारणेचें ध्येय बेताबाताचेंच ठेवणें युक्त आहे. नाहीं तर भलतेंच असंभाव्य ध्येय ठेविल्यानें, व स्वाभाविकपणेंच तें साध्य होत नाहीं असें परिश्रमांतीं कळून आल्यावर, त्याची निराशा होऊन तो कर्तव्यपराङ्मुख होण्याचा पूर्ण संभव असतो; अथवा अधिक वाईट गोष्ट ही कीं, तो सरकारच्या मदतीनें व कायद्याच्या जोरानें ती सुधारणा घडवून आणण्या-साठीं बळजबरीचे उपाय अंमलांत आणण्याच्या नादास लागतो; व अशा रीतीनें समाजाचें उलट नुकसान करितो. करितां शहाण्या माणसानें एकंदर वस्तुस्थितीचा व परिस्थितीचा योग्य विचार करून शक्य असेल तेंच ध्येय पुढें ठेवावें; म्हणजे त्याची निराशा न होतां त्याच्या हातून कर्तव्य बजाविलें जाईल व समाजाचें हित होईल. मात्र जेवढी अल्प सुधारणा आपल्या प्रयत्नांनीं होणारी आहे ती करणें आवश्यक असून त्या कार्याप्रीत्यर्थ आयुष्य खर्चिणें योग्य आहे हें त्यानें जाणलें पाहिजे; व उत्साहानें आणि शांतपणानें काम केलें पाहिजे.

यावरून स्पेन्सरचें म्हणणें काय आहे हें उघड होतें. भलतीच सुधा-रणा घडवून आणूं अशी आशा बाळगणें वेडेपणाचें आहे; त्या योगानें निराशा होऊन कर्तव्यच्युति होण्याचा व समाजाचें अहित होण्याचा संभव आहे; करितां शहाण्या समाजसुधारकानें शक्य तितकेंच बेताचें ध्येय मनांत ठेवावें. पण याचा अर्थ, आपल्या प्रयत्नांनीं जी समाजसुधारणारूप फलप्राप्ति होणार तिची आशा त्यानें सोडावी असें स्पेन्सर मुळींच म्हणत नाहीं. आपल्या प्रयत्नांनीं भलतेंच व असंभाव्य फल प्राप्त होईल अशी आशा ठेवूं नये, पण संभाव्यफलप्राप्तीची मात्र उत्कट आशा ठेवावी असा त्याच्या म्हणण्याचा

भावार्थ आहे असें स्पष्ट दिसतें. [ ध्येयसिद्धि करण्याची उत्कट इच्छा मनांत ठेविली नाहीं तर हातून प्रयत्न होतील कसे? फलाविषयीं औदासीन्य ठेवणाऱ्या साम्यावस्थेस पोंचलेल्या मनुष्यांत आणि स्वस्थ बसून राहणाऱ्या परब्रह्मज्ञात्यांत मानसिक दृष्ट्या फरक काय? मनांत इच्छाच जर नाहीं तर तो कार्याकडे प्रवृत्त होणार कसा? ] पण लो. टिळकांनीं greatly moderated expectations याचा 'फलौदासीन्य' किंवा 'फलाशात्याग' असा अर्थविपर्यास करून "गीतेंतल्याच सिद्धांताचा स्पेन्सरसाहेबांनीं जणूं काय (!) अनुवाद केला आहे असें दिसून येईल!" असें विधान ठोकून दिलें आहे. याऐवजीं, "गीतेंतील निष्कामकर्मकर्त्याची व स्पेन्सरच्या उत्साही समाजसुधारकाची सांगड घालण्याच्या कामांत लोकमान्य टिळकांनीं जणूं काय (?) सत्यापलाप केला आहे असें दिसून येईल!" असें म्हणणें रास्त होईल. कारण, मनाची साम्यावस्था राहून--फलप्राप्तीविषयीं उत्कट इच्छा मनांत न ठेवतां—कोणतेंही कार्य उत्साहानें होणें शक्य आहे, असें स्पेन्सर तरी निदान कधींही म्हणणार नाहीं. moderated expectations याचा अर्थ 'अल्पफलाविषयीं इच्छा' असा आहे; moderated याचा संबंध फलाकडे आहे; आशेशीं त्याचा संबंध नाहीं. असंभाव्य फलाची आशा न ठेवतां योग्य फलाची आशा ठेवावी हें स्पेन्सरचें म्हणणें आहे.

'निष्काम कर्म' याचा अर्थ, लोककल्याणाचें कर्तव्य बजावतांना त्यांत स्वार्थी हेतु ठेवावयाचा नाहीं, असा असेल तर त्याविषयीं मतभेद असणें शक्य नाहीं. पण जें लोकहित साधावयाचें त्याविषयीं उत्कट इच्छा मनांत ठेवावयाची नाहीं, लोकहितसिद्धीच्या बाबतींत मन पूर्ण उदासीन ठेवावयाचें, असें म्हटल्यावर हातून कर्तव्य व्हावयाचें कसें? ज्याला लोकहिताची कळकळ नाहीं, देशाची अवनति झालेली पाहून ज्याचें मन रात्रंदिवस तळमळत नाहीं, देशबांधवांचें हित साधण्यासाठीं जो पहिल्या प्रतीचा उत्कंठित नाहीं, देशसेवेचें कर्तव्य आपण बजाविलें नाहीं तर आपल्या मनाला आल्हाद होणें मुळींच शक्य नाहीं असें ज्याला वाटत

नाहीं, त्या साम्यावस्थेस पोंचलेल्या माणसाच्या हातून कर्तव्य होणार कसें? इच्छेवांचून कोणतेंही कार्य हातून होत नाहीं आणि मनाची विकृति [साम्यावस्थेचा नाश] झाल्याशिवाय इच्छा उत्पन्न होत नाहीं, हें त्रिकाला-बाधित व सर्वजनसंमत तत्त्व सांगण्याकरितां कंठशोष करणें जरूर आहे काय? मनाची विकृति झाल्याशिवाय इच्छा व कार्यकर्तृत्व उद्भवत नाहीं; अर्थात् कार्यकर्तृत्व म्हणजे साम्यावस्थेवर घाला आलाच; हें जाणूनच साम्यावस्थेनें प्राप्त होणारा मोक्ष निवृत्तिमार्गानेंच मिळणार असा सिद्धांत शंकराचार्यादिकांनीं केला. मनाची इष्टानिष्टफलौदासीन्यरूप साम्यावस्था आणि जनहिततत्परताप्रेरित कार्यकर्तृत्व यांचा परस्परविरोध आहे; या एक-मेकांपासून दूर असलेल्या दोन्ही डगरींवर हात ठेवण्याचा प्रयत्न करणें म्हणजे हातपाय न हालवितां नदीच्या प्रवाहाविरुद्ध पोहण्याची आकांक्षा करण्याइतकें हास्यास्पद आहे.

स्पेन्सरची नीतिमीमांसा पुढें दिल्याप्रमाणें आहे:—संस्कार वंशपरंपरेनें येतात आणि ते अनुकूल परिस्थिति प्राप्त झाल्यास दृढ होतात व प्रतिकूल परिस्थिति मिळाल्यास त्यांत फरक होतो; मनुष्य रानटी अवस्थेंत असतांना नीतीच्या संस्काराचा त्याच्या अंगीं अंशही नव्हता. पण समाजव्यवस्थेची वाढ जसजशी होत गेली तसतसे नीतिचे गुण त्याच्या अंगीं येऊं लागले. समाजाचें अस्तित्व याचाच अर्थ समाजाच्या अस्तित्वाला आवश्यक अस-लेल्या निर्बंधांचें प्रतिपालन होय. प्रत्येक समाजांत सामाजिक व्यवस्थेला पोषक असलेल्या गुणांबद्दल मनुष्याची प्रशंसा व तिला घातक असलेल्या गुणांबद्दल तिरस्कार व्हावयाचाच; शिवाय समाजाविरुद्ध वर्तन करणारास शासन मिळतें तें निराळेंच. यामुळें आरंभीं आरंभीं जें नाइलाजास्तव करावें लागत होतें तेंच वंशपरंपरेनें मनुष्याच्या अंगवळणीं पडतें; शेवटीं तो संस्कारच बनून जातो, व त्याप्रमाणें वागण्यांतच त्याला सौख्य वाटतें. सुधारलेल्या समाजांतील बहुजनसमूहाच्या नीतिची गोष्ट हीच असते. पर-स्पराशीं सलोख्यानें वागण्यांत, परस्परांचा संबंध येईल तेथें परस्परांची सोय पहाण्यांत, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें इतरांचें नुकसान होईल असें

न वागण्यांत व देशासाठीं प्रसंग पडेल तेव्हां स्वार्थत्याग करण्यांत त्यांना स्वभावतः आनंद वाटतो. तसें वर्तन करतांना त्यांना मुद्दाम मनोनिग्रह करावाच लागत नाहीं. अद्याप बरीचशी नीतिमत्ता या रीतीनें संस्कारमय बनावयाची शिल्लक राहिलेली आहे ही गोष्ट खरी; पण अनुकूल परिस्थिति मिळत गेल्यास कालांतरानें सर्व सद्गुण मनुष्याच्या अंगीं संस्काररूपानें बाणावयास हरकत नाहीं. देशासाठीं, व पुढें राष्ट्राराष्ट्रांचें परस्परवैर नष्ट झाल्यावर मानवजातीच्या सुखासाठीं झटण्यांतच प्रत्येकाला आनंद वाटूं लागेल. याप्रमाणें प्रत्येकाचा स्वार्थ परार्थांतच विलीन झाला म्हणजे अर्थातच कोणालाही आपण सध्यां ज्याला स्वार्थत्याग म्हणतो तो करण्याचा प्रसंग येणार नाहीं व मानवजातीच्या नैतिक उन्नतीची व सांसारिक सुखाची परमावधि होईल.

याप्रमाणें स्पेन्सरनें नीतिमत्तेची उपपत्ति दिलेली आहे. जीं नैतिक कृत्यें आपण स्वाभाविकपणें करतों—नव्हे जीं करण्यांत आपणाला आनंद वाटतो तीच नीतिमत्ता खरी होय. याप्रमाणें सर्वच नीतिमत्ता संस्कारमय व्हावयाला पाहिजे. असें झालें म्हणजे मी अमुक एक गोष्ट कर्तव्य म्हणून करतों, अशी जाणीवच रहात नाहीं. ज्याप्रमाणें मातेला आपल्या बालकास स्तनपान कराविण्यांत परमानंद वाटतो, मुलाला पाजणें हें आपलें कर्तव्य म्हणून आपण करतों अशी जाणीव तिला नसते, तसाच प्रकार नीतिमत्तेचा व्हावयास पाहिजे. थोर पुरुषांच्या अंगीं आपणाला हे गुण दिसून येतात. परोपकार, राष्ट्रकार्य, मानवजातीचें कल्याण इत्यादिकांतच अत्यंत उत्साहानें व आनंदानें आपलें आयुष्य घालविणारे अनेक महात्मे पृथ्वीवर दृष्टोत्पत्तीस येतात.

नीतीनें वागलें नाहीं तर मनाला समाधानच वाटूं नये, नीतीनें वागण्यांत परमसौख्य वाटून आपण कर्तव्य करतों ही भावनाच विलीन व्हावी—ही स्पेन्सरच्या मतें खरी नीतिमत्ता होय. आतां मनाच्या साम्यावस्थेवर अवलंबून असलेल्या नीतिमत्तेची उपपत्ति वरील उपपत्तीशीं तुलना करितां काय किंमतीची ठरते तें पाहूं.

ज्याच्या मनांत सर्वांभूतीं एकाच आत्म्याचें तत्त्व बिंबलें आहे व जो " आत्मवत् सर्वभूतानि " लेखतो तो पशुपक्ष्यादिकांचें व वनस्पतींचेंच कल्याण करीत कां रहाणार नाहीं, हा प्रश्न तूर्त बाजूस ठेवूं. तो मनुष्य-जातीपुरतेंच पहाणार असें धरून वरील उपपत्ति सरळ पायांनीं चालते कीं " लंगडी पडत्यें " हें पाहूं.

प्रपंचाचें व प्रापंचिक सुखाचें आभासात्मकत्व व एकाच परब्रह्माचें सत्यत्व ज्याच्या मनांत बाणलें आहे असा साम्यावस्थेस पोंचलेला पुरुष केवळ कर्तव्य म्हणून कर्में करीत रहाणार. तो अनासक्त बुद्धीनें कामें करीत असल्यामुळेंच त्याला कर्मबंध होत नाहीं. अर्थात् परोपकारार्थ झटतांना त्याचें सर्व मन—नव्हे, किंचित् सुद्धां मन त्या कार्यांत गढलेलें असणें शक्य नाहीं अथवा त्यांत त्याला आनंद वाटणें शक्य नाहीं. कारण हा खटाटोप आहे प्रपंचविषयक आणि त्याचा आनंद असणार परब्रह्मज्ञानमूलक. असल्या प्रपंचाच्या खटपटींत त्याला आनंद वाटला कीं तो आसक्तचेतस् झाल्यामुळें त्याला कर्मबंध झालाच. तो " केवळ कर्तव्य ह्मणून " हीं कर्में करीत रहाणार; आणि " हीं कृत्यें आपल्या साम्यावस्थेस बाधक तर होत नाहींत ना ? " हा विचार त्याच्या मनांत नेहमीं येत रहाणार. कारण हीं प्रपंचविषयक कर्में त्याच्या परब्रह्मज्ञानाला पोषक होणें मुळींच शक्य नाहीं. झालीं तर तीं घातकच व्हावयाचीं. अशा रीतीनें परोपकारादिक क्रिया करण्यांत ज्याला आनंद होत नाहीं त्याला तीं केली नाहीं तरी दुःख तरी कां व्हावें ? याप्रमाणें लोककल्याणार्थ कर्तव्य बजावण्यांत आनंद वाटत नाहीं, तीं न बजावलीं तरी दुःख वाटत नाहीं, अशी नीतिमत्तेची उच्च कोटि काय किंमतीची समजावयाची हें उघडच दिसतें. आणि या तृतीयप्रकृति नीतिमत्तेच्या उपपत्तीपुढें, मानवजातीच्या कल्याणार्थ झटण्यांतच परमानंद वाटणें ही नीतिमत्तेची उच्च कोटि होय, असें प्रतिपादणाऱ्या स्पेन्सरची उपपत्ति " लंगडी पडत्यें " हें आश्चर्य होय !

पण ' सर्वांभूतीं एकच आत्मा ' हें तत्त्व अंगीं बाणलेला पुरुष लोक-कल्याणार्थ स्वभावतःच कां झटणार नाहीं ? नाहींतर त्याचें हें मनाचें

साम्य कायम रहाणार कसें ?—कबूल. पण त्याबरोबरच–नव्हे त्याच्यापूर्वी "परब्रह्म हेंच सत्य, प्रपंच व तन्मूलक सुखदुःखें सर्वतोपरी मिथ्या होत !" हेंही तत्त्व त्या पुरुषाच्या अंगीं बाणलें आहे ना ? मग तो हीं मायामूलक कर्तव्यें करील कां ? आणि त्यानें तीं केलींच तरी तो उत्साहानें प्रयत्न कशाला करील ? प्रपंचमूलक आभासात्मक कृत्यें उत्साहानें बजावणें म्हणजे परब्रह्माचें स्वरूप विसरणें नव्हे काय ?

शिवाय ज्या निष्काम कर्माची प्रौढी इतकी गाइली जात आहे तें निष्काम कर्म म्हणजे तरी काय ? "निष्काम" याचा अर्थ "लोककल्याणार्थ झटतांना त्यांत स्वार्थबुद्धि ठेवावयाची नाहीं," इतकाच असेल तर तो सर्वांनाच मान्य आहे. परोपकारांत स्वभावतःच ज्याला परमानंद वाटतो तो पुरुष कधींही स्वार्थबुद्धीला बळी पडणार नाहीं. पण देशहितासाठीं अथवा मानवजातीच्या उन्नतीसाठीं जे प्रयत्न करावयाचे ते प्रयत्न सफल व्हावेत अशी इच्छा ठेवावयाची नाहीं, तर मग ते प्रयत्न तरी कां करावयाचे ? परोपकारी पुरुष जनहितार्थ खटाटोप करण्यास प्रवृत्त कां होतो ? आपल्या देशबांधवांची अथवा एकंदर मानवबंधूंची अवनत स्थिति पाहून त्याचें चित्त कळवळतें ह्मणूनच ना ? इतरांचें दुःख पाहून त्याच्या मनाला अहर्निश वाईट वाटत असतें ह्मणूनच ना ? ज्या मानानें या कळकळीची तीव्रता त्या मानानें त्याच्या हातून परोपकारार्थ होणाऱ्या प्रयत्नांत जोम व उत्साह असणार. अर्थात् इतरांची अवनत अवस्था पाहून ज्याला दुःख होतें त्याच्या मनांत त्यांची उन्नति करण्याविषयीं उत्कट इच्छा असणारच. ती उत्कट इच्छा जेथें नाहीं, तेथें अवनति झालेली पाहून खेदही नाहीं आणि मग परोपकारवृत्तीचाही मागमूस नाहीं हें उघडच दिसतें.

या साम्यावस्थेस पोहोंचलेल्या पुरुषानें स्वदेशावर प्रेम तरी कां करावयाचें ? कारण प्रेम म्हटलें कीं आसक्ति आली आणि आसक्ति म्हणजे साम्यावस्थेवर वज्रपातच ! मग त्यानें देशबांधवांच्या हितार्थ कां झटावयाचें ? इतरांपेक्षां आपले देशबांधव–छेः ! आपले कसचे आणि बांधव कसचे !–इतर देशांतील लोकांपेक्षां या देशांतील लोक मागासलेले आहेत

ह्मणून! स्वदेशाविषयीं ज्याच्या मनांत अशा प्रकारची प्रेमशून्य व निर्जीव भावना मरणोन्मुख माणसाच्या प्राणज्योतीप्रमाणें आपलें अस्तित्व मोठ्या मुष्किलीनें भासवीत आहे, तो " साम्यावस्थेस पोंचलेला पुरुष (!)" कितपत कर्तव्य बजावणार हें दिसतेंच आहे. या उपदेशामृताचे घुटके घेऊन व या अमृततत्त्वाच्या झऱ्याचें जल प्राशन करून देशकार्यास लागणाऱ्या परब्रह्मवीरांच्या हातून भारतभूमीचें कदाकाळीं कल्याण होईल असें स्वप्नांत देखील वाटणें शक्य नाहीं. हें स्वदेशप्रेमाचें मिळमिळीत तत्त्व उपदेशिणाऱ्या लोकमान्य टिळकांनीं स्वतः त्याप्रमाणें वर्तन केलें नाहीं, आणि हिंदजननीच्या कर्तव्यदक्ष पुत्रांना कर्तव्याची दिशा आखून देणाऱ्या प्रातःस्मरणीय गोखल्यांनीं वरील तत्त्व स्वतःच्या हृदयास शिवूं दिलें नाहीं हें आमच्या भूमीचें परमभाग्य होय! मातेवर पुत्राचें जसें निर्व्याज, निस्सीम व उज्ज्वल प्रेम असतें तद्वतच स्वतःच्या जन्मभूमीविषयीं हृदयांत प्रेमभावना जागृत ठेवावयाची ह्मणूनच तिला आपण मातृभूमि असें ह्मणतों ना? या मातृभूमीविषयीं उपरिनिर्दिष्ट चैतन्यशून्य भावना मनांत ठेवण्याची लो. टिळक शिफारस करतात त्यावरून मुलाच्या मातेवरील प्रेमासंबंधाची त्यांची कल्पना इतकीच जोरदार आहे असेंच समजावयाचें काय?

अशाच मरणोन्मुख राष्ट्रप्रेमाच्या बलानें प्रेरित होऊन लो. टिळकांनीं लोककल्याणार्थ देह झिजविला, असें कोणास सांगितलें तर तें त्याला खरें तरी वाटेल काय? निःसंशय माझ्याप्रमाणेंच प्रत्येकाची खात्री आहे, कीं, आपल्या मातृभूमीची अवनति पाहून टिळकांचें अंतःकरण अहर्निश जळत होतें, आपल्या देशबांधवांची हीन स्थिति पाहून त्यांचें मन तिळतिळ तुटत होतें, हिंदभूमीच्या जीवितहीन स्थितीचें अवलोकन करून त्यांचें काळीज चर्र होत होतें, म्हणूनच त्यांना स्वार्थत्याग करण्याची, राष्ट्रकार्याप्रीत्यर्थ सर्व आयुष्य घालविण्याची व देशबांधवांच्या सुखाभिवृद्धीसाठीं स्वतःच्या सुखाचा होम करण्याची स्वर्गीय बुद्धि झाली!

हिंदभूमिसेवक–संस्थेच्या सभासदांविषयींचे नियम लिहितांना राष्ट्रभक्त गोखल्यांनीं वापरलेली भाषा हृदयांत सांठवून ठेवण्यालायक आहे; मानसिक

साम्यावस्थेनें अंगीं येणाऱ्या देशभक्तींत आणि पुढील शब्दांनीं व्यक्त होणाऱ्या भावनेंत जमीन–अस्मानाचें अंतर आहेः—

"या संस्थेच्या सभासदांनीं स्वतःच्या उदाहरणानें आणि उपदेशानें लोकांच्या मनांत मातृभूमीविषयीं असें कांहीं निस्सीम व ज्वलज्जहाल प्रेम उत्पन्न करावयाचें कीं, त्या योगानें राष्ट्रसेवेंत व स्वार्थत्यागांत आयुष्य खर्चिण्याची त्यांना बुद्धि व्हावी."

गीतारहस्यांत लो. टिळकांनीं ज्या साम्यावस्थेच्या तत्त्वाचा उपदेश केला आहे त्याची व ज्या राष्ट्रप्रेमाच्या उज्ज्वल भावनेनें प्रेरित होऊन त्यांनीं स्वतःच्या मतांप्रमाणें देशहितार्थ आयुष्य खर्चिलें त्या भावनेची सांगड घालणें अशक्य आहे. तारुण्यावस्थेंत व त्यानंतर पुढें कित्येक वर्षें, परब्रह्माचें व त्यावर अवलंबून असलेल्या या साम्यावस्थामूलक सर्वभूतहिताचें वारें त्यांच्या मनांत शिरलें नसलें पाहिजे हें अगदीं उघड दिसतें. नामदार परांजपे यांनीं लिहिलेल्या कै. गोखल्यांच्या चरित्रांतील पुढील उताऱ्यावरून या कोड्याचा थोडाबहुत उलगडा होतो.

*"लोक ह्मणतात तें खरें असेल तर, रा. टिळक हे हिंदुधर्माचा आज कैवार घेतात तसा पूर्वीं घेत नव्हते. डेक्कन कॉलेजच्या एका वार्षिक संमेलनाच्या प्रसंगीं कै. न्यायमूर्ति रानडे आणि रा. टिळक यांचा मजेचा वादविवाद झाला; त्या प्रसंगीं रा. टिळकांनीं धर्मसंबंधीं अत्यंत विरुद्ध मतें प्रगट केलीं होतीं असें ह्मणतात. अर्थात् आतां त्यांनीं आपलीं मतें बदललीं असतील..."

फलौदासीन्य मनांत ठेवून हातून कर्तव्य होणें शक्य नाहीं हें अगदीं उघड आहे. कारण कार्याला प्रवृत्ति व्हावयाची ती फलप्राप्तीविषयीं इच्छा असल्याशिवाय मुळीं होणें शक्यच नाहीं. यावर पुढील आक्षेप घेण्यांत येईलः—"फलाविषयीं फाजील आशा ठेवल्यानें फलांतच मन

* "Gopal Krishna Gokhale," by R. P. Paranjpye M. A. B.Sc. p. 53.

गुंतून जाण्याचा संभव असतो; आणि त्यामुळें कार्याकडे दुर्लक्ष्य होतें. म्हणून फलाविषयीं पूर्णतया उदासीन असणें श्रेयस्कर." पण हा आक्षेप म्हणजे, जास्त अन्न खाण्यानें रोग होतात, करितां अन्न सर्वस्वीच वर्ज्य करावें असें म्हणण्यासारखा आहे. फलाविषयीं फाजील आशा ठेविल्यानें कार्यांत हानि होते ही गोष्ट मान्य आहे; पण हा त्या कार्यकर्त्यांचा अदूरदर्शीपणा आहे. फलप्राप्तीविषयीं जे प्रयत्न करावयाचे त्यांच्या आड येण्याइतकी फाजील फलाशा नसावी हें सत्य आहे; पण त्याबरोबरच हातून प्रयत्न व्हावयाला मनांत फलप्राप्तीविषयीं जितकी उत्कट इच्छा असणें आवश्यक आहे तितकी इष्ट समजली पाहिजे हेंही सत्य आहे. फाजील फलाशेनें प्रयत्नांत व्यत्यय येतो म्हणून फलाशा अजीबात नष्ट करणें म्हणजे ध्येयच गमाविणें होय.

ज्या "सर्वांभूतीं एकच आत्मा" या तत्त्वाच्या जोरावर नीतिमत्तेची उत्कृष्ट उपपत्ति लावण्याचा लो. टिळकांचा प्रयत्न आहे त्या तत्त्वाचें खरें स्वरूप काय आहे, हें आपण पाहूं या. सर्वांभूतीं आत्मा हें तत्त्व मनांत बाणलें म्हणजे स्वभावतःच सर्व प्राण्यांस स्वतःप्रमाणें मनुष्य लेखतो आणि लोककल्याणास प्रवृत्त होतो. पण सर्वांभूतीं एकच आत्मा हें तत्त्व अनुभवास यावयाचें म्हणजे काय? इतर प्राण्यांनीं अनुभाविलेलीं सर्व सुखदुःखें त्या परब्रह्मानुभवी पुरुषाला प्रत्यक्ष व्हावयास पाहिजेत; आणि तसें झालें म्हणजे जगांत दुःखाधिक्य असल्यानें त्याला जन्मभर दुःखच अनुभवीत बसण्याचा प्रसंग यावयाचा; तसेंच इतर प्राण्यांनीं अनुभाविलेलीं अन्याय्य सुखें स्वतः भोगण्याचा अनिष्ट प्रसंगही त्याजवर यावयाचा. बरें, तीं इतरांचीं सुखदुःखें आभासात्मक असल्यामुळें सत्यरूपपरब्रह्मज्ञात्यास त्यांचा अनुभव येण्याचें कारण नाहीं असें म्हणावें, तर मग "सर्वांभूतीं एक आत्मा" हें तत्त्व त्यास सत्कार्यास कसें प्रवृत्त करणार? त्याला लोकांचीं दुःखेंच समजत नाहींत तर तो तीं नाहींशीं करण्यास प्रवृत्त कसा होणार? आणि स्पेन्सरच्या परार्थांत स्वार्थ मानणाऱ्या पुरुषाच्या नीतिमत्तेहूनही वरच्या दर्जाची नीतिमत्ता या सर्वांभूतीं एक आत्मा समजणाऱ्या

पुरुषाची कशी ठरणार? मनुष्य परार्थास प्रवृत्त होतो केव्हां? मनुष्याची परोपकारवृत्ति कशावर अवलंबून आहे? लोकांचीं दुःखें पाहून अंतः-करण कळवळणें हेंच तर परोपकारवृत्तीचें बीज आहे. ही वृत्ति जशी वाढत जाईल तसा परोपकारगुण वाढत जाणार. सर्वांभूतीं एक आत्मा हें तत्त्व अनुभवास आल्यानें ही वृत्ति पूर्णदशेस पोंचते म्हणूनच तें तत्त्व पराकाष्ठेच्या नीतिमत्तेला पोषक आहे असें म्हणतां येतें; पण त्याच्याच जोडीला, मनाला निर्विकार ठेवणारें मानसिक साम्यावस्थेचें तत्त्व ठेविल्यानें वरील तत्त्वाचा गुण नाहींसा होतो. सर्वांभूतीं एक आत्मा हें तत्त्व ज्याच्या अनुभवास आलें त्याला इतर आत्म्यांचें दुःख प्रत्यक्ष अनुभवावयास मिळालें पाहिजे; तसें झालें म्हणजे त्याचा जन्म दुःखमय व्हावयाचा आणि परब्रह्मानुभवानें होणार असलेला परमानंद केवळ आभासात्मक ठरावयाचा; इतर आत्म्यांचीं दुःखें असत्य असल्यामुळें त्यांचें परब्रह्मज्ञात्याला काहीं वाटण्याचें कारण नाहीं म्हणावें तर मग त्याची नीतिमत्ता कोठें राहिली? ज्याला इतरांच्या दुःखांची प्रत्यक्ष कल्पना येत नाहीं त्याच्या अंगीं उत्कृष्ट प्रकारची परोपकारवृत्ति कशी बाणावयाची? याप्रमाणें 'सर्वांभूतीं एक आत्मा' आणि 'सांसारिक सुख-दुःखांचें आभासात्मकत्व' हीं तत्त्वें परस्परविघातक आहेत. पाहिल्याचा आश्रय घ्यावा तर दुसऱ्यावर घाला येतो आणि दुसऱ्याची कास धरावी तर पहिलें नष्ट होऊन नीतिमत्तेची उपपत्ति विलीन होते!

"पुष्कळांचें पुष्कळ सुख" हें ध्येय समजणाऱ्या कांहीं पाश्चात्य पंडितां-वर लो. टिळकांनीं अनेक वेळां आक्षेप घेतले असून त्यापेक्षां सर्वभूतहित हें श्रेष्ठतर ठरतें असें म्हटलें आहे (पृ. ४७७). पण त्यांच्या या सर्वभूतहिताच्या तत्त्वाप्रमाणें वागणाऱ्या पुरुषाला देखील "पुष्कळांचें पुष्कळ सुख" या तत्त्वाचा आश्रय घ्यावा लागतोच. ज्या ठिकाणीं आपल्या कुटुंबाचें कल्याण देशकल्याणाच्या आड येतें, अथवा जेथें स्वदेशकार्य मनुष्यजातीच्या उन्नतीच्या आड येतें तेथें "पुष्कळांचें पुष्कळ सुख" पाहिल्यावांचून कर्तव्यनिश्चिति होणें अशक्य आहे.

# समबुद्धिमूलक नीतिमत्तेच्या उपपत्तीवर एक जबरदस्त आक्षेप.

मनाच्या साम्यावस्थेनें नीतिमत्तेची उत्कृष्ट उपपत्ति लावण्याच्या प्रयत्नावर एक जबरदस्त आक्षेप आहे तो हा, कीं, मन निर्विकार व शुद्ध असल्यावर केलेलें कर्म आत्म्याला बंधक होत नाहीं, तर मग शुद्धबुद्धीनें कोणतेंही कर्म करण्यास हरकत नाहीं असें प्राप्त होतें; सत्कृत्य बंधक होत नाहीं तर मग दुष्कृत्य तरी कां बंधक व्हावें? या आक्षेपाचा लो. टिळकांनीं गीतारहस्यांत निर्देश केला आहे. ( पृ. ३८० ) "कर्माकर्मनिर्णयार्थ कर्माच्या बाह्य फलाकडे लक्ष न देतां कर्त्याच्या शुद्ध बुद्धीसच प्राधान्य दिलें पाहिजे असा जो गीतेचा सिद्धान्त त्यावर कित्येकांचा असा तर्कटी आक्षेप आहे कीं, कर्मफलाकडे न पाहतां याप्रमाणें नुसत्या शुद्ध बुद्धीचाच विचार करावयाचा म्हटलें तर शुद्ध बुद्धीच्या मनुष्यानें कोणतेंही दुष्कृत्य करावें असें प्राप्त होईल!" "हे आरोप किंवा आक्षेप सर्वस्वीं मूर्खपणाचे किंवा दुराग्रहाचे आहेत असें म्हणण्यास आह्मांस कांहींच दिक्कत वाटत नाहीं." असें लो. टिळक पुढें लिहितात; पण वरील आक्षेप अगदीं खरा असून त्याचें सप्रमाण समर्थन करतां येत असल्यामुळें लो. टिळकाच्या या म्हणण्याकडे दुर्लक्ष्य करण्यास प्रस्तुत लेखकासही कांहींच दिक्कत वाटत नाहीं.—परब्रह्म हेंच सत्य होय; प्रपंच, प्रपंचांतील सुखदुःखें व सत्कृत्यदुष्कृत्यें आभासात्मक आहेत; असें म्हणणें म्हणजे सत्कृत्यांत व दुष्कृत्यांत कांहींच भेद नाहीं असें कबूल करणें नव्हे काय? सत्कृत्यें व दुष्कृत्यें हीं दोन्ही जर सारखींच असत्य आहेत, आणि शुद्ध बुद्धीनें सत्कृत्य केलें असतां तें जर बंधात्मक होत नाहीं तर शुद्ध बुद्धीनें केलेलें दुष्कृत्य तरी बंधात्मक कां व्हावें? कारण दोन्ही तितकींच आभासात्मक. एक पूज्य मोठें आणि एक पूज्य लहान म्हणून त्यांत भेद करणें जसें असमंजसपणाचें आहे–कारण दोन्हींची किंमत कांहींच नाहीं–त्याप्रमाणें सत्कृत्यें व दुष्कृत्यें दोन्ही असत्य म्हटल्यावर त्यांत भेद करणें असमंजसपणाचें आहे. याप्रमाणें परब्रह्मज्ञात्यानें कर्में करावयाचीं असें म्हटल्यावर आणि तीं शुद्ध बुद्धीनें केलीं असतां आत्म्याला बंधनात्मक होत नाहींत असें गृहीत धरल्यावर त्यानें सत्कृत्येंच कां करावीं,

दुष्कृत्यें कां करूं नयेत असें स्वभावतः प्राप्त होतें. याप्रमाणें परब्रह्मज्ञानाची आणि प्रवृत्तिमार्गाची सांगड घालण्याच्या नादांत त्यापासून लोककल्याण होण्याचें बाजूसच राहतें, आणि उलट लोकांचें कल्याण आणि अकल्याण हीं दोन्ही सारखींच आभासात्मक असल्यामुळें, " कल्याणच कां करावें, अकल्याण कां करूं नये ? " हा प्रश्न पुढें येतो. यावरून परब्रह्मज्ञानमूलक मानसिक साम्यावस्था नीतिमत्तेला कितपत पोषक आहे, हें स्पष्ट होतें.

जगांतील सुखदुःखें खरीं मानिलीं तरच नीतिमत्तेची उपपत्ति जुळणें शक्य आहे. कारण लोकांचें सुखवर्धन हें जें नीतिमत्तेचें निर्विवाद कार्य तें, लोकसुख असत्य मानणाऱ्या परब्रह्मज्ञानमूलक साम्यावस्थेच्या पुरुषाकडून होणें शक्य नाहीं. आरंभीं लोकांचीं सुखदुःखें आभासात्मक मानावयाचीं आणि दुसऱ्याच क्षणीं याच तत्त्वाच्या बलावर लोकसुखाभिवृद्धि करणारी उच्चतमपरोपकाररूप नीतिमत्ता उपदेशावयाची यासारखा परस्परविरोध पृथ्वीच्या पाठीवर दुर्मिळ आहे. तो सर्व पृथ्वीच खोटी म्हणणाऱ्या परब्रह्मैकांतवादांत अथवा जवळ जवळ ह्याच मताच्या कँटच्या तत्त्वज्ञानांतच सांपडावयाचा.

# प्रकरण तिसरें.

जग हें परस्परविरुद्ध विचारांनीं भरलेल्या मेंदूच्या माणसांनीं आणि मतें एक प्रकारचीं व कृति भलतीच अशा तऱ्हेवाईक व्यक्तींनीं भरलेलें आहे, हें अगदीं उघड आहे. तसें नसतें तर पृथ्वीवर दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या धर्मांचा तरी नायनाट झाला असता अथवा ते ते धर्मानुयायी तरी नामशेष झाले असते.

आत्मा नित्य व अविनाशी आहे, शरीराचा व त्याचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं, सत्कृत्यें व दुष्कृत्यें दोन्ही आभासात्मकच, इत्यादि विधानांनीं विशिष्ट अशा धर्माप्रमाणें शब्दशः जर सर्वच लोक वागले असते, तर त्यांचे वंशज आज पृथ्वीच्या पाठीवर दृष्टीस कां पडते! शरीरच जर आपलें नव्हे तर मुलेंबाळें कोणाचीं, ही भावना अहर्निश मनांत बाळगून जर प्रत्येक स्त्री त्याप्रमाणें वागती, तर काय झालें असतें हें स्पष्टच दिसतें. पण मनुष्यजात ही परस्परविरुद्ध विचारांचें व परस्परविसंगत विचारकृतींचें माहेरघर आहे. धर्म जितका जास्त शुद्ध व सूक्ष्म, आत्मा नित्य आहे ह्या कल्पनेपासून काढलेलीं अनुमानें जितकीं तर्कशास्त्रसंमत व दूरगामी, तितका त्या धर्माच्या अनुयायांच्या विचारांत व कृतींत परस्परविरोध दिसून यावयाचा. " सुईच्या छिद्रांतून पाहिजे तर उंट जाईल. पण स्वर्गांत श्रीमंताचा प्रवेश व्हावयाचा नाहीं. " या विधानानें सुशोभित अशा ख्रिस्ती धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या राष्ट्रांत द्रव्यलालसा जितकी अनावर झालेली दिसून येते तितकी इतरत्र कोठेंही दिसत नाहीं—आणि असें

असून त्या धर्माचा अभिमान बाळगण्यांत व विशेषतः दाखविण्यांत पहिल्या प्रतीची तत्परता ! " एखाद्यानें या गालांत चापट मारिली तर दुसरा गाल पुढें करावा, " असें ह्मणणारा धर्म ज्यांच्या हृदयांत बिंबला आहे, त्या युरोपियन लोकांनीं ॲफ्रिकेंतील व अमेरिकेंतील निरपराधी रानटी लोकांचा बळेंच त्यांच्या प्रांतांत शिरून निष्कारण जितका छळ केला तितका दुसऱ्या कोणत्याही लोकांनीं कोणाचा केला नसेल ! अहिंसेच्या तत्त्वाचें स्तोम माजविणाऱ्या व सूक्ष्म जीवजंतूंचेंही पालन करण्यांत दक्षता उपदेशिणाऱ्या बुद्धधर्मीय राजांनीं त्याच अहिंसामय धर्माच्या प्रसारासाठीं किती तरी लोकांची हत्या केली असेल ! सर्व आत्मे हे एका सत्यरूप परब्रह्माचेच अंश आहेत असें मोठ्या दिमाखानें ह्मणणाऱ्या हिंदुधर्मीयांनीं जातिभेदासारखी अत्यंत निर्लज्जपणाची व मानवजातीला कलंकित करणारी संस्था हजारों वर्षें मोठ्या चिकाटीनें चालविली आहे-- नव्हे सर्व आत्म्यांस त्या सच्चिदानंदरूपी परब्रह्माचे अंश समजणाऱ्या व स्वतःस परब्रह्माचा अवतार ह्मणविणाऱ्या " श्रीकृष्णा " च्याच तोंडांत " मीं गुणकर्मभेदाप्रमाणें चार वर्ण निर्माण केले " हे शब्द घालण्याचें धाडस त्यांनीं केलें आहे. आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही, कीं, गुणकर्मभेदामुळें हजारों वर्षांपूर्वीं स्थापिलेला वर्णभेद जन्मोजन्मीं त्यांनीं तसाच चालवीत आणिला आहे व प्रस्तुतसारख्या काळांतही त्याचें समर्थन चालविलें आहे. गुणकर्मभेदामुळें स्थापिलेला वर्णभेद गुणकर्मांत फरक झाला असतां नष्ट कां होऊं नये ?—असा प्रश्न केल्यास, " आनुवंशिक संस्कारांमुळें त्या त्या विशिष्ट धंद्यांत तो तो मनुष्य वाकबगार झालेला असतो, करितां आपला धंदा सोडून भलताच धंदा करणें स्वतःच्या व समाजाच्या हिताच्या दृष्टीनें घातक आहे " असें उत्तर देण्यांत येतें. पण यावर जर, " गुणकर्मवैशिष्ट्य व वाकबगारी जर वंशपरंपरेनें येते तर मनुष्याच्या अंगचे सद्गुण—दुर्गुण पूर्वजन्मींच्या सुकृतांप्रमाणें व दुष्कृतांप्रमाणें येतात या कर्मसिद्धांताची वाट काय ? " असा पुनः प्रश्न केला तर त्यांची जी धांदल उडते ती केवळ अवर्णनीय होय. आणि याच त्यांच्या अनुकंपनीय गोंधळ-

लेल्या वृत्तीचा योग्य फायदा घेऊन, " प्रपंचमूलक सत्कृत्यें व दुष्कृत्यें जर केवळ खोटीं होत, तर त्यांच्या अंगीं आत्म्याला वाटेल त्या जन्मांत घालण्याचें सामर्थ्य कसें येतें ? " या मार्मिक प्रश्नशस्त्राचा त्यांवर आघात केला तर शब्दसमरभूमींतून पलायन करण्यावांचून त्यांना गत्यंतरच उरत नाहीं !

सारांश, जग हें—आणि विशेषतः कट्टे धर्मभक्त—अशा अनेक परस्परविरुद्ध विचारांनीं व विचार–कृतींनीं भरलेलें आहे. आणि ह्मणूनच लोकांचे चमत्कारिक धर्मविचार व धर्मकल्पना तशाच राहूं देऊन त्या कल्पनांशीं विरुद्ध अशीं प्रगतीचीं तत्त्वें त्यांच्या मनांत बिंबविणें शक्य झालें आहे. यामुळेंच " आपलें शरीर सुद्धां आपलें नव्हे, मग कुटुंब व देश दूर राहिला. " या धर्मतत्त्वानें भडकलेलीं मनें राष्ट्रप्रेमानें भारतां येतात व वरिष्ठ वर्गांच्या लाथा खाण्यांत स्वतःचें परमभाग्य समजणाऱ्या अवनत " शूद्रांचीं " मनें त्याच वरिष्ठांची स्वराज्यलालसा तृप्त करण्यासाठीं अशांततेनें कलुषित करतां येतात !

बहुजनसमाजाचीं धर्ममतें जर याप्रमाणें प्रगतीच्या मार्गांत येत नाहींत, तर त्यांवर हल्ला कां ?—या प्रश्नाला तीन समर्पक उत्तरें आहेत. ( १ ) त्यांचीं धर्ममतें प्रगतीच्या आड येत नाहींत हें खरें; पण तीं धर्ममतें जेव्हां तशींच सुप्तावस्थेंत राहूं द्यावीत तेव्हां तीं आड येत नाहींत. तीं जागृत केलीं असतां विरोध करावयास चुकणार नाहींत. अर्थात् तीं खरीं आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न होऊं लागला म्हणजे त्यांचें असत्यत्व प्रगट करणें आवश्यक होतें. ( २ ) सामान्य लोकांची गोष्ट निराळी आणि असाधारण बुद्धिमत्तेच्या माणसांची गोष्ट निराळी. सामान्य लोक एका तत्त्वावर विश्वास ठेवितील आणि त्याच्याच विरुद्ध वर्तन करील रहातील. अर्थात् या विरोधामुळें चुकीचीं धर्ममतें मनांत बाळगणाऱ्या सामान्यजनसमूहाला, खऱ्या प्रगतीला अनुकूल असें वळण लावितां येतें. पण ज्या बुद्धिमान् पुरुषांतून लोकाग्रणी निर्माण व्हावयाचे त्यांना जर चुकीचे धर्ममूलभूत सिद्धांत विश्वसनीय वाटले, तर ते त्याला धरूनच जगांत वागूं पहाणार

व अशा रीतीनें प्रगतीला विरोध करणार. त्यांच्या विचारांची व कृतींची सुसंगतताच त्यांच्या व लोकांच्या नाशास कारणीभूत होणार. परब्रह्माच्या सत्यत्वाची अथवा आत्म्याच्या नित्यत्वाची प्रवृत्तिमार्गाशीं जेमतेम सांगड घातलेली पाहून सामान्यजनसमूह जरी योग्य मार्गाकडे यथातथा प्रवृत्त झाला तरी कुशाग्रबुद्धीच्या धर्मभक्तांवर याचा परिणाम अत्यंत अनिष्ट होणार हें निःसंशय आहे. त्यांच्या मनांत असलेलें परब्रह्म अथवा आत्म्याचें नित्यत्व या उपदेशामुळें द्विगुणित जोरानें बिंबतें, पण त्यावर उभारलेली प्रवृत्तिमार्गाची विसंगत इमारत त्यांच्या बुद्धीला पटत नाहीं. अर्थात् ते अधिकच निवृत्तिमार्गतत्पर होण्याचा व सर्वस्वास मुकण्याचा जबर संभव असतो. ( ३ ) शिवाय लोक जरी सामान्यतः परस्परविरुद्ध विचार-कृतींच्या फेऱ्यांत सांपडलेले असले आणि ह्मणून त्यांचीं धर्ममतें कायम ठेवून त्यांशीं विसंगत असा प्रगतीचा मार्ग त्यांना प्रिय करणें शक्य असलें, तरी त्यांच्या या मानसिक दोषाचा असा फायदा घेणें कालांतरानें घातकच होणार यांत संशय नाहीं. त्यांचे दोष त्यांच्या नजरेस आणून देऊन त्यांच्या विचारांची, कृतींची व विचार-कृतींची परस्परविसंगतता हळू हळू कमी करणेंच योग्य आहे, व अशा रीतीनें होणारें हितच चिरकाल टिकणारें आहे.

नुकत्याच जन्मलेल्या मुलांत शारीरिक व मानसिक सामर्थ्यांची जी वाढ झालेली असते, त्या मानानें तेंच मूल तारुण्यावस्थेस पोंचलें असतांना ती वाढ अनेकपटीनें झालेली असते हें उघड आहे. आणि हें नवीन शारीरिक व मानसिक सामर्थ्य तें दररोज जें अन्न खातें त्या अन्नांत असलेल्या बलवर्धक द्रव्यांमुळेंच येतें हेंही उघड आहे. असें असतां, व ज्या बुद्धि, चैतन्य इत्यादिकांच्या सामर्थ्यामुळें आत्मा हा विशिष्ट पदार्थ मानला जातो तें सामर्थ्य बाह्य जड पदार्थांत नेहमीं दृष्टीस पडतें त्याच सामर्थ्याचें विशिष्ट रूप आहे हें उघड दिसत असतां, आत्मा हा निराळा पदार्थ अथवा चैतन्य हा विशिष्ट गुण मानण्याचें कारण काय ? चैतन्य-शक्तीची वृद्धि होते ती अन्नादिक पदार्थांत असलेल्या शक्तीपासूनच होते, तर चैतन्यशक्ति विशिष्ट मानण्याचें कारण काय ? सामान्य शक्तींत व चैतन्यशक्तींत सर्वतोपरी भेद

कां करण्यांत येतो ? ज्याप्रमाणें गति, उष्णता, विद्युत् इत्यादिक हीं त्याच सामान्य शक्तीचीं रूपांतरें होत त्याप्रमाणेंच चैतन्यही होय असें ह्मणण्यास आपणांस प्रत्यहीं भरपूर पुरावा आढळतो. आपल्या शरीरांत असलेली चैतन्यशक्ति दररोज कमी होत असते व ही उणीव अन्नसेवनानें व तदंतर्भूत शक्तीचें चैतन्यशक्तींत पर्यवसान होण्यानें भरून निघत असते. हा क्रम पूर्ववयांत वाढत्या प्रमाणावर व उत्तरवयांत उतरत्या प्रमाणावर चाललेला असतो. अखेरीस मरणसमयीं या चैतन्यशक्तीचें सर्वस्वी सामान्यशक्तींत पर्यवसान होतें. अर्थात् पुढें सुखदुःखसंवेदनरूप विशिष्ट आत्मा उरण्याचें कारण नाहीं.

आतां अनेक शंकांचें व आत्मा नित्य आहे अथवा चैतन्य हें निराळें व नित्य आहे असें सिद्ध करूं पहाणाऱ्या प्रमाणांचें निरसन करूं.

( १ ) " शारीरिक बल व अवांतर मानसिक सामर्थ्य हें जरी सृष्टींत दिसणाऱ्या सामान्य शक्तीचें रूपांतर असलें तरी अहंबुद्धि ही वेगळी मानिली पाहिजे; व ही अहंबुद्धि व तद्रूप आत्मा नित्य मानिला पाहिजे."

आत्मा नित्य कां मानावयाचा ? तो अहंबुद्धिविशिष्ट आहे ह्मणूनच ना ? मग शरीरही नित्य कां मानूं नये ? त्याविषयीं मरेपर्यंत अहंबुद्धि असतेच. शरीर नष्ट झालेलें दिसतें ह्मणून तें नित्य मानतां येत नाहीं असें यावर उत्तर मिळाल्यास, आत्मा नष्ट झालेला दिसत नाहीं ह्मणूनच तो नित्य मानावयाचा काय, हा प्रश्न उद्भवतो. आत्म्याचा नाश न दिसण्याइतकीं आपलीं इंद्रियें कोतीं आहेत आणि तो न समजण्याइतकी कांहींची बुद्धि अपुरी आहे, ह्मणून आत्मा नित्य आहे हें सिद्ध होत नाहीं. शिवाय ज्या अहंबुद्धीमुळें आत्मा नित्य मानावयाचा ती तरी जन्मापासून कोठें असते ? तीन चार वर्षांचें वय झाल्यानंतर ती अहंबुद्धि उत्पन्न होते. अर्थात् जी अहंबुद्धि अशा रीतीनें नवीन उत्पन्न झालेली दिसते ती अन्नादिकांत असलेल्या सामान्यशक्तीचेंच रूपांतर असणार. यामुळें ती अहंबुद्धि त्या विशिष्ट रूपानें नित्य मानण्याचें कारण उरत नाहीं.

( २ ) "विजातीय पदार्थांच्या संयोगानेंच कांहीं तरी विशेष कार्योत्पत्ति

होते; कार्यांत दिसून येणारा गुण त्या कार्योत्पत्तीस कारणीभूत असणाऱ्या पदार्थांतच कोठें तरी असला पाहिजे; कार्यांत दिसून येणारा गुण अस्पष्ट रूपानें तरी कारणीभूत पदार्थांपैकीं एकांत अथवा अधिकांत दिसला पाहिजे—चैतन्यगुण कारणीभूत पदार्थांत कोठेंच अस्पष्ट रूपानें सुद्धां दिसत नाहीं, अर्थात् त्याचा आश्रय आत्मा हा अदृश्य व निराळा पदार्थ मानणें भाग पडतें."

या युक्तिवादाचें समर्पक उत्तर पुढें लिहिल्याप्रमाणें देतां येतें:—पुष्कळ वेळां कार्यांत दिसून येणारा गुण अस्पष्ट रूपानें सुद्धां कारणीभूत पदार्थांत कोठेंच दृग्गोचर होत नाहीं. उदाहरणार्थ ( १ ) जल व उष्णता यांच्या संयोगानें उत्पन्न होणारी गति दोहोंपैकीं एकांतही दृग्गोचर होत नाहीं. ( २ ) कांच आणि रेशीम यांच्या घर्षणानें उत्पन्न होणारी विद्युच्छक्ति आधीं मुळींच दृष्ट होत नसते. पण या दोन्ही उदाहरणांमध्यें गति, विद्युच्छक्ति वगैरे गुणांचा आश्रय असा आत्म्यासारखा विशिष्ट पदार्थ मानण्यांत येत नाहीं. मग चैतन्यगुणाचा आश्रयच निराळा पदार्थ कां मानण्यांत यावा?

( ३ ) आत्मा केवळ नित्य मानल्यावर मनुष्याच्या अंगीं गुणदोष येतात ते केवळ पूर्वसंचितामुळें येतात असें मानावें लागतें. पण जगांत तर वंशपरंपरेनें गुणदोष येत असलेले आपल्या दृष्टीस पडतात. वंशपरंपरेनें जर गुणदोष येतेना तर समाजाची उन्नति करूं पहाणाऱ्यांचे प्रयत्न मूर्खपणाचे ठरले असते. या पिढीची उन्नति कर कर करावी आणि पुनः दुसरी पिढी आपापल्या पूर्वसंचितानुरूप जन्मावी. मग कांहीं पिढ्यांनीं राष्ट्राची उन्नति अथवा अवनति झालेली दिसते ती कशी? यावरून गुणदोष वंशपरंपरेनें येतात व प्रत्येक पिढीला त्यांत कांहीं फरकही करतां येतो हें उघड दिसतें. अर्थात् आत्मा नित्य व पुनर्जन्मयुक्त मानतां येत नाहीं.

( ४ ) आत्मा निराळा व नित्य मानण्याला धर्मचहाते प्रवृत्त होतात त्याचें मुख्य कारण पुढील होय:—अन्नादिकसामुग्रींत असलेल्या सामान्य शक्तीचें चैतन्यांत परिवर्तन करण्याची विशिष्ट शक्ति केवळ वनस्पतींच्या व प्राण्यांच्या बीजांतच दिसून येते; ती इतरत्र दिसत नाहीं. एवढ्याशा

बीजाच्या पुढें जो प्रचंड पदार्थ होतो, तो जरी सृष्टींत असलेल्या सामान्य शक्तीमुळें व द्रव्यामुळें होत असला तरी त्या द्रव्याचा व शक्तीचा विशिष्ट उपयोग करण्याचें सामर्थ्य त्या बीजांतच असतें. हें विशिष्ट सामर्थ्य बीजांत असलेल्या आत्म्याचें होय; याप्रमाणें आत्मा निराळा पदार्थ मानण्यांत येतो व मग तो नित्य मानल्यावांचून गत्यंतर उरत नाहीं. वनस्पतींच्या काय अथवा प्राण्यांच्या काय बीजांत आलेलें हें विशिष्ट सामर्थ्य सृष्टींतील सामान्य प्रकृतीच्या व शक्तीच्या संयोगानेंच पण कोट्यवधि वर्षांच्या कारणकार्यपरंपरेनें आलेलें आहे हें उत्क्रांतिवादानें सिद्ध केलें आहे. प्राणिशास्त्राच्या व वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासानें हें तत्त्व मनावर चांगलें बिंबतें. आज ज्या मनुष्याच्या सुधारलेल्या बीजाचें अनुकूलपरिस्थितिवशात् सुधारलेल्या मनुष्यांत परिवर्तन झालेलें आपण पहातों त्याच बीजाच्या हजारों वर्षांपूर्वीच्या पूर्वज-बीजाचें अनुकूलपरिस्थितिवशात् रानटी मनुष्यांत पर्यवसान होत असलें पाहिजे. याप्रमाणें कालाच्या वीथिकेंत आपण जर उलट जाऊं लागलों तर या बीजाची, उन्नति अवनतीच्या नतोन्नत रेषेंतून एकंदरींत अवनति होत चाललेली मनश्चक्षूपुढें आणतां येईल. पुढें पुढें तर पशुकोटीचे व मनुष्यकोटीचे पूर्वज एकच होते त्या द्वारांतून व अखेरीस पशुकोटीचे व वनस्पतिकोटीचे पूर्वज एक होते त्या द्वारांतून आपणास उलट प्रवास करावा लागेल. शेवटीं क्षणैकजीवी जीवाजवळ आपणांस थांबावें लागेल. अशा प्रकारचे जीव—जड प्रकृतीपासून व सामान्य शक्तीपासून उत्पन्न होणारे प्रारंभींचे जीव—आज निर्माण करतां येतात. या जीवांपासून आज आपण पहातों त्या जीवांपर्यंत उत्क्रांति होण्यास अनेक कारणांचा समवाय कोट्यवधि वर्षेंपर्यंत व्यापृत व्हावा लागला आहे. अर्थात् सध्यां दिसणारे जीव अल्पकाळांत निर्माण करूं म्हणणें अशक्य कोटींतलें आहे. असंख्य कालपर्यंत असंख्य कारणें जें कार्य करीत आलीं तें कार्य मानवी सामर्थ्याबाहेरचें आहे.

उत्क्रांतिवादानें हें कोडें आज उलगडलें आहे. तें एरवीं स्पष्ट होत नसल्यामुळें, अनेक परस्परविरुद्ध विचारांचा वेडेपणा पदरीं बांधूनही आत्मा

नित्य व स्वतंत्र मानण्याची चूक अनेक तत्त्ववेत्त्यांनीं व धर्मसंस्थापकांनीं केली आहे. पण सध्यांच्या जबर शास्त्रीय शोधांच्या काळांत आत्म्याच्या नित्यत्वाचें तत्त्व प्रतिपादणें हास्यास्पद ठरत आहे.

प्राणिशास्त्राच्या व वनस्पतिशास्त्राच्या सिद्धांतांचा विचार करितां आत्म्याचें नित्यत्व कसें असत्य ठरतें हें वरती दाखविलेंच. भूगर्भशास्त्राच्या सिद्धांतांकडे लक्ष्य दिलें असतां हेंच सत्य मनावर बिंबतें. पृथ्वीच्या पृष्ठभागाची जी उष्णता आहे, ती पृष्ठभागाखालीं जसजसें खोल जावें तसतशी वाढत गेलेली दिसून येते. अंतर्गत भाग अत्यंत उष्ण आहे हें ज्वालामुखी पर्वतांच्या स्फोटावरूनही सिद्ध होतें. आंत उष्णता अधिकाधिक कां? यावरून काय सिद्ध होतें? पृथ्वीच्या आंतील भाग जितका उष्ण आहे तितकाच एके काळीं तिचा पृष्ठभागही होता—पोकळींत उष्णता निघून जात असल्यामुळेंच पृथ्वीचा पृष्ठभाग थंड झाला—हें उघड दिसतें. पृथ्वीच्याही पुढच्या पायरीस जाऊन पोंचलेल्या चंद्राची निर्विकार स्थिति व गुरु, शनि या ग्रहांची पृथ्वीच्या पूर्वस्थितिसदृश उष्णस्थिति या सत्याचे दृष्टांत होत. अर्थात् ज्याला आपण चैतन्य ह्मणतों तें पृथ्वीचा पृष्ठभाग अत्यंत उष्ण असतांना नव्हतें हें उघड आहे; कारण त्या वेळीं त्या परिस्थितींत प्राण्याची उत्पत्तिच होणें शक्य नव्हतें. यावरून आरंभींचा जीव प्रकृतीच्या व शक्तीच्या संयोगानेंच उत्पन्न झाला असला पाहिजे—व अनुकूल परिस्थितिवशात् सामान्य शक्तीचें जें विशिष्ट रूपांतर होतें, त्यासच आपण चैतन्य ह्मणतों—हें सिद्ध होतें.

ज्योतिःशास्त्राचे सिद्धांतही हेंच दाखवितात. पृथ्वी सूर्यापासून वेगळी झाली तेव्हां ती कोणत्या स्थितींत असली पाहिजे, त्या वेळीं व नंतर असंख्य वर्षेंपर्यंत तिजवर जीवाची उत्पत्ति होणें कसें अशक्य होतें वगैरे गोष्टींवरून आत्म्याचें अनित्यत्वच सिद्ध होतें.

सारांश, शरीर आणि आत्मा यांत भेद करण्यास व शरीराव्यतिरिक्त आत्मा राहूं शकतो असें मानण्यास बिलकूल आधार नाहीं. आत्म्यावांचून शरीर जसें टिकत नाहीं व तें सामान्य प्रकृतींत मिळून जातें, त्याप्रमाणेंच

शरीरावांचून आत्माही चैतन्यस्थितींत राहूं शकत नाहीं, तो सामान्य शक्तींत मिळून जातो असें मानावें लागतें. वस्तुतः हा प्रकार प्रत्येक जीवाच्या आयुष्यांत प्रतिक्षणीं चाललेलाच असतो; चैतन्यशक्तीचे अंश सामान्य शक्तींत व सामान्य शक्तीचे अंश चैतन्यशक्तींत क्षणोक्षणीं रूपांतरित होत असतात व शरीराचाही तोच प्रकार चाललेला असतो. पण मरणसमयीं उरल्यासुरल्या चैतन्यांशांचेंही सामान्य शक्तींत रूपांतर होऊन आत्म्याचें विशिष्टत्व संपतें.

याप्रमाणें आत्म्याच्या नित्यत्वाचा आणि पाश्चात्य शास्त्रीय शोधांचा कोठेंच मेळ बसत नाहीं. आपल्या परस्परविरुद्ध मतांपैकीं एखाद्या मतास जुळतें असें पाश्चात्य शास्त्रीय शोधकांचें मत घेऊन आपल्या: धर्मांतील एकूणएक विधानांचें सत्यत्व प्रतिपादण्याचें, आधुनिक धर्मपंडितांना एक व्यसनच जडलें आहे; तर कित्येक विद्वान्, पाश्चात्य शास्त्रीय शोधांची व पौर्वात्य धर्मतत्त्वांची सांगड घालण्यांत गढून गेले आहेत. प्राणिशास्त्राच्या व वनस्पतिशास्त्राच्या सिद्धांतांच्या मुळाशीं असलेल्या उत्क्रांतितत्त्वाची व इकडच्या धर्मांत कल्पिलेल्या चौऱ्याशी लक्ष्य योनींची गीतारहस्यांत (पृ. १८१-२, टीप) केलेली तुलना अशाच प्रकारची आहे. पौर्वात्य धर्ममतांप्रमाणें एकच आत्मा वाटेल त्या योनींतून वाटेल त्या योनींत जन्म घेऊं शकतो; तर पाश्चात्य शास्त्रीय शोधांनीं, कोट्यवधि वर्षांच्या उत्क्रांतींत कोणकोणत्या व किती पायऱ्या चढून मनुष्यादिक या स्थितीला पोंचले हें दाखविलें आहे. पौर्वात्य धर्ममतांप्रमाणें मनुष्य मरून सर्प होऊं शकतो व आंब्याचें झाड जळून हत्ती होऊं शकतें, तर पाश्चात्य शास्त्रीय शोधकांच्या मतें हें सर्वस्वी हास्यास्पद ठरतें. अशा प्रकारच्या समूळ विरुद्ध गोष्टींची तुलना तरी कशी करावयाची ?

यावरून, आत्म्याचें नित्यत्व तरी खोटें माना किंवा पाश्चात्य शास्त्रीय शोधांचा तरी तिरस्कार करा, यावांचून तिसरा विकल्प उरत नाहीं हें स्पष्ट होतें. आत्माही नित्य असूं शकेल आणि शास्त्रीय शोधही खरे असूं शकतील हीं मतें एकाच मेंदूत सप्रमाण कोंबणें अमानुष आहे.

## दृश्य नानाविध सृष्टीचें आदिकारण चैतन्यमय ठरत नाहीं.

वरील विवेचनावरून, सृष्टींत हा भेद होण्यापूर्वी सर्व कांहीं परमानंदस्वरूपी परब्रह्म होतें, हें विधान निराधार आहे हें सिद्ध होतें. ज्याला आपण चैतन्य ह्मणतों—ज्या चैतन्याच्या अभावीं परमानंद असंभाव्य आहे—त्याची वाढ अलीकडे झाली आहे; त्यापूर्वीं सामान्य प्रकृति व सामान्य शक्ति यांवांचून कांहीं नव्हतें. सुखदुःखसंवेदनरूप चैतन्याचा तेव्हां केवळ अभाव होता. अर्थात् सृष्टीच्या मुळाशीं परमानंदस्वरूपी परब्रह्म असणें शक्य नाहीं. जे होतें त्याला जड ह्मणा वा चैतन्य ह्मणा, तेथें सुखदुःखसंवेदनशक्ति नव्हती हें खास. तसेंच प्रपंचाचें असत्यत्वही कोणत्याच युक्तींनीं शाबीत करतां येत नाहीं.—शब्द ही एक प्रकारची गति आहे आणि सूर्यप्रकाशही गतिच आहे. याप्रमाणें "गति मुळांत एक असतां तिला कान जर शब्द व डोळे रंग ठरवितात" तर इंद्रियांना दिसणारें जग मिथ्या आहे असें म्हणण्यास हरकत कोणती?—हा लोकमान्यांचा युक्तिवाद चुकीचा आहे. शब्द ही वातावरणाची गति आहे आणि प्रकाश ही etherची गति आहे. गतींत भेद आहे ह्मणून ज्ञानांत भेद होतो. अर्थात् हें ज्ञान भ्रममूलक नाहीं. शिवाय, याप्रमाणें सर्वांच्या अनुभवाला येणारा प्रपंच जर मिथ्या ठरूं लागला तर एखाद्याच "योग्याच्या" अनुभवाला येणारें परब्रह्मच मिथ्या कां ठरूं नये?

वस्तुतः चैतन्य हें सामान्य शक्तीचें रूपांतर आहे, विशिष्ट शरीराचा नाश होतांना अवशिष्ट चैतन्य सामान्य शक्तींत रूपांतरित होऊन सुखदुःखसंवेदन विलीन होतें. तथापि, "मुळांत जें नाहीं तें कार्यांत येणें शक्य नाहीं, अर्थात् सृष्टींत दिसणारें चैतन्य मुळांत असलेंच पाहिजे," हें गृहीत धरलें तरी त्यावर पुढील आक्षेप आहेच. सृष्टींत चैतन्याप्रमाणेंच, उष्णता, विद्युच्छक्ति, गति इत्यादि दिसतात; हींही मुळांत असलींच पाहिजेत; व जड प्रकृतीहि असलीच पाहिजे. ह्या सर्वांचा ज्यांत अंतर्भाव होईल तें परब्रह्म एकाच स्वरूपाचें मानावयाचें म्हटल्यावर तें चैतन्यमयच मानण्यास काय आधार आहे? प्रत्येक दृश्य वस्तूच्या मुळाशीं असलेलें हें सामान्य तत्त्व चैतन्यमयच आहे असें म्हणणें म्हणजे आपल्या अंतःकरणांत अनुभवास

येणाऱ्या एकाच गुणाचा इतर अनेक गुणांवर बळेंच अध्यारोप करणें आहे. हें म्हणणें अत्यंत धार्ष्ट्यांचें होय.–सर्व वस्तूंत चैतन्य हीच अत्युत्कृष्ट वस्तु आहे; अर्थात् ती ज्यापासून निर्माण झाली तें एकस्वरूपी परब्रह्म तन्मयच असलें पाहिजे.––हें विधानही तितक्याच धार्ष्ट्यांचें आहे. आपणाला हृदयांत अनुभवाला येतें तेंच सर्व सृष्ट पदार्थांत उत्कृष्ट होय, हें म्हणणें रानटी लोकांनीं क्रूर देव व सुधारलेल्या लोकांनीं दयाळु देव काल्पिण्याप्रमाणें मिथ्याध्यारोपमय आहे. पदार्थांच्या मुळाशीं काय आहे, हें समजणें अशक्य आहे; त्या अज्ञेयाच्या मागें लागून बुद्धीचा व आयुष्याचा अपव्यय करण्यांत अर्थ नाहीं असें कांहीं पाश्चात्य पंडित म्हणतात; त्यावर, " आधिभौतिक शास्त्रें कितीही वृद्धिंगत होवोत; सर्व आधिभौतिक सृष्टिविज्ञान बगलेंत मारून तत्त्वज्ञान नेहमींच त्यांच्यापुढें धांव घेत राहणार ! " असें लो. टिळकांचें म्हणणें आहे. कबूल; खुशाल धांव घेत राहूं द्या; पण त्या धांवण्याच्या भरांत बगलेंत मारलेल्या सृष्टिविज्ञानासह जर तें खड्ड्यांत उडी घालूं लागलें तर त्याच्या मागोमाग उडी टाकावी किंवा काय याचा विचार करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. मूलतत्त्व अज्ञेय आहे, त्याचें स्वरूप कांहींहि असलें तरी तें परमानंदरूप नाहीं हें अगदीं खचित, हें स्पष्ट दिसत असतां–परब्रह्म परमानंदरूप आहे, प्रपंच, प्रस्तुत जीवित व तन्मूलक सुखदुःखें केवळ असत्य आहेत असें सांगून आयुष्यांतील सर्व सुखांचा त्याग करावयास सांगणारें " तत्त्वज्ञान " काय कामाचें ?

याप्रमाणें, सृष्टीच्या मुळाशीं असलेलें अज्ञेय तत्त्व परमानंदरूप असणें शक्य नाहीं, असें सिद्ध केल्यावर, " आम्ही तरी कोठें म्हणतों तें परमानंदरूपच आहे म्हणून ? तें अगम्य आहे; 'नेति, नेति' असें त्याचें स्वरूप वर्णितांना वारंवार म्हटलेलें आहे यावरून त्याचें अगम्यत्व प्राचीन ऋषींनीं सुद्धां कबूल केलें आहे हें स्पष्ट होतें. परब्रह्म परमानंदरूप आहे असें म्हणणें केवळ औपचारिक आहे. " असें प्रत्युत्तर मिळतें. पण याप्रमाणें मूलतत्त्वाचें अगम्यत्व ऊर्फ अज्ञेयत्व कबूल केल्यावर तत्त्वज्ञानानें

सृष्टिविज्ञान बगलेंत मारून धांव ती कसली मारिली ? आणि मूलतत्त्व परमानंदरूप आहे हें म्हणणें औपचारिक ठरल्यावर, त्याला जाऊन मिळण्याची इतकी घाई कां ? तसेंच, तें ज्यानें ओळखलें नाहीं त्याला पुनः पुनः जन्म घ्यावे लागतात, या म्हणण्याची तरी किंमत काय ? तें जर अगम्य आहे तर तें ओळखावयाचें कसें ? आणि हें काल्पित " जन्मचक्र " संपावयाचें कसें ?

" आपल्या मुळाकडे जाण्याची प्रवृत्ति सर्वत्र दिसून येते, " हें म्हणणेंही अयुक्तिक आहे. मूलतत्त्व जाणण्याची–आपण आहों त्या चैतन्यमय स्थितींत राहून त्याचें स्वरूप समजून घेण्याची–प्रवृत्ति असेल, पण त्याला जाऊन मिळण्याची प्रवृत्ति स्वाभाविक अशी कोठेंच दिसत नाहीं.

याप्रमाणें दृश्य सृष्टीचें मूलतत्त्व " अज्ञेय " अथवा " अगम्य " राहिल्यावर त्याच्या बळावर 'प्रपंच' आभासात्मक ठरविणें कितपत तर्कशास्त्रसंमत होईल हें सांगावयास नकोच. याप्रमाणें प्रपंचाचें आभासात्मकत्व आणि परब्रह्माचें परमानंदरूपत्व काल्पनिक ठरल्यावर या 'परब्रह्मैकांतवादा'च्या नादीं लागून, तें परब्रह्मैक्य निवृत्तिमार्गानें प्राप्त होतें कीं प्रवृत्तिमार्गानें प्राप्त होतें याची वाटाघाट करणें, म्हणजे आकाशींचा चंद्र कोणीं घ्यावयाचा याबद्दल दोघां मुलांनीं आपसांत भांडण्याप्रमाणें वेडेपणाचें आहे. " बाबांनों, भांडूं नका; हीं दोन पाण्यानें भरलेलीं भांडीं आहेत. एकेकजण एकेका भांड्यांत पहा, म्हणजे दोघांनाही चंद्र मिळेल!" असें म्हणून शहाणा मनुष्य ज्याप्रमाणें वेड्या मुलांचे तंटे मिटवितो, त्याप्रमाणेंच माझ्या मतें तर लोकमान्य टिळकांनींही, " बाबांनों, भांडूं नका; दोन्ही मार्गांनीं परब्रह्मप्राप्ति होते ! " असें म्हणून प्रवृत्तिमार्गचहात्यांमधील व निवृत्तिमार्गपुरस्कर्त्यांमधील विरोध काढून टाकण्याचा प्रयत्न केला असावा. पण हें मर्म न समजल्यामुळें रा. भानूंसारखे प्रोफेसर वृथा कंठशोष करीत आहेत आणि रा. पिटकर प्रवचनें देऊं लागले आहेत! पाण्यांतील चंद्राच्या प्राप्तीप्रमाणें परब्रह्मप्राप्ति काल्पनिक होय हें

# कोणत्याही मार्गानें जा, अखेरीस मरणच !

तत्त्व उमजल्यावांचून, निवृत्तिमार्ग व प्रवृत्तिमार्ग यांसारख्या विरुद्ध मार्गांनीं ती होणें शक्य आहे, असें कोण थोर पुरुष प्रतिपादील ? कोणत्याही मार्गानें जा—परब्रह्मप्राप्ति ( मरण ! ) नेमकी ठेवलेली !

# प्रकरण चौथें.

गीतारहस्यांत जर केवळ प्रवृत्तिमार्गाचीच थोरवी गाइली गेली असती, परब्रह्माच्या सत्यत्वाचें मंडन करून विचारी पण श्रद्धाळु पुरुषांना वस्तुतः निवृत्तिमार्गाकडे वळविण्याचा परिणाम त्यापासून होणारा नसता तर त्या-संबंधानें इतका विचार करण्याचें कारणच नव्हतें. प्राचीन काला-पासून निवृत्तिपर मार्गाकडे वाहवलेल्या हिंदूंच्या मनांना प्रवृत्तिमार्गाचाच केवळ उपदेश करण्यांत आला असता तर त्यापासून पुष्कळ लोकहित होण्याचा संभव होता. "धर्मतत्त्वांशीं प्रवृत्तिमार्ग असंमत आहे, पण मुळीं धर्मतत्त्वेंच चुकीचीं असल्यामुळें तिकडे लक्ष्य देण्याचें कारण नाहीं. एत-दर्थ ऐहिक उन्नति हेंच परम साध्य आहे !" असें उपदेशिल्यानें सामान्य जनांचीं मनें उपदेशश्रवणास प्रतिकूल होतात व त्यांची सुधारणा करणें अशक्य होऊन बसतें. पण त्याऐवजीं, मूळच्या धर्मतत्त्वांचें विशेष विवेचन करण्याच्या भानगडींत न पडतां, "प्रवृत्तिमार्ग धर्मसंमत असलाच पाहिजे. आपले देशबांधव इतक्या हीन दशेस पोंचले असतां, त्यांची अन्नान्नदशा झाली असतां निवृत्तिमार्गाच्या मागें लागून कसें चालणार ? ज्या मार्गानें गेलें असतां धर्मपालन करणारे सगळे लोकच नष्ट होण्याचा प्रसंग येणार तो मार्ग काय कामाचा ? धार्मिक लोकांच्या अभावीं धर्म कोठला ? आपणास स्वधर्माचें रक्षण करावयाचें असेल तर आपली ऐहिक उन्नति करून घेतली पाहिजे—प्रवृत्तिमार्गाचा अवलंब केलाच पाहिजे." असा उपदेश केला असतां तो लोकांस पटतो आणि त्याचा परिणामही इष्ट असा

घडतो. पण तसें न करतां केवळ निवृत्तिमार्गाशींच जुळणारें असें परब्रह्माचें स्वरूप सत्य म्हणून सांगावयाचें आणि दुसऱ्याच क्षणीं प्रवृत्तिमार्गाची महती गावयाची, याचा अर्थ काय ? असें केल्यानें प्रवृत्तिमार्ग लोकप्रिय होण्याऐवजीं, झालें तर त्यांच्या मनांतील निवृत्तिमार्गाविषयींचें प्रेमच दृढतर होणार हें अगदीं उघड आहे. यामुळें चैतन्यमयपरब्रह्मरूप मूलतत्त्वाचेंच आभासात्मकत्व प्रगट करणें आवश्यक होतें.

पण गीतारहस्यांतील उपदेशाच्या फैलावाचा अनिष्ट परिणाम इतक्यावर थांबत नाहीं. त्यायोगानें यापेक्षां राष्ट्राचें फारच प्रचंड नुकसान होणार आहे; आणि ह्मणूनच प्रस्तुत प्रकरण लिहिण्याचें योजिलें आहे.

मूळ गीतेंत आणि तिचें रहस्य जगाच्या निदर्शनास आणून देणाऱ्या ग्रंथांत वर्णाश्रमधर्माची व जन्मसिद्ध कर्तव्याची मोठी थोरवी वर्णिली आहे. ज्या वर्णाश्रमधर्मानें हिंदुसमाजाचीं शतसहस्र शकलें करून टाकिलीं आहेत, ज्या वर्णाश्रमधर्मानें कृत्रिम भेद निर्माण करून हिंदुसमाजाची वाढ खुंटवून टाकिली आहे, ज्या वर्णाश्रमधर्मानें कोट्यवधि लोक अशा स्थितीस नेऊन पोंचविले आहेत कीं, त्यामुळें त्यांना राजकीय स्वातंत्र्याची कल्पनाही होणें शक्य नाहीं—त्या वर्णाश्रमधर्माची महती प्रस्थापित करूं पहाणाऱ्या उपदेशाचा कोणता इष्ट परिणाम होणार ?

प्रथम वर्णाश्रमधर्म गुणकर्मभेदामुळें निर्माण झाला असला तरी सध्यां त्याला जन्मसिद्धत्वाचें स्वरूप येऊन बसलें आहे.. आतां, गुणवैशिष्ट्याप्रमाणें धंदा बदलणें धर्मसंमत ठरत नाहीं. ' जन्मसिद्ध, ' ' सहज ' कर्म प्रत्येकानें करीत राहणें यांतच राष्ट्राचा तरणोपाय आहे असें प्रतिपादण्यांत येतें. " तो धर्म सोडून देऊन कोणत्याही सबबीवर दुसऱ्याचें कर्म करूं लागणें हें धर्मदृष्ट्या व सर्वभूतहितदृष्ट्या गर्ह्य होय. " (गी. र. पृ. ४९२). कारण, " त्यांतच तो वाकबगार असण्याचा संभव असता, दुसरा भलताच धंदा करील तर त्यामुळें समाजाचें नुकसान होईल. " ( पृ. ३३२ ).

वस्तुतः, " तूं ज्या धंद्यांत वाकबगार आहेस तोच धंदा करीत जा, दुसऱ्या धंद्यांत पडल्यानें समाजाचें नुकसान होईल, " हें लोकांस धर्माज्ञा

म्हणून सांगण्याचें प्रयोजनच नाहीं. मनुष्याला उदरनिर्वाहाची गरज असेल व तो वाकबगार असलेल्या धंद्याची राष्ट्राला आवश्यकता असल्यामुळें त्यांत पैसे मिळत असतील, तर तो मुळीं दुसऱ्या धंद्यांत सहसा पडणारच नाहीं. पण वंशपरंपरेनें वाकबगारी मिळवून बसलेल्या लोकांना आज तेंच काम करीत राहून पोट भरणें अशक्य झालें आहे. सगळे 'चारुदत्त' निष्कांचन झाले असल्यामुळें 'संवाहकांना' उपाशी मरावें लागत आहे; आणि लोक दरिद्री झाल्यामुळें भिक्षा मिळण्याचें बंद होऊन बौद्ध भिक्षु होण्याची सोय उरलेली नाहीं. अशा लोकांच्या, "जन्मसिद्ध कर्तव्य कर!" ही धर्माज्ञा काय कामाची? फुकटचें पंचपक्वान्न खाऊन वेळीं अवेळीं वेद-पठन करीत बसणाऱ्या विप्रांना हातीं पडेल तें काम करण्याचा प्रसंग आला आहे. कारण अल्पपरिश्रमानें पुरून उरेल इतकी संपत्ति लोकांना मिळे-नाशी झाल्यामुळें फुकटांत पक्वान्नें मिळणेंही बंद झालें आहे. अशा विपन्न स्थितीस पोंचलेल्या विप्रवरांना जन्मसिद्ध कर्तव्य करीत रहावयास सांगणें म्हणजे त्यांना यमलोकींची वाट धरण्याचा उपदेश करण्याप्रमाणेंच आहे. उलट, "ज्या धंद्यांत पैसे मिळून उदरनिर्वाह होण्याचा संभव असेल, त्या धंद्यांत पडा; त्यांत तुह्मांला वाकबगारी नसली तरी ती अंगीं आणा," याच उपदेशाची सध्यां अत्यंत आवश्यकता आहे. खेड्यांत वंशपरंपरागत धंद्यांना चिकटून राहण्याची खोड फार असल्यामुळें व त्यांतील बरेच धंदे आधुनिक सुधारणारथाच्या चाकांखालीं चेंगरून गेल्यामुळें तेथील लोकांची पोटमार होऊं लागली आहे; आणि हिंदुस्थानांत बहुतेक लोक खेड्यांतूनच रहात असल्यामुळें "तेथील लोकांची पोटमार" म्हणजे बहुतेक हिंदुस्थानाची पोटमार अशी अवस्था झाली आहे. अशी वस्तुस्थिति असतां जन्मसिद्ध कर्तव्याचा उपदेश करून या लोकांना आपापल्या प्राणहारक धंद्यांत स्थिर केल्यापासून काय उपयोग होणार?

सध्यां ज्या अनेक लोकांनीं जन्मसिद्ध धंदे सोडून दिले आहेत त्यांनीं जर पुनः पूर्वींचेच धंदे करण्याचें मनांत आणिलें व त्याप्रमाणें आचरण करण्यास सुरुवात केली तर त्याचा परिणाम काय होईल हें पाहूं या.

तो उपदेश इतरांना करण्यांतच गुरूंची तत्परता दिसून येते.

आज कित्येक गिरण्यांतून मजूर लोक जें काम करितात तें ... ंचें जन्म-सिद्ध कर्तव्य असणें शेंकडा नव्वद टक्कयांनीं—किंबहुना अ... ुकही—असंभवनीय आहे. शेंकडों पिढ्यांपासून नांगर हांकीत आलेले ... क्षावधि कुणबी आज कापडाच्या गिरण्यांतून सूत काढण्याचीं व कापडाचे माग चालविण्याचीं कामें करताहेत. यांनीं जर पुनः नांगर हांकण्याचें मनांत आणिलें तर काय होईल? देशाला तर दारिद्र्य येईलच, पण त्याबरोबरच लक्षावधि लोकांना उपाशी मारल्याचें श्रेय जन्मसिद्ध कर्तव्याच्या तत्त्वाला लाधेल. शेंकडों धंद्यांत प्रामुख्यानें वावरणाऱ्या ब्राह्मणांनीं जर ते धंदे करणें सोडून दिलें व जन्मसिद्ध कर्तव्याकडे धांव घेतली तर देश रसातळाला जाईलच; पण त्याबरोबरच या जन्मसिद्ध–कर्तव्य–प्रियांचाही दिनत्रयांत नायनाट होईल. असलें जन्मसिद्ध कर्तव्याचें तत्त्व देशाच्या काय कामाचें? ज्या योगानें सर्व देशाची उपासमार होईल व विशिष्ट धंदे सोडून देणाऱ्या अदूरदृष्टि धर्मभक्तांवर तात्कालिक मरण ओढवेल त्या तत्त्वाचा उपदेश राष्ट्राच्या काय उपयोगी?

आज कित्येक विद्वान् ब्राह्मण राजकीय चळवळींत पडले आहेत व त्यांपैकीं कांहींनीं तर आपल्या अद्वितीय स्वार्थत्यागानें व कर्तबगारीनें हिंदुस्थानाचें अपरिमित कल्याण करून त्यास कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. या महात्म्यांनीं जर जन्मसिद्ध कर्तव्याच्या मागची आपली चिकाटी सोडिली नसती तर हिंदराष्ट्राची आज काय अवस्था असती? पण ही महत्त्वाची गोष्ट लो. टिळकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहिलेली नाहीं. कारण ते लिहितात, “ जातीचे ब्राह्मण असतांही देशकालानुरूप क्षात्र-धर्माचा अंगिकार करणारे थोरले माधवराव पेशवे यांस, ‘स्नानसंध्येंत वेळ न घालवितां क्षात्रधर्माप्रमाणें प्रजेचें संरक्षण करण्यांत आपला सर्व वेळ खर्च करण्यांतच तुमचें उभयत्र कल्याण आहे’ असा रामशास्त्रीबुवांनीं उपदेश केला...” ( गी. र. पृ. ४९२ ). देशकालानुरूप ब्राह्मणांनीं जर क्षात्रधर्माचा अंगिकार करण्यास हरकत नाहीं तर इतरांनींच पोटमार सहन करूनही जन्मसिद्ध कर्तव्य करीत रहावें हा उपदेश कां? वाटेल

ते धंदे देशकालानुरूप करण्यास सर्वांना धर्मानें मोकळीक कां देऊं नये? आणि ती देण्याइतका त्याच्या अंगांत उदारपणा नसलाच तर तो बाजूस सारून वाटेल त्या धंद्यांत पडण्याचा उपदेश पुढारी म्हणविणारांनीं लोकांस कां करूं नये? देशकालानुरूप एका विशिष्ट वर्गानेंच धर्माज्ञा झुगारून द्यावी—जे धर्मतत्त्वांचे पुरस्कर्ते म्हणून अद्यापही मिरवितात त्यांनींच फक्त धर्माज्ञा पायांखालीं तुडवावी—आणि इतरांनीं जन्मसिद्ध कर्तव्य उपदेशिणारा धर्म हृदयाशीं धरून मरण पत्करावें, या बोधांत परार्थतत्परता कितीशी आहे? कीं स्वतः धर्माज्ञा लाथाळीत असतां ती शिरोधार्य समजण्याविषयीं लोकांना आग्रह करणें हेंच परम पुरुषार्थाचें व ज्वलज्जहाल धर्माभिमानाचें लक्षण समजलें जातें?

पण यावर कोणी आक्षेप घेण्याचें साहस करतील:—“ वरिष्ठ वर्ग बुद्धिमान् आहे. त्यानें अशा रीतीनें देशकालानुसार धर्माज्ञेकडे दुर्लक्ष केलें नसतें तर देशाचें अकल्याण झालें असतें. स्वतःस अत्यंत प्रिय असलेला धर्म अवमानूनही त्यांनीं राष्ट्राचें हित साधिलें हे त्यांचे राष्ट्रावर अनंत उपकार आहेत.” कबूल. पण हाच युक्तिवाद इतरांच्या बाबतींत लागू पडतो. एखाद्या धंद्यांत पैसे मिळत नाहींत याचा अर्थ देशाला त्या धंद्याची आवश्यकता नाहीं—तो धंदा देशाच्या दृष्टीनें व त्या व्यक्तीच्याही दृष्टीनें किफायतशीर नाहीं—हाच होय. आणि दुसऱ्या एका धंद्यांत पैसे मिळतात याचा अर्थ त्या धंद्याची राष्ट्राला आवश्यकता आहे, त्यांत लोक पडले असतां व्यापाराची व त्याबरोबर राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीची उत्कृष्ट वाढ होईल, हाच होय. अर्थात् इतर वर्गांनींही, आपले वंशपरंपरागत धंदे देशाच्या म्हणजे स्वतःच्या व स्वतःच्या म्हणजे देशाच्या दृष्टीनें अनुपयुक्त अतएव योग्य मोबदला न देणारे असे झाले असतां, इतर धंद्यांत पडून स्वतःचा व देशाचा फायदा करणें हेंच योग्य आहे. धंद्याच्या बाबतींत स्वतःचें हित पाहणें म्हणजेच राष्ट्राचें हित साधणें होय. आणि वरिष्ठानींही जन्मसिद्ध कर्तव्यावर तिलांजलि सोडली ती राष्ट्रहितासाठीं नसून स्वतःच्या उदरंभरणासाठीं सोडिली आहे. पण हाच उपदेश

इतरांस करण्याइतकें औदार्य व दूरदर्शित्व त्यांपैकीं कित्येकांस नाहीं. आवश्यक असलेल्या धंद्यांत लोक पडले असतां—वंशपरंपरागत पण मोबदला न देणारा प्राणघातक धंदा सोडून भरपूर प्राप्ति होत असलेल्या धंद्यांत लोक शिरले असतां—त्यांची, त्यांच्याबरोबर राष्ट्राची व तदंतर्गत वरिष्ठांचीही स्थिति सुधारेल हें त्यांच्या दृष्टीस येत नाहीं. आपला धंदा ज्यांना आपण कनिष्ठ लेखतों ते पटकावतात हें पाहून त्यांचें मन मत्सरानें ग्रस्त झालें आहे; यामुळें ते राष्ट्रहिताच्या व राष्ट्राभिमानाच्या गप्पा मारून त्या उजाळ्याखालून आपला मत्सरपूर्ण व अदूरदर्शी स्वार्थ लोकांच्या शिरावर लादून या आपल्या राष्ट्रघातक कृत्याला धर्मप्रेमाचा मुलामा चढवूं पहातहेत. वरिष्ठांनीं आपले धंदे कां सोडले ?—तर देशकालानुरूप राष्ट्रहित साधण्यासाठीं. इतरांनीं जन्मसिद्ध कर्तव्यच कां करीत रहावयाचें, इतर धंद्यांत कां पडावयाचें नाहीं ?—तर परमपूज्य हिंदुधर्मानें उपदेशिलेल्या वर्णाश्रमधर्माची व्यवस्था सांभाळण्यासाठीं ! वाः रे युक्तिवाद !

" जन्मसिद्ध कर्तव्य करीत रहा " असा उपदेश करणाऱ्यांचे हे आतांचे बोल त्यांच्या यापूर्वींच्या अथवा इतर प्रसंगींच्या बोलांशीं जोडून पाहिले तर पहिल्या प्रतीच्या परस्परविरोधाशिवाय दुसरें कांहींच दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. ज्यांनीं स्वदेशी वस्तु वापरण्याचा सर्वांस उपदेश केला, स्वदेशी धंद्यांस उत्तेजन देण्यासाठीं ज्यांनीं व्याख्यानांचीं शतकें केलीं त्यांनीं जन्मसिद्ध कर्तव्याच्या बोधामृताचे घुटके लोकांच्या नरडींत सोडावे हें आश्चर्यकारक आहे. स्वदेशी धंद्यांस उत्तेजन मिळणें अथवा व्यापाराच्या दृष्टीनें हिंदुस्थानाची भरभराट होणें याचा अर्थ, ज्या धंद्यांत हिंदुस्थानाला विशेष सोयी आहेत त्या धंद्यांतच प्रावीण्य व पुढाकार संपादून इतर देशांवर वरचढ करणें व आपली सांपत्तिक स्थिति अशा रीतीनें सुधारून घेणें असाच असणार. या प्रकारची प्रगति व्हावयाची ह्मणजे स्वाभाविकपणेंच कांहीं कांहीं धंद्यांची अजस्र वाढ व्हावयाची आणि इतर धंदे मागें पडावयाचे. स्वदेशी धंद्यांस उत्तेजन द्यावयाचें,

म्हणजे जन्मसिद्ध कर्तव्याच्या धोरणानें लोकांची खानेसुमारी करून त्या त्या बेतानें धंदे वाढाविणें असें असणें कधींच शक्य नाहीं. शिवाय प्रत्येक प्रांताच्या प्रत्येक खेड्यांतून जन्मसिद्ध कर्तव्यानुसार लोकसंख्येचे विभाग पडले आहेत. त्यामुळें एखाद्या प्रांतांत कांहीं विशिष्ट धंद्याची प्रगति व्हावयाची, ह्मणजे तसें होण्यास त्या प्रांतांतील लोकांनीं आपल्या वंशपरंपरागत धंद्यांवर लाथ मारून त्या विशिष्ट धंद्यांत शिरलें पाहिजे. त्यावांचून त्या धंद्यांची वाढ व तिच्या द्वारें देशाची सांपत्तिक दृष्ट्या उन्नति होणें शक्य नाहीं आणि त्या लोकांची उपासमार बंद होणेंही शक्य नाहीं. याप्रमाणें स्वदेशीच्या तत्त्वाचा प्रसार हा प्रत्यक्ष जन्मसिद्ध कर्तव्याच्या तत्त्वाच्या मुळाशीं कुठार घालीत असतां एकाच मुखानें दोन्ही तत्त्वांचा उपदेश करणें कितपत परस्परसुसंगतपणाचें लक्षण आहे ? एका व्याख्यानांत लोकांना किफायतशीर धंद्यांत पडून आपली प्रगति करून घेण्याचा उपदेश करणें व दुसऱ्या व्याख्यानांत जन्मसिद्ध कर्तव्याची थोरवी प्रतिपादून त्याच अवनत स्थितींत कुजत पडण्यास लोकांना पर्यायानें सांगणें हें राष्ट्रहितास कितपत पोषक होणार ? यायोगानें लोकांची कार्याकार्यनिश्चिति कितपत व्यवस्थित स्वरूपाची होणार ?

या ठिकाणीं जातिभेदाच्या महत्त्वपूर्ण प्रश्नासंबंधानें थोडासा विचार करणें अस्थानीं होणार नाहीं. जन्मसिद्ध धंद्यांचा जातिभेदाशीं अत्यंत निकट संबंध आहे. अस्पृश्य मानले जाणारे लोक, जन्मसिद्ध धंद्यांतून त्यांची सुटका—त्यांच्या अवनत स्थितीमुळें व ही अवनत स्थिति दुष्ट समाज-बंधनांनीं उत्पन्न केली ह्मणून—होत नाहीं ह्मणून, त्याज्य लेखले जातात. आणि ते त्याज्य लेखले जातात ह्मणून इतर चांगल्या धंद्यांच्या अभावीं त्यांना नीच धंद्यांवरच उदरनिर्वाह करावा लागतो. याप्रमाणें बुडत्याचा पाय खोलांत आणि खोलांत शिरणाराचा पाय बुडता अशी परस्परावलंबी शोचनीय स्थिति त्यांना प्राप्त झाली आहे. असाच प्रकार इतरत्रही झाला आहे. याप्रमाणें जन्मसिद्ध धंद्यांचा जातिभेदाशीं पुष्कळच निकट संबंध

असल्याकारणानें जन्मसिद्ध कर्तव्याच्या तत्त्वानें बऱ्याच अंशीं व्याप्त होणाऱ्या जातिभेदाच्या प्रश्नाचा ऊहापोह येथें करणें अनिष्ट होणार नाहीं.

जातिभेद कायम राखणें इष्ट आहे या मताचा पुरस्कार करतांना पुष्कळदां, " आपली आर्यसंस्कृति जातिभेदविशिष्ट आहे ह्मणूनच इतके दिवस टिकली. हिंदुसमाजाइतका वृद्ध समाज जगाच्या इतिहासांत कोठेंही सांपडत नाहीं. " हें विधान करण्यांत येतें. याची उपयुक्तता कितपत आहे आणि त्यामुळें जातिभेदविशिष्ट आर्यसंस्कृति कितपत आदरणीय ठरते याचा विचार करूं.

आर्यसंस्कृतींत वाढलेला—अथवा जेमतेम जिवंत राहिलेला—शतसहस्र-शकलरूप 'समाज' अनेक शतकें टिकला, आणि इतर संस्कृतींतील राष्ट्रें अल्पकालांतच स्मृतिशेष झालीं ही गोष्ट खरी आहे; पण यावरून आर्यसंस्कृति श्रेष्ठ होय असें सिद्ध होत नाहीं. कोणत्याही समाजव्यवस्थेची किंमत त्या समाजव्यवस्थेपासून त्यांतील लोकांना होणाऱ्या सुखावरूनच ठरवावयाची, त्या विशिष्ट जनसमूहाचें सौख्य हेंच कोणत्याही संस्कृतीचें ध्येय असलें पाहिजे. पण त्या दृष्टीनें आर्यसंस्कृतीची योग्यता फारशी मोठी ठरत नाहीं. कांहीं शतकें त्या संस्कृतींतील समाजाचीं विशिष्ट शकलें वैभवसुख अनुभवीत असलीं तरी अलीकडे अनेक शतकें सर्वच समाजशकलें पारतंत्र्यांत व दारिद्र्यांत दुःखानेंच आयुष्य कंठीत आहेत. शिवाय स्वतः-ची अप्रतिहतपणें उन्नति करून घेण्याची मोकळीक बहुतेक समाजशकलांस या संस्कृतीनें ठेविली नसल्यामुळें खऱ्या स्वाभिमानाचें सुख अत्यंत वैभव-कालींही त्यांनीं लवमात्र अनुभविलेलें नाहीं; वरिष्ठ समाजानें अनुभविलेलें सौख्यही विशेष उच्च कोटीचें होतें अशांतला प्रकार नाहीं. अमुक लोक जन्मतःच नीच व आम्ही जन्मतःच उच्च, अशी भावना मनांत ठेवून ज्यांना चैनींत रहातां येतें त्यांची मनःस्थिति कितपत उच्च दर्जाची अस-णार हें उघडच दिसतें; कनिष्ठ शकलांचे घटकावयवही आपणांप्रमाणेंच मानवकोटींतील आहेत हें स्पष्ट दिसत असतांना, त्यांची कदाकाळींही योग्यता वाढणें शक्य नाहीं—अनेक पिढ्यांनीं सुद्धां त्यांना वरची पायरी

चढणें शक्य नाहीं असली मूर्खपणाची कल्पना ज्यांच्या मनांत बद्धमूल होऊन राहिली होती अथवा स्वतःची कृत्रिम मिजास सांभाळण्यासाठीं आपल्या मानवबंधूंना कृत्रिम दास्यांत ठेवण्यास ज्यांपैकीं कित्येक जाणत्यांचें मन कचरत नव्हतें त्यांना उत्कृष्ट प्रकारचा आनंद कितीसा अनुभवण्यास मिळाला असेल ? अखिल मानवजातीविषयीं बंधुत्वाची भावना मनांत बाणल्यानेंच केवळ ज्या उच्चतम आनंदाचा आस्वाद मिळणें शक्य आहे त्याची गोडी त्यांना कितपत चाखावयास मिळाली असेल ? आपले असंख्य देशबांधव कृत्रिम गुलामगिरींत खितपत असतां, त्यांना गुलामगिरींत ठेवणारीं समाजबंधनें अधिकाधिक घट्ट आवळणाऱ्या या वरिष्ठांना विशुद्ध बुद्धिप्रकाशापासून होणारें अथवा उन्नततम पूतभावनांपासून मिळणारें मनःसौख्य लवमात्र तरी चाखावयास मिळालें असणें संभवनीय आहे काय ?—यावरून ज्याला आपण हिंदुसमाजाचा वैभवकाल म्हणतों त्या कालीं या आर्यसंस्कृतींतील समाजशकलांनीं काय सौख्य अनुभविलें हें उघडच दिसतें.

अलीकडे दहा शतकें या आर्यसंस्कृतींतल्या समाजशकलांची काय स्थिति आहे हें विदितच आहे. पारतंत्र्यापासून होणाऱ्या यातनांचें वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. परकीयांच्या जुलमाखालीं चेंगरून गेलेल्या हिंदूंना कोणत्या उच्च सुखाचा आस्वाद मिळाला आहे ? ब्रिटिशांच्या न्यायी छत्राखालींच त्यांच्या उन्नतीला प्रारंभ होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

यावरून आर्यसंस्कृतीमुळें समाजास झालेल्या सौख्यप्राप्तीची कल्पना येईल. अल्पस्वल्प सुखांत व पर्वतप्राय दुःखांत कसेंबसें आयुष्य कंठणाऱ्या पण हजारों वर्षें टिकणाऱ्या आर्यसंस्कृतिविशिष्ट समाजानें अधिक सुखास्वाद घेतला असेल कीं थोडीं शतकें अत्युच्च प्रतीचें सौख्य अनुभविणाऱ्या अन्यसंस्कृतिविशिष्ट समाजांच्या सुखाचें परिमाण अधिक असेल? शतकेंच्या शतकें जगणाऱ्या वृक्षास सुखसाधनें अधिक असतात कीं कांहीं वर्षें जगणाऱ्या मनुष्यप्राण्यास सुखास्वाद अधिक मिळणें शक्य असतें? सौख्य हें केवळ लांबलचक आयुष्या-

वरतीच अवलंबून आहे अशी आर्यसंस्कृतिपुरस्कर्त्यांची कल्पना असल्यास त्यांनीं आपला समाज वनस्पतिकोटींत जाऊन पडावा अशी इच्छा करणेंच त्यांच्या दृष्टीनें श्रेयस्कर होईल—बाकी त्यांच्या प्रयत्नांमुळें व पुराणसंस्कृतीच्या अभिमानामुळें हिंदुसमाजास ती स्थिति येत चालली आहे यांत शंका नाहीं; उच्चभावनाशून्य मनुष्यांत आणि वृक्षपाषाणांत विशेषसा भेद करण्याचें कारण नाहीं.

# परिशिष्ट.

आतांपर्यंत वाचकांपुढें मांडलेल्या विचारांतील कांहीं भाग उद्धृत करून ...गार हप्त्यांनीं केसरींत प्रसिद्धही झाले. पण त्यांचीं प्रत्युत्तरें केसरींत प्रसिद्ध योजिलें आहे.

निष्काम कर्म हातून घडणें कधींही ...त लिहिलें होतें. कारण, कार्यसिद्धी- ...ाहीं तर कार्याकडे प्रवृत्ति व्हावयाची ...ातून कार्य होऊं लागल्यावर तें विशिष्ट ... कार्य कां होऊं नये? कारण मनाची ...च आहे. विशिष्ट कार्याकडे प्रवृत्ति ...श मनांत प्रादुर्भूत झालीच पाहिजे हें ... लिहितातः—

...ilosophical calm या शब्दांकडे रा. ... लक्ष गेल्या... ...रसत नाहीं. आधिभौतिक वाद्यांच्या ...ल्पकाम्यबुद्धि' असे जरी शब्द असले तरी परमावधीची स्थिति वर्णन ... ी त्याच स्थितीस निष्काम असेंच विशेषण अध्यात्मवादी देत असतात, आणि याच न्यायानें गणितांतहि सरळ रेघ विनरुंदीची समजली जाते."

'अत्यल्पकाम्यबुद्धि' च्या ऐवजीं अध्यात्मवादी निष्काम असेंच विशे-

श्री ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(जिल्हा वाचनालय)
...नी मंदिर, सुभाष पथ, ठाणे.
ध्वनी : ५४ ३५ ७६
वार्षिक समारंभ
दि. ५-२-९१
१८ सायंकाळी

षण देत असतील; पण त्याचा अर्थ मात्र नेहमीं सकाम असाच करावा लागेल. कारण इच्छेवांचून कार्यप्रवृत्ति होणें शक्य नाहीं हें उघड आहे. उदाहरणार्थ, जनहिततत्परतेवांचून जर मनुष्याच्या हातून जनहिताचें कार्य होऊं लागलें तर त्याच्याच हातून लोकांच्या अकल्याण्याचीं कृत्यें कां घडूं नयेत ? कारण दोन्ही ठिकाणीं मनःस्थिति सारखीच—अविकृत—आहे. गणितांतील सरळ रेषेचा दृष्टांत निव्वळ अप्रस्तुत व सामान्य वाचकांची दिशाभूल करणारा आहे. सरळ रेषेला रुंदी असणें शक्य नाहीं ही गोष्ट गणितशास्त्रांत तात्त्विकदृष्ट्या सिद्ध झालेली अतएव सर्वमान्य आहे; फक्त कृतींत बिनरुंदीची रेघ काढणें शक्य नाहीं ह्मणून वस्तुतः रुंदी असलेली कागदावरची रेघ बिनरुंदीची समजावी लागते. त्याप्रमाणें 'निष्काम कर्म' शक्य आहे, ही गोष्ट तात्त्विकदृष्ट्या सिद्ध होऊं द्या; मग व्यवहारांत ती शक्य नसली तरी चालेल. पण 'निष्काम कर्म' तात्त्विकदृष्ट्याच शक्य आहे कीं नाहीं हा जेथें वादाचा मुद्दा आहे, तेथें सरळ रेषेचा दृष्टांत काय कामाचा ? "याच न्यायानें..." हा न्याय कोणता ? आकिलस आणि कासवाचा वालंपेची गणिती पेंच घालून अज्ञ वाचकांना गोंधळांत पाडणारांचा हा न्याय असेल; प्रामाणिक तर्कशास्त्रविशारदांचा हा न्याय खास नव्हे !

"मानसिक साम्यावस्था व नीतिमत्ता" या मथळ्याखालीं तिसरा लेखांक केसरींत प्रसिद्ध झाला, त्यावर 'के. क.' लिहितातः—

"वरील सर्व आक्षेप पोकळ, स्वतःच्या गैरसमजुतीनें झालेले व मुद्याला सोडून आहेत."—असतील. पण नुसत्या तसें ह्मणण्यानें ते तसे ठरत नाहींत. नाहीं तर वादविवादाचें प्रयोजनच जगांत उरलें नसतें, व शेंकडों युक्तिचापल्यपूर्ण पृष्ठांनीं जें काम व्हावयाचें नाहीं तें पांच चार शेलक्या अपशब्दांनीं झालें असतें.—"(१) 'सर्वभूतहित' यांतील 'सर्व' शब्दांत मनुष्याचाहि समावेश होतो ही गोष्ट रा. रा. कोठारी यांच्या लक्षांत येऊं नये हें आश्चर्य होय. साप, विंचू वगैरे मनुष्यास मारणारे प्राणीही दयेनें आपण मारूं नयेत हें मत जैनांचें आहे, वेदांत्यांचें नव्हे;

वं जैन मताचा उपन्यास करून वेदांत्यांचा उपहास करणें म्हणजे रामाचें नाक नकटें ह्मणून सोम्यास हांसण्यासारखें आहे. "—' सर्व ' शब्दांत मनुष्याचा समावेश होतो ही गोष्ट मी केव्हांच विसरलों नव्हतों. माझें म्हणणें इतकेंच आहे, कीं, ' सर्वभूतां ' मध्यें मनुष्यांबरोबर इतर प्राण्यांचाही समावेश होतो आणि त्यांच्या हिताकडे लक्ष्य द्यावयाचें ह्मटल्यावर स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या हिताकडे दुर्लक्ष्य होतें. कारण पुष्कळ प्राण्यांचे व मनुष्याचे हितसंबंध अगदीं परस्परविरुद्ध आहेत. ह्मणून, सर्वभूतहित हें ध्येय पुढें न ठेवतां मनुष्यहित हेंच ठेविलें पाहिजे; तसें न केल्यास अव्यापारेषु व्यापार करण्याच्या फंदांत हें ध्येयप्रेमी सांपडावयाचे आणि मनुष्यजातीला अहितकारक तितकें सर्व करीत रहावयाचे. " साप, विंचू वगैरे प्राणी मारूं नयेत हें मत वेदांत्यांचें नव्हे ! " तर मग, हे प्राणी मारावेत असें वेदांती ह्मणतात काय ? तसें ते ह्मणत असल्यास त्यांचें सर्वभूतहिताचें ध्येय कोठें राहिलें ? साप, विंचू, व्याघ्र, केसरी असल्या प्राण्यांचा ' सर्वभूतां ' त समावेश होत नसतो, हें नवें तत्त्व लोकमान्य उपदेशिणार कीं काय ? शाबास ! जैनांच्या धर्ममताविषयीं मत्सरपूर्ण तिरस्कार व्यक्त करण्याचा मोह अनावर होऊन लोकमान्यांनीं स्वतःचें हांसें मात्र करून घेतलें ! ' सर्वभूतहित ' हें वेदांत्यांचें ध्येय होय असेंही म्हणावयाचें, आणि त्याबरोबर साप, विंचू वगैरेंना ' सर्वभूतां ' च्या टापूंत येऊं द्यावयाचें नाहीं, हा कोणता न्याय ? अर्धांगवायुविगलितगात्रन्याय, कीं रहस्यज्ञानेनसत्यापलापकारितन्याय ?——" ( २ ) स्पेन्सर आपल्या उत्क्रांतिवादांत आध्यात्मिक गुणांचा बिलकुल विचार करीत नाहींत हा त्यांच्या वादांतील मुख्य दोष होय; व रा. रा. कोठारी यांस अध्यात्माचें महत्त्व वाटत नसल्यामुळें त्यांच्या तो लक्षांत भरत नाहीं यास नाइलाज आहे. "—ज्याला ' अध्यात्मगुण ' ह्मणतात तो स्वतंत्रपणें असणें शक्य नाहीं, सामान्य शक्तींतूनच चैतन्याची उत्क्रांति झाली आहे हें स्पेन्सरनें जितक्या स्पष्टपणें दाखविणें शक्य होतें तितक्या स्पष्टपणें दाखविलें आहे. हेकेलनेंही ही गोष्ट स्पष्ट केली आहे. पण लोकमान्य टिळकांनीं तीं मतें मुळीं गीतारहस्यांत

दिलींच नाहींत, आणि जेथें दिलीं तेथें त्यांचें यथार्थ खंडन करणें अशक्य असल्यामुळें उडी मारिली आहे; हा दोष स्पेन्सरचाही नव्हे आणि हेकेल-चाही नव्हे. वेदांत्यांच्या अज्ञेय परब्रह्माला ज्ञेय युक्तींचा आधार देण्याच्या नादांत स्पेन्सरच्या व हेकेलच्या निरुत्तर करणाऱ्या युक्तिवादाचा अपलाप झाला, त्याचा हा दोष आहे. अशा अध्यात्माविषयीं आदर कां वाटावा हें आधीं सांगावयाला हवें. एरवीं स्वपक्षाचें मंडन होत नाहीं.——

" ( ३ ) प्रपंचाचें असत्यत्व म्हणजे काय, याची रा. कोठारी यांची समजूत चुकीची आहे. "—प्रपंच असत्य होय असें एकदां म्हटल्यावर त्याविषयीं चुकीची समजूत होणें शक्य आहे काय ? शिवाय जें मुळीं अस्तित्वांतच नाहीं त्याविषयीं बरोबर समजूत व्हावयाची म्हणजे काय ? अस्तित्वांत नसलेल्या वस्तूचें ( ? ) स्वरूप स्वतःस समजल्याबद्दल घमेंड मारणें म्हणजेच स्वतःचा पहिल्या प्रतीचा गैरसमज करून घेणें नव्हे काय? अशा असत्य व अविद्यमान प्रपंचाचें स्वरूप आपणास समजलें असें टीका-काराचें म्हणणें असल्यास, पोकळींत उंट शोधण्याचा प्रयत्न करून तो सांपडला असें ह्मणणाऱ्या सारवानाशींच त्याची तुलना केली पाहिजे.——

" ( ५ )...गीतारहस्यावर टीका करणारांनीं असें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, गीतारहस्यांत गीतेंत काय सांगितलें आहे याचें विवेचन असून त्याचप्रमाणें प्रतिपादन करणाऱ्या पाश्चात्य तत्त्वज्ञांचीं मतें व कारणें गीतारहस्यांत दिलीं आहेत...."—असें आहे तर गीतारहस्याला व सर्व धर्ममतांना आधारभूत असा जो अध्यात्मविषय त्याची अशक्यता प्रतिपादणाऱ्या स्पेन्सर, हेकेल इत्यादिकांच्या तद्विषयक युक्तींचें खंडन करण्याचा प्रयत्न गीतारहस्यांत कां केला आहे ? खुद्द अध्यात्माशीं ज्यांचें वांकडें आहे अशा स्पेन्सरादिकांचीं मतें चुकीचीं ठरवावयाचीच तर तीं उत्कृष्ट रीतीनें पुढें मांडिलीं पाहिजेत व त्यांचें प्रामाणिकपणानें खंडन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण तसें चुकून सुद्धां गीतारहस्यांत कोठें केलें नसल्याकारणानें, सामान्य वाचकांचा स्पेन्सर, हेकेल यांसारख्या तत्त्व-वेत्त्यांविषयीं व त्यांच्या ग्रंथांत इथून तिथून आधारभूत धरलेल्या 'सायन्स'

विषयीं पराकाष्ठेच्या गैरसमज होतो; आणि म्हणून त्यांचीं खरीं मतें काय आहेत व तिकडे रहस्यकारांनीं ठिकठिकाणीं कसें शिताफीनें दुर्लक्ष्य केलें आहे हें जगाच्या निदर्शनास आणणें आवश्यक होतें.

" परब्रह्म म्हणजे काय ? " या चौथ्या लेखांकासंबंधानें ' के. क. ' लिहितातः—

" मागच्या लेखांतून आलेल्या कित्येक गोष्टींप्रमाणें अज्ञेय परब्रह्माचीही नीट कल्पना—अनुभव तर बाजूसच राहिला—रा. रा. कोठारी यांस नसल्यामुळें त्यांस सर्व अध्यात्मशास्त्र औपचारिक वाटतें हें साहजिक आहे. अशासाठीं ' गीता ' नव्हे, आणि 'गीतारहस्य'हि नव्हे. "

या अध्यात्मासंबंधींचें विवेचन चौथ्या प्रकरणांत आलेंच आहे. तेव्हां येथें पुनरुक्ति करीत नाहीं. अशा अध्यात्मशास्त्राला औपचारिक म्हणणारांसाठीं गीतारहस्य नसेल तर नसो; त्यावरील ही टीकाही विचाराला बिलकूल महत्त्व न देतां केवळ अंधश्रद्धेचीच उपासना करणारांसाठीं नाहीं. ज्यांना आपण प्रकट करीत असलेल्या मतांचा फोलपणा पूर्णपणें समजून चुकला आहे, तथापि विवेकबुद्धीवर लोकानुरंजनलालसेचें दडपण घालून जे लिहितात व बोलतात; त्याचप्रमाणें स्वधर्मतत्त्वांची अन्यायी प्रवृत्ति स्पष्ट स्पष्ट दिसत असूनही स्वतःच्या वर्गाचा अरेरावी जुलूम व अन्याय्य वर्चस्व कायम रहावें म्हणूनच जे स्वधर्माचे अहर्निश पोवाडे गात असतात; अशांकरितांही ही टीका नव्हे. या अन्यायांतून मुक्त होऊं इच्छिणाऱ्या व करूं इच्छिणाऱ्या विचारी लोकांकरितां हे श्रम घेतले आहेत.

---

REFBK-0001112